CMYK




सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, ४ मार्च २०२६ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४२ वे अंक ९६ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com



### अमेरिकन बाजार १२०० अंकांनी घसरला

वॉशिंग्टन : मध्य पूर्वेत इराण-इस्रायल युद्धाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेच्या बाजारात आज मंगळवारी मोठी घसरण दिसून येत आहे. डाऊ जोन्स २.२८% (१२०० अंकांनी) घसरणीसह ४७,७८८ अंकांवर व्यवहार करत आहे. तर, अमेरिकेचा टेक-आधारित निर्देशांक नॅसडॅक कंपोझिट १.९५% म्हणजेच ४८५ अंकांनी घसरून २२,३०५ च्या पातळीवर आणि S&P ५०० निर्देशांक २.०२% म्हणजेच १३८ अंकांनी घसरून ६,७४२ च्या पातळीवर व्यवहार करत आहे.



### अभिनेत्री विशाखा सुभेदारचा मुलगा अडकला कुवेतमध्ये

मुंबई : इराण विरुद्ध इस्रायल - अमेरिका युद्धामुळे हजारो भारतीय नागरीक आखाती देशांत अडकले आहेत. या लोकांना मायदेशी आणण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. मराठी हास्य अभिनेत्री विशाखा सुभेदार यांचा लंडनला जाणारा मुलगाही या युद्धामुळे कुवैतमध्ये अडकला आहे. त्याच्या सुटकेसाठी विशाखा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना साकडे घातले आहे. यावेळी त्यांच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत होते.

# इराणच्या नूतन सर्वोच्च नेता निवडीदरम्यानच इस्रायलचा हल्ला

## असेंब्ली ऑफ एक्सपर्टस्‌च्या इमारतीला लक्ष्य केले; धार्मिक गुरु एकत्र आले होते

## ट्रम्प यांचा दावा, इराणला वाटाघाटी करायच्यात पण आता खूप उशीर झालाय

## इस्रायलने कोम शहरात केला हवाई हल्ला

**तेलअवीव/तेहरान,**

इराणमध्ये नवीन सर्वोच्च नेत्यासाठी निवडणूक प्रक्रियेदरम्यान इस्रायलने कोम शहरात हवाई हल्ला केला आहे. वृत्तानुसार, वरिष्ठ धार्मिक नेते जिथे जमले होते, त्या तज्ज्ञांच्या सभेच्या इमारतीला लक्ष्य करण्यात आले. ८८ सदस्यांची असलेली तज्ज्ञांची सभा देशाच्या सर्वोच्च नेत्याची निवड करण्याची जबाबदारी घेते. हल्ल्यात इमारतीचे मोठे नुकसान झाले आहे, जरी त्यावेळी आत किती लोक होते याची अधिकृत माहिती जाहीर केलेली नाही.

अमेरिका-इस्रायल-इराण युद्धाचा मंगळवारचा चौथा दिवस. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला वाटाघाटी करायच्या आहेत असे म्हटले आहे, परंतु आता खूप उशीर झाला आहे. सोशल मीडिया पोस्टमध्ये ट्रम्प यांनी दावा केला आहे की इराणची संरक्षण व्यवस्था आणि नेतृत्व जवळजवळ नष्ट झाले आहे. ट्रम्प यांनी सांगितले की इराणचे हवाई संरक्षण, हवाई दल आणि नौदल नष्ट झाले आहे. तथापि, रविवारी यापूर्वी ट्रम्प यांनी सांगितले होते की ते इराणी नेत्यांशी बोलण्यास तयार आहेत.




### ब्रिटिश पंतप्रधान फारसे मदतगार नव्हते : ट्रम्प



अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे की ब्रिटिश पंतप्रधान केयर स्टारमर फारसे मदतगार नव्हते. ट्रम्प म्हणाले की इराणवरील अमेरिका-इस्रायली हल्ल्यांबाबत स्टारमरची भूमिका अपेक्षेनुसार नव्हती. ब्रिटन-अमेरिकेतील विशेष संबंध आता पूर्वीसारखे राहिलेले नाहीत हे पाहून त्यांना दुःख झाले. त्यांनी अमेरिकन सैन्याला ब्रिटिश हवाई तळ वापरण्याची परवानगी देण्यात होणाऱ्या विलंबाला जबाबदार धरले. सोमवारी, स्टारमर यांनी संसदेत स्पष्ट केले की त्यांचे सरकार इराणवर हल्ल्यात सहभागी होणार नाही. त्यांनी सांगितले की कोणत्याही लष्करी कारवाईसाठी स्पष्ट कायदेशीर आधार आवश्यक आहे.

दरम्यान, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन इराणशी चर्चा करतील. मध्य पूर्वेतील देशांवरील हल्ले थांबवणे आणि वाढता तणाव कमी करणे हे उद्दिष्ट आहे. पुतिन यांनी आधीच सौदी अरेबियाचे क्राउन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान आणि कतारचे अमीर शेख तमीम बिन हमद अल थानी यांच्याशी फोनवरून बोलणे केले आहे. जॉर्डनच्या नागरी विमान वाहतूक नियामक आयोगाने देशाचे हवाई क्षेत्र पुन्हा सुरू करण्याची घोषणा केली आहे. सोमवार रात्रीपासून लागू असलेली ही बंदी आता उठवण्यात आली आहे. हवाई क्षेत्र पुन्हा सुरू झाल्यामुळे उड्डाणे सामान्य होतील अशी अपेक्षा आहे. ईराणच्या वायव्येकडील उर्मिया शहरात अलिकडेच झालेल्या हवाई हल्ल्यांमुळे भारतीय विद्यार्थी घाबरले आहेत. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्याकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे जेणेकरून विद्यार्थ्यांना सुरक्षित ठिकाणी हलवता येईल.

# काश्मीरमध्ये उद्याही निदर्शनांवर बंदी



## ●एअर इंडियाने जेद्दाह-दुबईसाठी विशेष उड्डाणे सुरू केली
## ●दुबई-अबुधाबीहून २०००+ भारतीय नागरिक परतले

**नवी दिल्ली, दि.३ मार्च-**

इस्रायल-इराण युद्धाचा आज चौथा दिवस आहे. इराणचे सर्वोच्च नेते खामेनी यांच्या मृत्यूच्या निषेधार्थ भारतातील शिया समुदाय सातत्याने निदर्शने करत आहे. जम्मू-काश्मीरमधील श्रीनगर आज सलग दुसऱ्या दिवशी बंद आहे. सोमवारी येथे आंदोलकांनी गोंधळ घातला होता. सुरक्षा दलांनी लाठीचार्ज आणि अश्रुधुराचा वापर करून जमावाला पांगवले होते.

पंतप्रधान मोदींनी सोमवारी भारतीय समुदायाच्या लोकांच्या सुरक्षेबाबत गेल्या ४८ तासांत आखाती देशांच्या अनेक प्रमुखांशी चर्चा केली. सर्वात आधी त्यांनी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू आणि यूएईचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन जायद अल नाहयान यांच्याशी बोलणे केले. दरम्यान, सोमवारी रात्री उशिरा यूएईमधून ४ विमाने दिल्ली, मुंबई, चेन्नई आणि बेंगळुरूला पोहोचली. अबू धाबीमध्ये अडकलेल्या भारतीयांनी देशात परतल्यावर सुटकेचा निःश्वास टाकला. एका प्रवाशाने सांगितले की, अबू धाबीमध्ये आमच्या हॉटेलजवळच स्फोट झाले. भारत सरकारने सर्व राज्यांना भडकाऊ भाषणांसाठी सतर्क राहण्याचे निर्देश दिले. इंडिगो एअरलाइन आज सौदी अरेबियातील जेद्दा येथून हैदराबाद, मुंबई, दिल्ली आणि अहमदाबादसाठी १० विशेष विमाने उडवणार आहे. दरम्यान, अबू धाबीची एतिहाद, दुबईची एमिरेट्स आणि फ्लायदुबईने निवडक उड्डाणे सुरू केली आहेत. अबू धाबी विमानतळावरून एतिहादची १५ विमाने इस्लामाबाद, पॅरिस, मस्टरडॅम, मुंबई, कैरो, लंडनसाठी रवाना झाली.

**कतारमध्ये अडकले हजारो प्रवासी :** मध्यपूर्वेतील सुरू असलेल्या संघर्षामुळे कतारमध्ये जवळपास ८,००० प्रवासी अडकले आहेत. कतार, युएई आणि सौदी अरेबियामधील हवाई क्षेत्र बंद झाल्यामुळे हजारो लोक आखाती देशांमध्ये अडकले आहेत. मोठ्या संख्येने प्रवासी वाहतुकीत अडकले आहेत.

# भारताकडे फक्त २५ दिवसांचे तेल शिल्लक

## ●पेट्रोल-डिझेलच्या किमती वाढवण्याचा सध्या भारताचा विचार नाही

**नवी दिल्ली, दि.३ मार्च-**

पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे आणि इराण-इस्रायल युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारताकडे आता फक्त २५ दिवसांचा क्रूड ऑइल म्हणजेच कच्चे तेल आणि रिफाइंड ऑइलचा साठा शिल्लक आहे.

न्यूज एजन्सी छख ने देशाच्या ऊर्जा सुरक्षेबाबत ही माहिती सरकारी सूत्रांनुसार दिली आहे. मात्र, सरकार सध्या पेट्रोल-डिझेलचे दर वाढवणार नाही. खरे तर, इराणने स्ट्रेट ऑफ होर्मुझ बंद करण्याची घोषणा केली आहे. तसेच, इराणच्या सैन्याने इशारा दिला आहे की, या मार्गातून कोणतेही जहाज गेल्यास त्याला आग लावली जाईल. ओमान आणि इराण दरम्यान असलेला हा मार्ग जगातील तेल व्यवसायासाठी सर्वात महत्त्वाचा मानला जातो. होर्मुझ मार्ग बंद झाल्यामुळे जगातील अनेक देशांच्या तेल पुरवठ्यावर परिणाम होईल, ज्यात भारतासह आशियाई देशांवर सर्वाधिक परिणाम होईल. हा मार्ग बंद झाल्यामुळे जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीही १०० डॉलर प्रति बॅरलच्या पुढे जाऊ शकतात. सध्या ब्रेंट क्रूडची किंमत सुमारे ५.५८% वाढून ८०.४१ डॉलर प्रति बॅरलच्या आसपास पोहोचली आहे. सामान्य जनतेसाठी दिलासादायक बातमी अशी आहे की, भारत सरकारचा सध्या पेट्रोल-डिझेलचे दर वाढवण्याचा कोणताही विचार नाही. पेट्रोलियम मंत्रालयाने म्हटले आहे की, देशात प्रमुख पेट्रोलियम उत्पादनांची उपलब्धता आणि परवडणारे दर निश्चित करण्यासाठी सर्व आवश्यक पावले उचलली जातील.

**अनेक शहरांमध्ये पेट्रोल पंपांवर वाढली गर्दी**

पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे आणि इराण-इस्रायल युद्धाच्या पार्श्वभूमीवर पेट्रोल महाग होणार असल्याचे चर्चा सुरु होताच देशातील अनेक शहरांमध्ये पेट्रोल पंपांवर वाहनधारक मोठ्या प्रमाणात गर्दी करत आहेत.



# चंद्रग्रहण : सोलापूरकरांनी पाळला वेधादि नियम

**तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि.३ मार्च-**

मंगळवार, दि.३ मार्च २०२६ रोजी चंद्रग्रहण होता. भारतीय प्रमाण वेळेनुसार दुपारी ३.२० वाजता चंद्रग्रहणास प्रारंभ झाला. संध्याकाळी ६.४६ वाजता चंद्रग्रहण संपले. ३ तास २७ मिनिटे सुरु असलेल्या चंद्रग्रहणाच्या अनुषंगाने सोलापूरकरांनी वेधादि नियम पाळले. चंद्रग्रहण संपताच घरोघरी झाडलोट, सडासंमार्जन करण्यात आल होते.

चंद्रग्रहणाच्या आधी ९ तास म्हणजे सकाळी ६.२० मिनिटांनी सुतक काळ सुरु झाला होता. सुतक काळात शुभकार्ये वर्ज्य मानले गेल्याने कोणतेही शुभकार्ये करण्यात आली नाहीत. गर्भवती महिला, वृध्द आणि मुलांना विशेष काळजी घेण्याचा सल्ला देण्यात आल्याने त्यानुसार यातील प्रत्येकांनी तशी काळजी घेतली होती.

वैज्ञानिकदृष्ट्या चंद्र पृथ्वीच्या पाण्यावर आणि गुरुत्वाकर्षणावर प्रभाव पाडतो. चंद्र हा पृथ्वीच्या सर्वात जवळचा ग्रह असून चंद्राच्या घटना पृथ्वीवर आणि मानवी भावनांवर परिणाम करतात, असे सांगितले गेले. आपापल्या गुरुंकडून दीक्षा घेतलेल्या साधकांनी ग्रहणकाळात मंत्राचे पुनश्चरण केले.

# इराणविरोधातील युध्दात आखाती देश लक्ष्य!

## ▸ गेल्या ४८ तासांत मोदींनी साधला ८ देशांशी संपर्क

**नवी दिल्ली, दि.३ मार्च-**

अमेरिका आणि इस्रायलने संयुक्तपणे इराणवर हल्ले सुरू ठेवले आहेत. गेल्या चार दिवसांपासून जगात युद्धसदृष्य स्थिती निर्माण झाली आहे. दोन्ही देशांनी केलेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इराणनेही प्रतिहल्ले सुरू ठेवले असून आखाती देशांना लक्ष्य केलं आहे. परिणामी अमेरिका, इस्रायल, इराण आणि आखाती देशांत राहणाऱ्या भारतीयांची सुरक्षा धोक्यात आली आहे. त्यामुळे भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या ४८ तासांत आठ देशांशी संपर्क साधला असून भारतीयांची सुरक्षितता सुनिश्चित केली आहे.



एएनआयने दिलेल्या वृत्तानुसार, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युएई, इस्रायल, सौदी अरेबिया, जॉर्डन, बहरीन, ओमान, कुवेत आणि कतारच्या प्रमुखांशी संपर्क साधला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी कतारचे अमीर तमीम बिन हमद अल थानी यांच्याशी संवाद साधला. त्यांनी कतारवरील हल्ल्यांचा निषेध केला आहे. तसंच, कतारमधील भारतीय समुदायाची काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. माझे भाऊ, कतारचे अमीर, एचएच शेख तमीम बिन हमद अल थानी यांच्याशी मी बोललो. आम्ही कतारच्या सार्वभौमत्वाचे आणि प्रादेशिक अखंडतेचे उल्लंघन केल्याचा तीव्र निषेध करतो. आम्ही संवाद आणि राजनैतिक मुत्सद्देगिरीच्या या प्रदेशात शांतता आणि स्थिरता येण्याची गरज आहे, यावर चर्चा केली. या आव्हानात्मक काळात कतारमधील भारतीय समुदायाला त्यांनी दिलेल्या सततच्या पाठिंब्याबद्दल आणि काळजीबद्दल मी त्यांचे कौतुकही केले आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आज दुपारी आखाती प्रदेशातील दोन महत्त्वाच्या नेत्यांशीही चर्चा केली. त्यांनी ओमानचे सुलतान हैथम बिन तारिक आणि कुवेतचे क्राउन प्रिन्स सबा अल खालेद अल हमद अल मुबारक अल सबा यांच्याशीही संवाद साधला. महामहिम सुलतान हैथम बिन तारिक यांच्याशी चर्चा केली आणि पश्चिम आशियातील अलिकडच्या घडामोडींवर विचारांची देवाणघेवाण केली. ओमानच्या सार्वभौमत्वाचे आणि प्रादेशिक अखंडतेचे उल्लंघन झाल्याचा निषेध केला.

### मागील सहा वर्षांमध्ये २९ हजार ८० पदव्युत्तर वैद्यकीय जागा वाढल्या

**मुंबई, दि.३ मार्च**

मागील सहा वर्षांपासून देशामध्ये २९ हजार ८० पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या जागा वाढल्या असून, पुढील चार वर्षांमध्ये सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आणखी १० हजार जागा वाढणार आहेत.

त्यामुळे देशातील ग्रामीण भागात डॉक्टरांची कमतरता कमी करण्यास, पायाभूत सुविधा व प्राध्यापकांच्या संख्या वाढण्यास मदत होऊन वैद्यकीय शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यास मदत होणार असल्याची माहिती केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी लोकसभेत दिली. शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात डॉक्टरांची असलेली मोठी कमतरता भरून काढणे, हा या निर्णयाचा मुख्य उद्देश आहे. तज्ज्ञ डॉक्टरांची संख्या वाढल्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना स्थानिक पातळीवरच दर्जेदार उपचार मिळणे सोपे होणार आहे.



# राज्यभर धुलिवंदनाचा सण उत्साहात साजरा

## ●देशभरात रंगोत्सव जल्लोषात साजरा
## ●सामान्य नागरिकांसह राजकारण्यांचाही सहभाग

**मुंबई, दि.३ मार्च-**

होळीच्या दुसऱ्या दिवशी आज अवघा महाराष्ट्र रंगांच्या उत्सवात न्हाऊन निघाला आहे. धुलिवंदनाचा सण आज राज्यभर मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत असून, शहरांपासून ग्रामीण भागापर्यंत आनंदाची उधळण पाहायला मिळाला.

विशेष म्हणजे, यंदा सामान्यांसोबतच राजकीय दिग्गजही आपल्या कार्यकर्त्यांच्या रंगात रंगल्याचे विलोभनीय चित्र पाहायला मिळाले. राजकारणातील गट-तट विसरून अनेक नेत्यांनी आज कार्यकर्त्यांसोबत धुळवड साजरी केली. मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि कोल्हापूर यांसारख्या प्रमुख शहरांमध्ये धुलिवंदनाचा उत्साह शिगेला पोहोचला होता.

गृहनिर्माण सोसायट्या आणि सार्वजनिक चौकांमध्ये 'बुरा ना मानो होली है'च्या घोषणा देत तरुणाईने डीजेच्या तालावर ठेका धरला. अनेक ठिकाणी पारंपरिक ढोल-ताशांच्या गजरात गुलाल उधळत मिरवणुका काढण्यात आल्या. महिला आणि मुलांनीही या रंगोत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सोलापुरात मात्र रंगपंचमी सण साजरा केला जातो.

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या बैठकीत आज ठरणार मिनी मंत्रालयाचे कारभारी!

## भाजपा नेतेमंडळी बैठकीसाठी मुंबईकडे रवाना

**तभा वृत्तसेवा | अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका पार पडल्यानंतर आता जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि पंचायत समितीचे सभापती, उपसभापती कोण होणार? याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यातील विविध राजकीय गोटात सुरू आहे. २० मार्चपूर्वी पदाधिकारी निवडण्यासाठी पहिली बैठक घेण्याचे आदेश ग्रामविकास विभागाकडून जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

यामुळे या नूतन पदाधिकाऱ्यांच्या नावाचा फैसला करण्यासाठी बुधवारी सकाळी १० वाजता मुंबई येथे मुख्यमंत्री फडणवीस हे बैठक घेणार असून, यासाठी जिल्ह्यातील भाजपाची नेतेमंडळी मंगळवारी मुंबईकडे रवाना झाल्याची माहिती भाजपा जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांनी खास दै. तरूण भारतशी बोलताना आज (दि.३) दिली. या बैठकीसाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासह आमदार सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे, आ. समाधान आवताडे, भाजपा अध्यक्ष शशिकांत चव्हाण, माजी आ. दिलीप माने, यशवंत माने, राजाभाऊ राऊत यांच्यासह इतरही काही पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. पालकमंत्री जयकुमार गोरे हे शनिवारी सोलापूर दौऱ्यावर असतानाच जिल्हा परिषद गटनेता, अध्यक्ष-उपाध्यक्ष आणि पंचायत समिती सभापती-उपसभापती आदींच्या नावावर सर्वानुमते शिक्कामोर्तब झाल्याचे समजते. मात्र आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून घोषणाच बाकी असल्याचे सांगण्यात येत आहे. यानंतर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली दि. १२ मार्चला पंचायत समिती आणि १८ मार्च रोजी जिल्हा परिषद पदाधिकारी निवडीसाठी होणाऱ्या बैठकीत ही पदाधिकाऱ्यांची नावे जाहीर होणार असल्याचे सांगण्यात येते. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचे निकाल लागून तब्बल २२ दिवस होत आले तरी अजून अध्यक्षपदाची निवड झाली नाही; याबाबत राजकीय गोटातून आणि सामान्य नागरिकांतून चर्चा सुरू आहे. या ८ ते १५ दिवसात नावांची घोषणा होवून पदाधिकारी आपापल्या खुर्चीवर स्थानापन्न होण्याची शक्यताही चव्हाण यांनी वर्तविली.



ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापूर महापालिकेबरोबरच जिल्हा परिषदेवर भाजपची सत्ता आणली. भाजपच्या ६८ जागापैकी ३८ सदस्य भाजपचे निवडून आणले आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेत भाजपची निर्विवाद सत्ता आली आहे. आता या मिनी मंत्रालयाचा अध्यक्ष कोण होणार? याकडेच सर्वांचेच लक्ष लागले आहे.

### स्वीकृत सदस्यांच्या नावांना मिळणार का मंजुरी?

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुकीत नाराज झालेल्या इच्छुकांना स्वीकृत सदस्य करण्याचा शब्द दिला होता. आतापर्यंत जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये स्वीकृत सदस्यपदच नव्हते. पण यावेळेस प्रथमच स्वीकृतची संधी पालकमंत्री गोरे यांच्यामुळे मिळणार आहे. यासाठी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी नवा पॅटर्न तयार केला आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये स्वीकृत सदस्य निवडीसाठीचा प्रस्ताव त्यांनी तयार करून मंजुरीसाठी मंत्रालयाकडे सादर केल्याचे समजते. या प्रस्तावाची फाईल सध्या मंजुरीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याच टेबलावर आहे. यामुळे या नवीन प्रस्तावास सीएमसाहेब मंजुरी देणार का? याकडेही जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### १२ आणि १८ मार्चला बैठक

येत्या १२ मार्च रोजी जिल्ह्यातील सर्व ११ पंचायत समित्यांचे सभापती आणि उपसभापती निवडीसाठी आणि १८ मार्च रोजी जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष पदांची निवड प्रक्रिया पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी एक बैठक बोलावली आहे. या बैठकीत मिनी मंत्रालयातील पदाधिकाऱ्यांची निवड प्रक्रिया पार पडणार आहे. यासाठी आवश्यक ती सर्व तयारी प्रशासनाकडून करण्यात आली अशी माहिती उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनी दिली.

# तेरा वर्षीय मुलाची गळफासाने आत्महत्या

**मोहोळ, दि. ३ मार्च-**

मोबाईल वापरण्यास का दिला नाही म्हणून १३ वर्षाच्या मुलाने राहत्या घरी साडीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दि.१ मार्च रोजी सांय. ७ वा पुर्वी पेनुर येथे घडली. यशराज धर्मराज डोके असे आत्महत्या केलेल्या मुलाचे नाव आहे.



मोहोळ तालुक्यातील पेनुर येथे धर्मराज डोके हे कुटुंब समावेत राहण्यास असून शेती करून उपजीविका करतात. दि. १ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजण्यापूर्वी राहत्या घरी यशराज डोके याने मोबाईल वापरण्यास का दिला नाही? म्हणून स्वतःहून राहत्या घरातील पत्र्याच्या लोखंडी अँगलला साडीच्या साह्याने गळफास लावून घेतला होता. तो घराची कडी का उघडत नाही म्हणून कुटुंबीयांनी लोखंडी रॉड घालून कडी तोडली. गळफास घेतलेला दिसला. मोहोळ येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी आणले असता उपचारापूर्वीच मृत्यू झाला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# नव्या अर्थनीतीमुळेच देशाची अर्थव्यवस्था भक्कम

## उद्योजक राम भोगले; शिक्षण महर्षी लक्ष्मीकांत जांभोरकर स्मृति व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. ३ मार्च-**

अर्थनीती म्हणजे निव्वळ पैशांचं व्यवस्थापन नाही.तर ते देशाचे सर्वांगीण धोरण असते.म्हणूनच शिक्षण,संरक्षण,उद्योग,व्यापार व कृषी अशा सर्वच गोष्टींचा त्यात समावेश असतो. गेल्या दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या सर्व क्षेत्रात अमुलाग्र बदल केले आणि अर्थनीतीला नवे आयाम जोडले. त्यामुळेच भारताची अर्थनीती 'थोडी आगळी, पण जगावेगळी' ठरलीअसे प्रतिपादन प्रसिध्द उद्योजक राम भोगले यांनी केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची सहकारनगर येथील अरण्येश्वर प्रभात शाखा आणि विद्या विकास विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या शिक्षण महर्षी लक्ष्मीकांत जांभोरकर स्मृति व्याख्यानमालेत ते बोलत होते.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पद्मावतीनगर संघचालक अविनाश धोमकर आणि विद्या विकास प्रशालेचे अध्यक्ष विंग कमांडर विनायक डावरे (निवृत्त) यावेळी व्यासपीठावर होते.

भारताची अर्थनीती-थोडी आगळी, जगावेगळी या विषयाच्या अनुषंगाने राम भोगले यांनी गेल्या दहा वर्षात भारताने केलेल्या आर्थिक प्रगतीचा आढावा घेतला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली बदललेल्या अर्थनीतीमुळेच भारताला ही झेप घेता आली असे ते म्हणाले. मोदी राजवटीपूर्वी आणि विशेषतः स्वातंत्र्यानंतर अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी मागणी वाढवण्यावर सरकारचा भर होता.यामुळे मागणी वाढली,पण देशांतर्गत उत्पादन कमी असल्याने त्याचा फायदा चीन,अमेरिका या देशांनी घेतला.पंतप्रधान मोदीनी मात्र उत्पादनवाढीवर भर दिला. 'उत्पादन वाढवा व आपल्या वस्तू परदेशात विका' हे त्यांचे




सूत्र आहे. त्यांनी अनेक उद्योग खासगी क्षेत्रांसाठी खुले केले. त्यामुळे संरक्षण क्षेत्रातील उत्पादनेही भारत फोर्ज सारख्या कारखान्यात व्हायला लागली.मोबाईलच्या क्षेत्रात भारत जगात अग्रेसर ठरला. सरकारच्या गोदामात साठलेले धान्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गरीब जनतेला मोफत दिले पण त्याचवेळी शेतक-यांचे धान्य मोठ्या प्रमाणावर खरेदी करून शेतीविकासालाही वाव दिला. कर्ज धोरणात सुधारणा करुन बँका बळकट केल्या आणि 'मेक इन इंडिया' सारख्या योजना राबवून उद्योगांसाठी नवी क्षितीजे खुली केली. या नव्या अर्थनीतीमुळे करोनाच्या संकटानंतर जगातल्या अनेक राष्ट्रांची आर्थिक स्थिती डबघाईला आलेली असतांना भारतीय अर्थव्यवस्था मात्र प्रगतीकडे झेप घेत आहे असे राम भोगले म्हणाले. प्रारंभी डॉ शरद कुंटे यांनी प्रस्ताविकात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शताब्दी वर्षातील भूमिका मांडली. सुधीर मोघे यांनी वक्त्यांचा परिचय करुन दिला. भूषण करमरकर यांनी सूत्रसंचालन केले.

यावेळी यजुर्वेद कंठस्थ घनपारायण पूर्ण केल्याबद्दल सहकारनगरमधील वेदमूर्ती ऋतूश मंगेश याळगी यांचा उद्योजक राम भोगले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे वेगळेपण म्हणजे आर्थिक विषयाला अनुसरुन सुरुवातीला श्रीसुक्ताचे गायन करण्यात आले.मीनल गानू यांनी श्रीसुक्ताचे गायन केले तर सोनाली निबंधे यांनी श्लोकांच्या अर्थाचे वाचन केले. गौरी कुलकर्णी यांनी आभार मानले. असिमा मुजुमदार यांच्या संपूर्ण वंदेमातरम गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## महत्वाचे...



### वेळापूर इंग्लिश स्कूलमध्ये विज्ञान दिन

**वेळापूर, दि. ३ मार्च-**

वेळापूर येथील इंग्लिश स्कूल वेळापूर प्रशालेत २८ फेब्रुवारी रोजी सी. व्ही. रामन यांच्या जयंतीनिमित्त विज्ञान दिन साजरा करण्यात आला. प्रास्ताविक दिव्या मांडवे यांनी केले. अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक आर. बी. पवार हे होते. यावेळी व्यासपीठावर उपमुख्याध्यापक पठाण शिवशरण, पर्यवेक्षक सावळे बी. एस. तसेच सर्व विज्ञान शिक्षक उपस्थित होते. शिवजयंती निमित्त घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत प्रथम तीन क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गुलाब पुष्प व प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नामदेव बावचे यांनी केले तर आभार तुकाराम देवकते यांनी मानले.



### सुयश विद्यालयात विज्ञान प्रदर्शन

**बार्शी, दि. ३ मार्च-**

सुयश विद्यालय, बार्शी येथे राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यालयात भव्य विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुण्या डॉ. अमृता मांडे शेटे यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी गणेश शिंदे, विनोद ननवरे, शंकर लाखे, धिरज शेळके, शाम थोरात, विजय शिंगाडे उपस्थित होते. विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांनी प्रमुख पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यानंतर डॉ. अमृता मांडे शेटे यांच्या हस्ते फित कापून विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक संकल्पनांवर आधारित आकर्षक आणि नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केले.



### रमेश किरगत यांचा सेवानिवृत्त सन्मान

**पिलीव, दि.३ मार्च-**

पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाचे पर्यवेक्षक रमेश किरगत हे आपल्या २९ वर्ष प्रदीर्घ सेवेनंतर आज सेवानिवृत्त झाले. या सेवानिवृत्तीबददल कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात यांचा त्यांचा विशेष सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्ह्य परिषद सदस्य तथा स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य गणेश पाटील होते. कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समीतीचे सदस्य संजय पाटील, ज्येष्ठ पत्रकार दामोदर लोखंडे, शाहरुख मुलाणी उपस्थित होते. यावेळी गणेश पाटील, शेगर, जमदाडे, झाडे, मुख्याध्यापक अशोक बागल यांनी किरगत यांना शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक प्रवीण मेटकरी यांनी केले तर आभार झाडे यांनी मानले.

### बार्शीत प्रसाद शिरसीकर यांचा सत्कार

**बार्शी, दि.३ मार्च-**




प्रसाद गोपाळराव शिरसीकर महाराष्ट्र राज्य परिवहन सोलापूर विभागातील बार्शी एसटी डेपोमधून नियत वयोमानानुसार ३६ वर्ष ९ महिन्याची सेवा करुन सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांचा बार्शी आगारप्रमुख श्रीमती मधुरा जाधवर यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. प्रसाद शिरसीकर यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त ब्राह्मण महासंघ परिवाराच्यावतीनेही सत्कार करून पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.



### वखारिया विद्यालयात विज्ञान दिन

**बार्शी, दि. ३ मार्च-**

उपळे दुमाला येथील वखारिया विद्यालयात विज्ञान दिनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक दयानंद रेवडकर तर प्रमुख पाहुणे म्हणून विद्यालयाचे शिक्षक शंकर शिंदे उपस्थित होते. प्रारंभी मुख्याध्यापक आणि शिक्षक यांच्या हस्ते डॉ. सी. व्ही. रमण आणि माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. या दिवशी वक्तृत्व स्पर्धा आणि वैज्ञानिक रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विज्ञान दिन कार्यक्रमाचे संयोजन आणि परिश्रम विद्यालयातील विज्ञान शिक्षक मकरंद जगदाळे आणि रेवणसिद्ध दुलंगे यांनी केले होते. स्पर्धेचे परीक्षण अनिल वैद्य, डॉ. प्रशांत काशीद आणि अतुल राठोड यांनी केले. मकरंद जगदाळे यांनी प्रस्ताविक केले. आभार रेवणसिद्ध दुलंगे यांनी मानले. सूत्रसंचालन अमृता माने व वैभवी ठोंगे या विद्यार्थिनींनी केले.

## वर्धमान जैन सार्वजनिक वाचनालय येथे पाणपाईचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ मार्च-**



येथील श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालय बार्शी येथे आज रविवार रोजी सकाळी पाणपाईचे वाचनालयासमोर प्रमुख पाहुणे पद्मभाई कांकरिया यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष किशोर श्रीश्रीमाळ, संचालक धिरज कुंकूलोळ, आनंद सुराणा, प्रमोद भंडारी, श्री जैनाश्रमचे अध्यक्ष जयचंद सुराणा, ऑ.सेक्रेटरी ड.दिनेश श्रीश्रीमाळ, उपाध्यक्ष चंद्रकांत कोठारी, गौतमचंद बोथरा, पारस शिंगवी, इंद्रपाल कुंकूलोळ, अशोक सुराणा, विजय निलाखे व सर्व श्रावक व पदाधिकारी, संचालक मंडळ, वाचनालयाचे वाचक वर्ग व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उद्घाटक म्हणून लाभलेले प्रमुख पाहुणे पद्मभाई कांकरिया यांनी त्यांच्या ६८ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांनी □ ६,८००/- पाणपोईसाठी देणगी देण्यात आली. त्यांचे वाचनालयातर्फे आभार व्यक्त करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वाचनालयाचे ग्रंथपाल सुरेश यादव,क्लार्क विराज पतंगे यांनी परिश्रम घेतले.

## महिला दिनानिमित्त सांगोला नगरपरिषदतर्फे विविध स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि. ३ मार्च -**

स्वच्छ सर्वेक्षण २०२६ व माझी वसुंधरा ६.० अभियानांतर्गत दरवर्षीप्रमाणे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सांगोला नगरपरिषदतर्फे विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी दिली.

दि.७ मार्च रोजी स. ११ वा. महिलांच्या कलागुणांना वाव देण्याकरिता मूग व हुलगा यापासून बनवलेल्या पदार्थांच्या पाककला स्पर्धा तसेच दु.२ वा. भारतीय संस्कृतीचे प्रतिबिंब व सामाजिक संदेश या विषयावर आधारित ग्रुप डान्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. पाककला स्पर्धेतील पहिल्या तीन क्रमांकांना ५ हजार १, ३ हजार १, २ हजार १ रुपये तसेच ग्रुप डान्स स्पर्धेतील पहिल्या तीन क्रमांकांना ७ हजार १, ५ हजार १, ३ हजार १ रुपये अशी बक्षिसे, प्रशस्तीपत्र, सन्मान चिन्ह तसेच उत्तेजनार्थ बक्षीसही दिले जाणार आहेत. दि.९ मार्च रोजी होम मिनिस्टर-खेळ पैठणीचा, लकी ड्रॉ व बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन दु. १२ वाजता करण्यात आले आहे अशी माहिती नगराध्यक्ष आनंदा माने यांनी दिली.

सर्व कार्यक्रम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतीभवन येथे होणार आहेत. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी दि. ६ मार्च रोजी सायं.६ वाजेपर्यंत मो. नं. ७९७२१००३६५, ७७०९०९२२४१ वर नाव नोंदणी करावी. तरी सर्व महिलांनी उत्स्फूर्तपणे भाग घेऊन सहभाग नोंदवावा, असे आवाहन महिला व बालकल्याण समितीचे सभापती छाया मेटकरी यांनी केले.

## ज्ञानदा डोके हिचे एनएमएमएस परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ३ मार्च-**



महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने डिसेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (एन.एम.एम.एस.) परीक्षेत कन्हेरगाव (ता.माढा) येथील ज्ञानदा अतुल डोके हिने यश संपादन केले आहे. इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या या राज्यस्तरीय स्पर्धात्मक परीक्षेत तिने १७९ पैकी १२७ गुण मिळवत आपल्या गुणवत्तेची छाप पाडली आहे. तिच्या यशामागे विभागप्रमुख आर. आर. पवार, एस. बी. मोटे, शिक्षिका जरीता चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या या यशाबद्दल प्रशालेचे पर्यवेक्षक बाळासाहेब चव्हाण, मुख्याध्यापक एस. डी. रोकडे तसेच पालक संघाचे माजी अध्यक्ष दादासाहेब खोचरे यांनी तिचे अभिनंदन केले.

## वक्तृत्व व हस्ताक्षर स्पर्धेत बबनराव शिंदे विद्यालयाचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ३ मार्च-**

राजमुद्रा प्रतिष्ठान वडशिवणे आयोजित शिवजन्मोत्सव सोहळा २०२६ निमित्त तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा निबंध आणि हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अकोले खुर्द तालुका माढा येथील बबनराव शिंदे विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत यश मिळवले आहे.

यामध्ये मोठ्या गटातील प्रथम स्वराली घाडगे, द्वितीय संस्कृती मोरे, तृतीय श्रेया देवकर तर मध्यम गटात प्रथम धनलक्ष्मी नलवडे, द्वितीय ज्ञानेश्वरी डोके, तृतीय आदित्य नलवडे तर लहान गटात श्रावणी श्रीराम हिने प्रथम क्रमांक पटकावला तर हस्ताक्षर स्पर्धेत अनुष्का मोरे हिने प्रथम क्रमांक तर ऋतुजा लेंडे हिने द्वितीय क्रमांक मिळवला. स्पर्धेसाठी मंडळाचे अध्यक्ष सुहास कोडलिंगे, सचिव रेवण टकले, उत्सव समितीचे प्रमुख पृथ्वीराज



चव्हाण, उपाध्यक्ष हनुमंत माने, खजिनदार लक्ष्मण माने, सभासद शुक्राचार्य सावंत, सुनील कवडे, गणेश जगदाळे, भुजंग तोरस्कर, महेश जगदाळे, प्रवीण टकले, रोहित तोरस्कर, श्रीकांत पन्हाळकर, सोमनाथ टकले, तेजस साळुंखे, विवेक सरडे, औदुंबर अंधारे, शनिदेव वनवे, बापूसाहेब भंडारे यांनी परिश्रम घेतले.

स्पर्धेसाठी साईनाथ देवकर नागनाथ मोरे, रमेश कोडलिंगे, भैरवनाथ उघडे यांनी पर्यवेक्षक म्हणून काम पाहिले. यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य राजेंद्र ठोंबरे यांनी अभिनंदन केले आहे.

## साहित्य माणसाला जगण्याचे बळ देते

### कवी शिवाजी बंडगर; मराठी भाषा दिनानिमित्त कविता लेखन, सादरीकरण कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३ मार्च-**

साहित्य माणसाला जगण्याचे बळ देते; समाजजीवनातील विसंगतींवर भाष्य करताना विनोदाची धारही जपली पाहिजे, असे प्रतिपादन कवी शिवाजी बंडगर यांनी केले.



रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात पंढरपूर श्रमिक पत्रकार संघ व मराठी विभाग यांच्यामधील सामंजस्य करारांतर्गत मराठी भाषा गौरवदिन व कवी कुसुमाग्रज जयंतीनिमित्त कविता लेखन आणि सादरीकरण कौशल्य या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. त्यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाची सुरुवात कर्मवीर भाऊराव पाटील, रयतमाउली लक्ष्मीवहिनी व कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमांना पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. अध्यक्षीय भाषण उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे यांनी केले. प्रास्ताविक समन्वयक डॉ. दत्तात्रय डांगे यांनी केले. तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय मोनिका शिराम यांनी करून दिला. कार्यक्रमात मराठी विभागातर्फे आयोजित ग्रंथ परीक्षण व कविता सादरीकरण स्पर्धेतील विजेत्यांचा पेन, पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी डॉ. आनंद शिंदे, डॉ.अमर कांबळे, उपप्राचार्य विठ्ठल काटकर उपस्थित होते. सूत्रसंचालन पुर्वाक्षी लोंढे यांनी केले तर आभार धनश्री भोसले यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. रमेश शिंदे, प्रा. हरिभजन कांबळे, प्रा. अंकुश घुले, डॉ. बापूसाहेब घोडके, प्रा. सारिका भांगे व प्रा. मोहिनी सावंत, अभिजित जाधव, रामदास भोसले, अमोल माने यांनी परिश्रम घेतले.

## मराठी, विज्ञान दिन साजरा



### कल्याणशेट्टी महाविद्यालय, अक्कलकोट

प्रख्यात साहित्यिक वि.वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीनिमित्त मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विविध कार्यक्रम जल्लोषात साजरी करण्यात आले. प्रारंभी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी मराठी विभाग प्रमुख प्रा.भीम सोनकांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा ओंकार घिवारे यांनी केले आभार प्राध्यापिका शितल फुटाणे यांनी मानले यावेळी डॉ बाळासाहेब पाटील, प्रा हर्षदा गायकवाड, सोनाली कटकधोंड उपस्थित होते. मराठी विभागाने आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेसाठी माझ्या मराठीची बोल कौतुके, अक्कलकोटचा विकास, आला पावसाळा, अभिजात मराठी माय मराठी असे विषय देण्यात आले होते. स्पर्धेमध्ये ४२ विद्यार्थी सहभाग घेऊन मराठी भाषेचा गौरव केला.



### शंकरलिंग प्रशाला, वळसंग

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत मराठी राजभाषा गौरव दिन कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य वीरेश थळंगे तर प्रमुख पाहुणे म्हणून पर्यवेक्षक शिवानंद घोडके, सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमादार, संजयकुमार धनशेट्टी, विजयलक्ष्मी थळंगे, सिदधाराम भैरामडगी, शैला निंबाळ, निलकंठ कवटगी हे उपस्थित होते. उपस्थित सर्वांचे स्वागत कलाशिक्षक अजय माणकोजी,वैभवी जाधव व इयत्ता नववीच्या विद्यार्थिनींनी स्वागतगीताने केले. याप्रसंगी सावित्रीबाई फुले, कविवर्य व नाटककार विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करुन थोर लेखक, कवी, साहित्यिक व संतांच्या चित्रांच्या भितीपत्रिकेचे फीत कापून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. श्वेता वळसंगे हिने प्रास्ताविक केले. यावेळी विद्यार्थ्यांनी काव्यवाचन, विनोद व मराठी गाण्यांवर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी बसवराज दुधगी, गंगा बागलकोटी, अजय माणको, सिध्दारुढ हिरेमठ, संतोष कस्तुरे, विजय प्याटी, मल्लिनाथ गौडगाव, कट्टेप्पा कोळी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन साईगंधा जमादार व समृद्धी साळे यांनी केले तर आभार प्राची मोटगी हिने मानले.

### अध्यापिका विद्यालय, बार्शी

येथील अध्यापिका विद्यालयात कुसुमाग्रज यांची जयंती मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरी करण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. सोमनाथ देंडे तर अध्यक्ष म्हणून प्रा. बजरंग वाघमोडे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती प्रतिमा पूजन व कुसुमाग्रज यांच्या फोटोला पुष्पहार अर्पण करुन करण्यात आली. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य जीवन लोखंडे यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर विद्यार्थिनींनी विविध कार्यक्रमाचे सादरीकरण केले. कार्यक्रमास प्रा. अशोक घुले व प्रा. प्रमोद मांडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रा. सुभाष माळी यांनी तर सूत्रसंचालन प्रा. रतिकांत हामणे यांनी केले.

### शिवाजी महाविद्यालय, बार्शी

जीवनाच्या विविध क्षेत्रात अचूक आणि उत्तम संवाद साधता येण्यासाठी नियमित वाचन सराव आवश्यक आहे, असे मत सोलापूर आकाशवाणी केंद्राचे निवृत्त निवेदक अभिराम सराफ यांनी व्यक्त केले. येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्यावतीने आयोजित मराठी भाषा गौरव दिनाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अब्दुल शेख होते. यावेळी मराठी विभाग प्रमुख डॉ. बिरा पारसे, डॉ. रविकांत शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीला संगीत विभागाचे डॉ. जयभीम शिंदे आणि विद्यार्थ्यांनी लाभले आम्हास... हे गीत सादर केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. भरतकुमार जसाभाटी, प्रा. जितेंद्र ननवरे आदींनी प्रयत्न केले. प्रास्ताविक डॉ. रविकांत शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. किशोर गरड यांनी तर आभार डॉ. विजयश्री गवळी यांनी मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# ‘कांदा गडगडला’ दर ६५० प्रति क्विंटल

## ●प्रतिएकरी १.०२ लाख खर्च; ६३ हजार ४० हजार रुपयांचा फटका
## ●कांदा लागवडीपासून काढणीपर्यंतचा खर्चाचा वाढता आलेख

**तभा, वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ मार्च-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे गेल्या काही दिवसांपासून कांद्याच्या दरात झालेल्या तीव्र घसरणीमुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. दर कोसळल्याने सोलापुरात ‘कांद्यावरून वांदा’ निर्माण झाला असून आंदोलनाची ठिणगी आता मोठ्या संघर्षात परिवर्तित होताना दिसत आहे. काही दिवसांपूर्वी शेतकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे कांदा लिलाव बंद पाडत बाजार समिती प्रशासनाचे लक्ष वेधले. मंगळवारी सोलापूर बाजार समितीत कांद्याची आवक २२१ ट्रक इतके आली होती त्या कांद्याला सर्वसाधारण ६५० रुपये, कमाल १,६५० तर किमान १०० रुपये प्रति क्विंटल दर मिळाला.

दरम्यान, स्वाभिमानी शेतकरी संघटना यांनीही या प्रश्नात उडी घेतली आहे. शिमग्या दिवशीच कांदा लिलाव बंद करून बोंबाबोंब आंदोलन केले. सरकारने शेतकऱ्याला कांदा अनुदान तसेच कांदा हमीभाव द्यावा अशा आशयाचे निवेदन सादर केले आहे. शेतकऱ्यांनी देखील आक्रमक पवित्रा घेत,

बाजारात यापूर्वी देखील हेच दर होते, आता देखील हेच दर आहेत. मात्र महागाई वाढल्याने कांदा लागवडीपासून ते काढणीपर्यंतचा खर्च लाखोंच्या घरात जातोय, मात्र उत्पन्न तुटपूज स्वरूपाचे मिळत आहे. ज्या प्रमाणे महागाई वाढते आहे. त्याच प्रमाणात कांद्याचे दर देखील वाढावेत अशी अपेक्षा तरुण शेतकऱ्यांमधून व्यक्त केली जात आहे.

**प्रतिएकरी १.०२ लाख खर्च; हातात केवळ ६३ हजार, ४० हजारांचा फटका**

सोलापूर जिल्ह्यात यंदा कांद्याचे उत्पादन भरघोस झाले असले, तरी बाजारभाव कोसळल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडले आहे. प्रतिएकरी सुमारे १ लाख २ हजार रुपयांपर्यंत भांडवली खर्च करूनही शेतकऱ्यांच्या हातात अवघे ६३ हजार रुपये पडत असल्याची वस्तुस्थिती आहे. परिणामी चार महिने रात्रंदिवस केलेले श्रम आणि भांडवलातील ३५ ते ४० हजार रुपये दोन्ही बुडाल्याची स्थिती निर्माण झाली आहे. सोलापुरातील कृषी विज्ञान केंद्र, सोलापूर यांच्या आकडेवारीनुसार एका एकरासाठी ६२ हजारांपासून ते एक लाख रुपयांहून अधिक खर्च येतो. यात शेतकऱ्यांच्या स्वतःच्या श्रमाचे मोल गृहित धरलेले नाही. केंद्राच्या नोंदीनुसार कांद्याची सरासरी उत्पादकता २० क्विंटल आहे. सध्याच्या बाजारभावानुसार शेतकऱ्यांना प्रतिकिलो सुमारे ६ ते ७ रुपये दर मिळत आहे. या दरानुसार प्रतिएकरी उत्पन्न सुमारे ६३ हजार रुपयांपर्यंतच मर्यादित राहते.उत्पादन खर्च आणि बाजारभाव यांचे गणित मांडल्यास शेतकऱ्याला प्रतिएकरी सुमारे ४० हजार रुपयांची पदरमोड सहन करावी लागत आहे.

**कांदा लागवडीचा खर्चाचा वाढता आलेख**

रोपवाटिका तयार करणे, बियाणे, शेणखत, मजुरी यासाठी सुमारे १४ हजार रुपये खर्च येतो. लागवडीसाठी वाफे तयार करणे आणि मजुरी मिळून सुमारे १३ हजार ५०० रुपये खर्च होतो. पीक संवर्धनासाठी खतांचे हप्ते, फवारणी, खुरपणी यावर तब्बल ५१ हजारांहून अधिक खर्च होतो. काढणी, पिशव्या आणि वाहतूक यासाठी आणखी २४ हजार रुपयांचा खर्च येतो. अशा प्रकारे एकूण खर्च १ लाख ०२ हजारांपर्यंत पोहोचतो. विपरीत हवामान किंवा कीड-रोगांचा प्रादुर्भाव वाढल्यास हा खर्च आणखी वाढतो. सध्याच्या तोट्यामुळे कांदा उत्पादक कर्जाच्या खाईत लोटले जाण्याची भीती व्यक्त होत आहे. सरकारने तातडीने हस्तक्षेप करून दिलासा द्यावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.





# कांद्याचा वांदा; बोंबाबोंब आंदोलन

## ●कांद्याला न्याय द्या; शेतकरी संघटनेने फोडला वाचा
## ●शिमग्या दिवशी केले बाजार समितीमध्ये आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ मार्च-**

स्वाभिमानी शेतकरी संघटनाच्या वतीने सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती (मार्केट यार्ड, सोलापूर) येथे कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी तीव्र आंदोलन करण्यात आले.यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने कांद्याला प्रति क्विंटल ३००० रुपये अनुदान जाहीर करावे, कांदा निर्यातीवरील शुल्क तात्काळ रद्द करावे तसेच कांद्याला किमान ४५०० रुपये हमीभाव द्यावा, अशा प्रमुख मागण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने शिमग्या दिवशी बोंबाबोंब आंदोलन करत बाजार समितीचा लिलाव काही काळ बंद ठेवला.

यावेळी विविध मागण्यांचे निवेदन संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय रणदिवे यांनी बाजार समितीचे सचिव अतुल सिंग राजपूत यांच्याकडे सुपूर्द केले. दरम्यान राज्यामध्ये तसेच सोलापूर जिल्ह्यामध्ये गेल्या काही दिवसांपासून, कांद्याला समाधानकारक दर मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली असतानाही बाजारात मिळणारा दर अत्यंत कमी असल्याने शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने ठोस निर्णय घ्यावेत, या मागणीसाठी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह मोठ्या संख्येने शेतकरी आंदोलनात सहभागी झाले होते. आंदोलना दरम्यान शेतकऱ्यांनी घोषणाबाजी करत सरकारचे लक्ष वेधले. संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय रणदिवे यांनी सांगितले की, कांदा पिकासाठी बियाणे, खत, औषधे, मजुरी आणि वाहतूक खर्चात मोठी वाढ झाली आहे. मात्र बाजारात दर घसरल्याने शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही निघत नाही. त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेतला नाही, तर आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला. यावेळी तरुण शेतकरी दिनेश भोसले यांनी कांद्याचे पडत्या दरावर सरकारने हस्तक्षेप करावा. आमच्या वडीलांपासून आता पर्यंत कांद्याचे दर ७०० ते १ हजार रुपये पर्यंतच आहेत. वास्तविक पाहता महागाई वाढत असताना कांद्याचे दर वाढणे देखील अपेक्षित आहे. परंतु तसे होताना दिसत नाही. आजच्या घडीला कांदा पिकवण्याचा आणि काढण्यापर्यंतचा खर्च एकरी लाखापर्यंत जातो. परंतु शेतकऱ्यांच्या पदरी तुटपूंजी रक्कम मिळते. त्यामुळे शेतकऱ्यांना अनुदान तसेच हमीभाव देऊन अर्थसाह्य करण्याची मागणी केली.यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी सदस्य तसेच आंदोलन करते शेतकरी उपस्थित होते.

## महत्वाचे...



### पंचायत समिती कार्यालयात आढावा बैठक

**वेळापूर, दि. ३ मार्च-**

माळशिरस तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी माळशिरस पंचायत समिती येथे महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीस तालुक्याचे आमदार उत्तमराव जानकर उपस्थित राहून विविध विकासकामे व शासकीय योजनांचा सखोल आढावा घेतला. तालुक्यातील सुरू असलेली व प्रस्तावित विकास कामे, पाणीपुरवठा योजना, येणाऱ्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर टँकरद्वारे पाणीपुरवठा नियोजन, संभाव्य दुष्काळ परिस्थिती, घरकुल लाभार्थ्यांच्या अडचणी तसेच लागवड, आनंद व पानंद रस्त्यांची कामे यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. आमदार जानकर यांनी सर्व कामांना गती देत नागरिक, शेतकरी व लाभार्थ्यांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी प्रशासनाने समन्वयाने व जबाबदारीने काम करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. बैठकीस गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे, जिल्हा परिषद सदस्य गौतम आबा माने, विष्णुपंत नारनरवर, मारुती लोंढे, मिलिंद सरतापे, माजी सभापती मच्छिंद्रआबा ठवरे, पंचायत समिती सदस्य ॲड. प्रवीण वाघमोडे, युवराज झंजे, बाबा माने, महादेव साबळे, मधुकर पाटील, राजेंद्र पाटील तसेच वेळापूर ग्रामपंचायत सदस्य डॉ. स्नेहल जीवनराव जानकर, पांडुरंग वाघमोडे उपस्थित होते.

### नियमबाह्य सायलेन्सर मोडिफाय करून बसवू नये : सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे

**पंढरपूर, दि. ३ मार्च-**

पंढरपुरात बुलेट दुचाकीधारकांकडून कंपनीने नियमानुसार दिलेले सायलेन्सर काढून त्याऐवजी मोठ्या कर्कश आवाजाचे नियमबाह्य सायलेन्सर बसविण्याचे प्रकार वाढले असून, त्यामुळे ध्वनी प्रदूषणात मोठी वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे. शहर व परिसरातील नागरिकांनी आपल्या दुचाकी, विशेषतः बुलेट वाहनांवर कंपनीने नियमाप्रमाणे दिलेले सायलेन्सरच वापरावेत. मोठ्या कर्कश आवाजाचे,



नियमबाह्य सायलेन्सर मोडिफाय करून बसवू नयेत, असे आवाहन सहा. पोलिस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी केले आहे. बुलेट सायलन्सरमधील फेरफारामुळे ध्वनीप्रदूषणात वाढ होत असून नागरिकांना विशेषतः रात्रीच्या वेळी त्रास सहन करावा लागतो. या कर्कश आवाजामुळे ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, रुग्ण, महिला तसेच सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. शहरात बुलेट दुचाकीच्या सायलन्सर मध्ये बदल करुन मोठा आवाज करणाऱ्यांवर वाहतूक शाखेकडून विशेष मोहिम राबविण्यात येत असून नागरिकांनी दुचाकी वाहनांवर कंपनीने नियमाप्रमाणे दिलेले सायलेन्सरच वापरावेत.नियमांचे उल्लंघन करणाऱ्यां विरोधात ध्वनी प्रदुषण नियम व पर्यावरण संरक्षणअधिनियम अंतर्गत कारवाई करण्यात येईल.



### विज्ञानामुळे मानवाचे जीवन सुखकारक व विकसित : योगेश लंगुटे

**करकंब, दि.३ मार्च-**

विज्ञानामुळे प्रत्येकाचे जीवन सुकर झाले असून विज्ञानाचा वापर जीवनात प्रगती व विकास करण्यासाठी करावा. आपले जीवन समृद्ध करावे. अंधश्रद्धा नष्ट करण्यासाठी प्रत्येकाने दैनंदिन जीवन जगताना वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवणे आवश्यक आहे, असे मनोगत करकंब पोलीस स्टेशन सपोनि योगेश लंगुटे यांनी व्यक्त केले. करकंब येथील रामभाऊ जोशी हायस्कूल येथे राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनाच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. पर्यवेक्षक धनवंत करळे, विज्ञान शिक्षिका मनिषा ढोबळे यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माधव कांबळे, रमेश कविटकर सुभाष चौगुले, अर्जुन भंडारे, संगीता काळे आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन अतुल अभंगराव यांनी केले.

# बार्शी पोलिसांची अनधिकृत भोंग्यांवर कारवाई

## ▸▸सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार धार्मिक स्थळांवरील ध्वनीवर्धक उतरविले

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.३ मार्च-**

बार्शी शहर पोलीस ठाण्याच्यावतीने आज शहरात अनधिकृत भोंगे (ध्वनीवर्धक) हटविण्याची विशेष मोहीम राबविण्यात आली. धार्मिक स्थळांवरील ध्वनीप्रदूषणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने जाहीर केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुषंगाने ही कारवाई करण्यात आली. यापूर्वी सर्व धर्मांच्या प्रार्थनास्थळांच्या प्रतिनिधींशी शांतता बैठक घेऊन आवश्यक सूचना देण्यात आल्या होत्या.

दि. २२ फेब्रुवारी रोजी शहरात घडलेल्या एका घटनेनंतर निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी बार्शी पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक बोलावून धार्मिक स्थळांवरील अनधिकृत भोंगे काढण्याबाबत स्पष्ट निर्देश दिले होते.

त्या अनुषंगाने दि. २८ फेब्रुवारी रोजी पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी आपल्या पथकासह शहरातील विविध धार्मिकस्थळांची तपासणी केली. या मोहिमेत एकूण ११



मशिदींची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी ८ मशिदींवरील १४ भोंगे उतरविण्यात आले. तसेच ५ मंदिरांवरील ८ भोंगे काढण्यात आले. अशा प्रकारे एकूण २२ अनधिकृत भोंगे (ध्वनीवर्धक) हटविण्यात आले असून शहर ध्वनी प्रदूषणमुक्त करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर व उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. मोहिमेत सहाय्यक पोलीस निरीक्षक समीर ढोरे, पोलीस उपनिरीक्षक महेश गळगटे, मपोसी सोनम जगताप, एएसआय अजित वरपे तसेच इतर पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते. बार्शी शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी न्यायालयाच्या आदेशांचे काटेकोर पालन करण्यासाठी अशी कारवाई पुढेही सातत्याने सुरु राहणार असल्याचे पोलीस प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.



# ७ मार्चपर्यंत चंचला खरात यांचे ‘चित्रस्पर्श’ प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

डफरीन चौकातील पु. ना. गाडगीळ ॲड सन्सच्या झपुर्झा आर्ट गॅलरीत प्रसिद्ध चित्रकार सचिन खरात यांच्या मातोश्री चंचला खरात यांच्या चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन उत्साही वातावरणात करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, कलाप्रेमी उद्योजक किशोर चंडक, आस्था रोटी बँकेचे संस्थापक विजय छंचुरे आदी उपस्थित होते. यावेळी सचिन खरात, चंचला खरात, आनंद खरात आदी उपस्थित होते. दीपप्रज्वलन करून मान्यवरांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. हे चित्र प्रदर्शन डफरीन चौकातील पु.ना. गाडगीळ ॲन्ड सन्सच्या वरच्या मजल्यावर झपुर्झा आर्ट गॅलरीत दि. ७ मार्च पर्यंत सकाळी ११ ते रात्री ८.३० पर्यंत प्रेक्षकांना पाहता येणार आहे. या चित्रांच्या विक्रीतून आलेल्यापैकी २५ टक्के रक्कम आस्था रोटी बँकेला देण्यात येणार आहे, असे सांगण्यात आले.



# सैनिक शाळा स्पर्धा : उपळाई शाळेच्या विद्यार्थ्यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ मार्च-**

सैनिक शाळा स्पर्धा परीक्षेत गुणवत्तेत तालुक्यात अग्रेसर असणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंबर २ उपळाई (ठों) येथील ३ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

नॅशनल टेस्टिंग एजन्सीमार्फत घेण्यात आलेल्या ऑल इंडिया सैनिक स्कूल एन्ट्रान्स एक्सामिनेशनमध्ये शाळेतील मल्हार सदावर्ते- २४८ गुण, सर्वज्ञ वाघ- २४ गुण ऋषिकेश बरचे- २१९ गुण या विद्यार्थ्यांनी यश मिळविले आहे. यशाबद्दल मुख्याध्यापक अनिल काळे यांनी या तीन विद्यार्थ्यांचा व मार्गदर्शक शिक्षिका दिपाली गोरे यांचा सत्कार केला. शाळेने मिळविलेल्या या यशाबद्दल तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी बालाजी नाटके, विस्ताराधिकारी भारत बावकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सविता भोंग, उपाध्यक्ष योगीता सदावर्ते यांनी अभिनंदन केले आहे.



# रंगपंचमीदिवशी मद्य विक्री बंद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

जिल्हयात साजऱ्या होणा-या रंगपंचमी उत्सव सणानिमित्त सार्वजनिक शांतता राखणे आवश्यक असल्याने रविवार, दि. ८ मार्च रोजी जिल्हयातील सर्व देशी, विदेशी मद्य विक्री दुकाने, व ताडी दुकाने पूर्ण दिवस बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी निर्गमित केले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणा-याविरुध्द कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असा इशारा जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दिला आहे.



# पोलिस मुख्यालयात फॉरेन्सिक सायन्स, फिंगरप्रिंट डेव्हलपमेंट विषयी कार्यशाळा

## १०० अधिकारी, अंमलदारांचा सक्रिय सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ मार्च-**

फॉरेन्सिक सायन्स व फिंगरप्रिंट डेव्हलपमेंट या विषयावर पोलिस मुख्यालयात विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० अधिकारी व अंमलदारांनी यात सक्रीय सहभाग नोंदविला होता. फॉरेन्सिक सायन्सचे तपासातील महत्त्व, घटनास्थळी पुरावे जतन करण्याची पध्दत, फिंगरप्रिंट डेव्हलपमेंट तंत्रज्ञान, वैज्ञानिक तपास पध्दती, तपास करताना घ्यावयाची काळजी याविषयी माहिती देण्यात आली.

दरम्यान, आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने गुन्ह्यांचा उलगडा जलद व अचूक पध्दतीने कसा करता येतो, याबाबत प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, पोलिस निरीक्षक संजय जगताप, सहाय्यक पोलिस निरीक्षक अनिल सनगल्ले, सत्यम गाडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

**भक्कम पुरावे सादर**

वैज्ञानिक तपास पद्धतींचा प्रभावी वापर केल्यास गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण वाढते. न्यायालयीन प्रक्रियेत भक्कम पुरावे सादर करता येतात, असे पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी यावेळी सांगितले.

# युध्दजन्य भागात अडकलेल्या काही लोकांना मायदेशी आणले!

**मंत्रालय नियंत्रण कक्षाची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

इराण-इराक या देशांमध्ये संभाव्य युद्धजन्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन सोलापूर जिल्हा प्रशासनामार्फत नागरिकांसाठी आवश्यक सूचना जारी करण्यात येत आहेत. जिल्ह्यातील नागरिकांचे नातेवाईक अथवा परिचित इराण किंवा इराक येथे वास्तव्यास असल्यास त्यांच्या सुरक्षिततेबाबत किंवा इतर कोणत्याही बाबतीत माहिती आवश्यक असल्यास संबंधितांनी जिल्हा प्रशासनाने स्थापन केलेल्या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

याबाबत मुंबई मंत्रालय कक्षातून मिळालेल्या माहितीनुसार जिथे विमानसेवा शक्य आहे; त्या ठिकाणाहून भारतीय विमानसेवेद्वारे काही लोकांना विदेशातून मायदेशी आणण्यात आल्याचे सांगण्यात आले. या संदर्भात मंत्रालय, मुंबई येथील आपत्कालीन संचालन केंद्राने सांगितले की, आपल्या राज्याच्या विविध भागातून विदेशात नोकरीसाठी किंवा पर्यटनासाठी गेलेले अजून ७०० पर्यंत लोक युध्दजन्य राष्ट्रात अडकलेले आहेत. जिथे विमानसेवा शक्य आहे अशा काही भागातून भारतीय विमानसेवेच्या कर्मचाऱ्यांनी काहीजणांना आणले आहे. सोमवारी रात्री दिल्ली, मुंबई, कोचीन आणि बेंगलोर अशा भागात ४ विमानातून लोक आपल्या मायदेशी आले आहेत. अजून आजही काही लोकांना आणण्याचा प्रयत्न सुरूच आहे. तरीही कोणत्याही नागरिकाकडून इराण-इराक येथे वास्तव्यास असलेल्या व्यक्तींबाबत चौकशी प्राप्त झाल्यास मंत्रालय नियंत्रण कक्षामार्फत संबंधित भारतीय दूतावासाशी संपर्क साधून त्या व्यक्तींच्या सुरक्षिततेबाबत माहिती प्राप्त करून ती संबंधितांना कळविण्यात येईल. सदर बाबीची नोंद घेऊन नागरिकांनी आवश्यकतेनुसार खालील नियंत्रण कक्षांशी संपर्क साधा, असेही आवाहन मंत्रालय स्तरावरील अधिकाऱ्यांनी यांनी केले आहे.

| नियंत्रण कक्ष संपर्क क्रमांक | |
|---|---|
| जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर नियंत्रण कक्ष | ०२१७-२७३१०१२ |
| सोलापूर पोलीस शहर नियंत्रण कक्ष | ०२१७ - २७४४६०० / २७४४६२० |
| सोलापूर पोलिस ग्रामीण नियत्रंण कक्ष | ०२१७- २७३२००० |
| मंत्रालय कक्ष, मुंबई | ९३२१५९०५६ |

**भारतीय नागरिकांसाठी सुरक्षा ॲडव्हायझरी जारी**

मध्यपूर्व व परिसरातील काही देशांमध्ये निर्माण झालेल्या तणावपूर्ण प्रादेशिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारच्या संबंधित दूतावासांनी तेथे वास्तव्यास असलेल्या भारतीय नागरिकांसाठी सुरक्षा ॲडव्हायझरी जारी केली आहे. या अनुषंगाने पॅलेस्टाईन (रामल्ला), कतार (दोहा), सौदी अरेबिया (रियाध), इस्त्रायल (तेल अवीव), इराण (तेहरान), इराक (बगदाद) कुवैत, बाहरीन, मस्कत, जॉर्डन आणि संयुक्त अरब अमिरात (अबू धाबी) येथे वास्तव्यास असलेल्या सर्व भारतीय नागरिकांनी सतर्क राहावे, अनावश्यक हालचाल टाळावी आणि स्थानिक प्रशासन तसेच भारतीय दूतावासांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे.

सोलापूर जिल्ह्यातून युध्दजन्य भागात अजून ७ ते ८ जण अडकल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडे आली आहे. हे लोक सुरक्षित असून, त्यांना मायदेशी आणण्यासाठी राज्य आणि देश पातळीवरील संबंधित विभागाकडून प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, जिल्ह्यातील नागरिकांचे नातेवाईक अथवा परिचित इराण किंवा इराक येथे वास्तव्यास असल्यास त्यांच्या सुरक्षिततेबाबत किंवा इतर कोणत्याही बाबतीत माहिती आवश्यक असल्यास संबंधितांनी जिल्हा प्रशासनाने स्थापन केलेल्या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांनी केले आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# आव्हानांच्या उंबरठ्यावर...

कोणत्याही दोन देशांमधील संघर्ष, युद्ध किंवा शीतयुद्ध यांचे जागतिक परिणाम भयावह असतात. अशा संघर्षांमध्ये जीवितहानी तर होतेच; त्यामुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक व भौगोलिक अस्थिरतेचे परिणाम जगाला दीर्घकाळ भोगावे लागतात. आजवर जगात जेवढी युद्धे, संघर्ष किंवा शीतयुद्धे भडकली, त्यामध्ये अमेरिकेची भूमिका अनेकदा केंद्रस्थानी राहिली शिरावर आहे. अमेरिकेने बजावलेल्या भूमिकांची परिणतीही अनेकदा युद्धस्थिती निर्माण होण्यात झाली आहे. आता इराणविरुद्धच्या अमेरिका आणि इस्रायलच्या कारवाईने या इतिहासाची पुनरावृत्ती झाली आहे. 'योगक्षेमं वहाम्यहम' ही अमेरिकेची स्वयंघोषित भूमिका म्हणजे त्या देशाच्या महासत्तेचा दबाव असल्याने अनेक राष्ट्रांमध्ये परस्परांविरोधातील युद्धाचे प्रसंग ओढवले. लोकशाही किंवा शांतता प्रस्थापित करण्याच्या अमेरिकेच्या उद्देशास फारच मर्यादित यश मिळालेले दिसते. इराणविरुद्धच्या कारवाईनंतर त्या देशात अमेरिकेच्या इच्छेप्रमाणे कदाचित सत्तांतर होईलही, पण शांतता प्रस्थापित करण्याचा अमेरिकेचा जगाला दाखविण्याचा उद्देश सफल होईलच, याची मात्र खात्री नाही. काही राष्ट्रांकडे असलेली विनाशकारी शस्त्रे जागतिक शांततेसाठी धोकादायक असल्याचे किंवा काही राष्ट्रांतील दहशतवादी कारवायांमुळे जागतिक सुरक्षितता संकटात असल्याच्या जाणिवेमुळे अमेरिकेने यापूर्वी केलेल्या लष्करी कारवायांचे मर्यादित यश पाहता, इराणविरुद्धच्या कारवाईत पूर्ण यश मिळेल आणि जागतिक शांततेचे नवे पर्व सुरू होईल, अशी अपेक्षा करणे काहीसे घाईचेच ठरेल. सुमारे अडीच दशकांपूर्वी सन २००३ मध्ये अमेरिकेने इराकवरील सद्दाम हुसेन यांना सत्ताभ्रष्ट करून इराकच्या ताफ्यातील विनाशकारी अस्त्रे नष्ट करण्याच्या उद्देशाने केलेल्या कारवाईमागे, इराकमध्ये लोकशाही प्रस्थापित करण्याचा उद्देश असल्याचे सांगितले जात होते. त्या कारवाईनुसार सद्दाम हुसेन यांना सत्ताभ्रष्ट करून फासावर चढविण्यात आले; त्या कारवाईत व त्यानंतर माजलेल्या यादवीमध्ये लाखो इराकी नागरिक व हजारो अमेरिकी सैनिकांना आपले प्राण गमवावे लागले. इराकमध्ये भीषण गृहयुद्ध पेटून आयसिससारख्या कट्टरवादी संघटनांचा उदय झाला व इराणचा इराकवरील प्रभाव वाढला. त्यामुळे अमेरिकेने ज्या उद्देशाने ते युद्ध पुकारले तो उद्देश तर सफल झाला नाहीच; उलट संपूर्ण इराकमध्ये शोध घेऊनही एकही विनाशकारी अस्त्र न सापडल्याने अमेरिकेच्या नैतिकतेवरच प्रश्नचिन्ह उमटवले गेले. गेल्या शतकातील १९५५ मधील व्हिएतनामविरुद्धच्या लष्करी कारवाईपासून सुरू झालेला अमेरिकी हस्तक्षेपाचा हा इतिहास आज इराणविरुद्धच्या ताज्या कारवाईपर्यंत येऊन ठेपला आहे. अशा प्रत्येक लष्करी कारवाईमुळे जगावर संमिश्र परिणाम झाले आहेत. अनेक देशांतील सत्तांतरे अमेरिकेच्या इच्छेनुसार घडली. तेथे स्थिर सरकारे स्थापन करण्यात अमेरिका अपयशी ठरली. इराक, सीरिया आणि अफगाणिस्तानातील युद्धांमुळे लाखो लोकांना देश सोडून स्थलांतर करावे लागले. जगाचा पोलिस म्हणून पुढाकार घेण्याच्या अमेरिकेच्या धोरणामुळे अनेक देशांत अमेरिकेविरुद्ध तीव्र नाराजी निर्माण झालेली पाहावयास मिळते. १९४७ ते १९९१ या साडेचार दशकांच्या काळातील अमेरिका व सोव्हिएत युनियन यांच्यातील शीतयुद्धाचा इतिहास फारसा कल्याणकारी नाहीच; यातून काही दहशतवादी संघटनांचा जन्म होऊन त्या संघटना जगासाठी डोकेदुखी ठरल्याचे स्पष्ट झाले आहे.

अमेरिकेच्या लष्करी कारवायांचा हा इतिहास पाहता इराणविरुद्धच्या कारवाईचे दीर्घकालीन परिणाम जगाला भोगावे लागणार, हे स्पष्ट आहे. इराण युद्धामुळे होणारे आर्थिक-सामाजिक परिणाम केवळ मध्यपूर्वेपुरते मर्यादित राहणार नाहीत. ऊर्जा, समुद्री मार्ग, महासत्तांचे हितसंबंध, पश्चिम आशियातील भारताचे स्थान यामुळे त्याचे राजकीय, आर्थिक आणि सामाजिक पडसाद जगभर उमटत राहणार आहेत. कारण इराण हा पश्चिम आशियातील एक महत्त्वाचा घटक आहे. अमेरिका, इस्रायल, रशिया, चीन यांचे हितसंबंध या देशाशी जोडले गेलेले असल्याने हा संघर्ष प्रादेशिक न राहत महाशक्तींच्या युद्धापर्यंत जाऊ शकतो आणि मध्यपूर्व हा सातत्याने अशांत टापू राहू शकतो. इराण-सौदी, इराण-इस्रायल यांच्यातील तणाव वाढल्यास संपूर्ण आखाती क्षेत्र अस्थिर होईल व त्याचा परिणाम या देशांच्या अंतर्गत राजकारणावरही पाहावयास मिळेल. इराण हा जगातील एक मोठा तेल उत्पादक असल्याने जागतिक तेलपुरवठ्यावर त्याचे परिणाम होऊन तेलाच्या किमती भडकतील, असा अंदाज वर्तविला जात आहे. जेव्हा इंधन किंवा ऊर्जेच्या किमती वाढतात, तेव्हा जागतिक मंदीचा धोका तीव्र होतो. साहजिकच महागाई भडकते आणि कर्जे महागल्याने उत्पादन खर्च वाढून उत्पादनात घट होते. त्यामुळे बेरोजगारीची समस्या तीव्र होते आणि जागतिक मंदी भडकून आर्थिक अस्थिरतेचा मोठा फटका विशेषतः अविकसित किंवा विकसनशील देशांना सोसावा लागतो. असे संघर्ष भडकतात तेव्हा स्थलांतराची समस्या उग्र होते. शरणार्थी म्हणून अन्य देशांच्या दिशेने वाढणाऱ्या लोंढ्यांचा ताण वाढतो. सध्याचा काळ समाजमाध्यमांच्या प्रभावाखाली वाटचाल करतो आहे. अशा अस्थिर परिस्थितीचा फायदा घेऊन समाजमाध्यमांवरील माहितीयुद्धे भडकल्यास त्याला वार घालण्याचे मोठे आव्हान यापुढच्या काळात जगासमोर उभे ठाकणार आहे.

अमेरिका-इस्रायलचे इराणविरुद्धचे युद्ध हा केवळ एका देशावरील कारवाईपुरता मर्यादित मुद्दा नाही. तो केवळ एका देशाचा संघर्ष ठरणार नाही. हे युद्ध म्हणजे ऊर्जा-इंधनाचे राजकारण, धार्मिक ध्रुवीकरण आणि महासत्तांच्या सत्तास्पर्धेचे केंद्रबिंदू ठरू शकेल. तसे झाल्यास भारताच्या दृष्टीने तो काहीसा आव्हानात्मक काळ ठरू शकतो. कारण इंधन सुरक्षितता, परराष्ट्र धोरणाचे संतुलन आणि देशांतर्गत आर्थिक स्थैर्य यांच्या कसोटीच्या काळात भारतास केवळ प्रतिक्रियात्मक नव्हे, तर बहुपदरी धोरण स्वीकारावे लागेल. कोणत्याही गटात उघडपणे न झुकता संवादाच्या आग्रहावर भर देत इराण, इस्रायल, अमेरिका आणि रशियासारख्या देशांसोबतचे आंतरराष्ट्रीय संबंध जपण्याच्या धोरणाची कसोटी भारतास पार पाडावी लागणार आहे. या सर्व देशांसोबतची संवादरेषा टिकविणे ही भारताची गरज आहे. यापैकी अनेक देशांमध्ये भारतीय समाजाचे मोठ्या प्रमाणावर वास्तव्य आहे. त्यामुळे त्यांची सुरक्षितता लक्षात घेऊन सुरक्षा सहकार्य वाढविण्याच्या दृष्टीने आखाती देशांसोबतचा समन्वय राखण्यास प्राधान्य द्यावे लागेल आणि ऊर्जा सुरक्षेचा नवा आराखडा आखावा लागेल. येत्या काळात भारतामध्ये तेलसाठ्याच्या स्थितीचा संतुलन राखण्याकरिता दीर्घकालीन धोरण आखण्यावर व सौर, हरित, हायड्रोजन, जैवइंधन आदी पर्यायी ऊर्जास्रोतांच्या निर्मितीस प्राधान्य देण्यावर भारताचा भर राहील. कोणत्याही युद्धस्थितीचे काही सामाजिक परिणाम साहजिकच आर्थिक स्थैर्याविरही होत असतात. युद्धस्थितीत महागाई भडकते, मंदीच्या सावटामुळे उत्पादन घटते, बेरोजगारी वाढते आणि टंचाईसारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. याला तोंड देण्यासाठी आवश्यक वस्तूंच्या वितरणाचे योग्य समायोजन करणे, सार्वजनिक वितरण प्रणाली मजबूत करणे हीदेखील गरज ठरू शकते. परकीय चलनसाठा मजबूत ठेवण्यासाठी उपाययोजना आखणे, महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी तात्पुरत्या उपाययोजना, बचतीची साधने वाढविणे आणि उद्योगांना प्रोत्साहन देऊन परिस्थितीस सामोरे जाण्याचे धैर्य रुजविणे ही कोणत्याही देशाची जागतिक स्तरावरील अशांतता काळातील जबाबदारी ठरते. आखाती देशांत ८० लाखांहून अधिक भारतीयांचे वास्तव्य आहे. त्यांचे संरक्षण, सुरक्षितता आणि गरज भासल्यास सुरक्षित स्थलांतराचा आराखडा ही भारताची नीती असेल. अशा काळात सामाजिक सौहार्द टिकविण्याचे आव्हानही भारतासमोर राहील, अशी चिन्हे दिसू लागली आहेत. सामाजिक ध्रुवीकरण टाळण्यासाठी संयम आणि संवाद ही साधने महत्त्वाची असतात. त्याची पुरेशी दक्षता घेतली जाईल, यात शंका नाही. कारण, इराण युद्धस्थिती हा भारतासाठी केवळ परराष्ट्र धोरणापुरता प्रश्न नाही तर अर्थ, ऊर्जा, प्रवासी भारतीय आणि अंतर्गत सामाजिक संतुलनाचा मुद्दा आहे. ▮

## आंतरराष्ट्रीय

# धोरणात्मक परिपक्वतेची परीक्षा

**प्रा. जयसिंग यादव**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इस्रायल दौऱ्याकडे दोन्ही देशांमधील परस्पर संबंधांच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. गेल्या तीन वर्षांमध्ये गाझापट्टीत झालेल्या ७२ हजारांहून अधिक मृत्यूंमध्ये सामान्य नागरिकांची संख्या मोठी आहे. मुले, महिला काही बंडखोर नाहीत. त्यांना हमासचे लढवय्ये मानले जाऊ शकत नाही. या उद्ध्वस्त प्रदेशातील लोक अजूनही अन्न, पाणी आणि औषध मिळविण्यासाठी संघर्ष करीत आहेत. बाहेरून कोणतीही मदत त्यांच्यापर्यंत पोहोचू दिली जात नाही. गाझाच्या राजकीय भविष्यावर कोणतीही चर्चा होत नाही. उलटपक्षी, पॅलेस्टाईनचा दुसरा सर्वात मोठा प्रदेश असलेल्या वेस्ट बँकमधील लोक सध्या तेथे जबरदस्तीने स्थायिक झालेल्या इस्रायली लोकांकडून हल्ल्यांना तोंड देत आहेत. इस्रायली सरकार त्यांना थांबविण्याऐवजी पाठीशी उभे राहात आहे. इस्रायली वसाहतींच्या काळापासून भारत सरकार पॅलेस्टिनींच्या बाजूने उभे आहे आणि ही भूमिका कायम आहे. पश्चिम आशियातील या सर्वात तीव्र संघर्षात भारत पूर्वीप्रमाणेच 'द्वि-राज्य उपाया'ला पाठिंबा देतो. या दृष्टिकोनातूनच भारत संयुक्त राष्ट्रांच्या थेट पुढाकाराच्या बाजूने उभा आहे. २०१७ मध्ये मोदी यांनी इस्रायलला भेट दिली, तेव्हा परिस्थिती वेगळी होती. गेल्या पाच वर्षांमध्ये भारताने या लहान देशासोबत २० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त व्यापार केला आहे. एकट्या भारताने जगभरातील इस्रायली शस्त्रविक्रीपैकी ३४ टक्के खरेदी केली आहे. आता या व्यापारसंबंधांची व्याप्ती वाढण्यास सुरुवात झाली आहे.

मोदी इस्रायली संसदेच्या विशेष अधिवेशनाला संबोधित करीत होते, तेव्हा तेथील विरोधी पक्षाच्या खासदारांनी सभागृहाबाहेर राहण्याचा निर्णय घेतला. त्यांनी न्यायव्यवस्थेच्या प्रमुखांना या कार्यक्रमासाठी आमंत्रित न केल्याचे कारण दिले. नेतान्याहू सध्या इस्रायली राष्ट्रीय भावना किती प्रमाणात प्रतिनिधित्व करतात, हे त्यांच्या सार्वजनिक प्रतिमेवरून मोजता येत नाही. इस्रायलच्या रस्त्यांवर त्यांच्याविरुद्ध सतत निदर्शने होत आहेत. अमेरिका आणि विविध युरोपीय देशांमधील ज्यू समुदायाने त्यांच्या कट्टरपंथी धोरणांवर जाहीरपणे नाराजी व्यक्त केली आहे. मोदी यांनी नेतान्याहू यांच्यासोबत घेतलेली भूमिका आखाती प्रदेशात भारताला एकाकी पाडणार नाही. संयुक्त अरब अमिराती आणि सौदी अरेबियासोबतचे भारताचे संबंध सध्या इतिहासातील सर्वोत्तम टप्प्यातून जात आहेत आणि दोन्ही देश कोणत्याही किमतीत इस्रायलला हानी पोहोचवू इच्छित नाहीत. जगातील कोणत्याही देशासाठी आखाती प्रदेशात आपली राजनैतिकता सुरळीतपणे चालविणे कधीही सोपे नव्हते. भारतासाठी हे आणखी गुंतागुंतीचे राहिले आहे. कारण कोणत्याही गटाचा भाग बनण्याचे त्याचे धोरण कधीही नव्हते. मोदी यांच्या सक्रिय राजनैतिकतेमुळे व्यापार, गुंतवणूक आणि रोजगाराच्या क्षेत्रात आपल्याला फायदा झाला आहे; परंतु पॅलेस्टिनी नागरिकांच्या दुर्दशेचा प्रश्न कायम असून भारताची त्याबाबतची भूमिका काही प्रश्न निर्माण करते. याच सुमारास भारताने इराणशी समान पातळीचे संबंध राखल्याने भविष्यात काही आव्हाने



निर्माण होऊ शकतात. मोदी यांच्या दोन दिवसांच्या इस्रायल दौऱ्याने जगाचे लक्ष वेधले. त्यांच्या भेटीत इस्रायल आणि भारत यांच्यातील धोरणात्मक संबंध मजबूत करण्यावर भर देण्यात आला. दोन्ही देशांमध्ये संरक्षण, सायबर सुरक्षा आणि शस्त्रास्त्रांशी संबंधित अनेक महत्त्वाचे करार झाले. यामुळे पाकिस्तानसाठी चिंता वाढू शकते. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, भारताचे इस्रायलशी असलेले संबंध पाकिस्तानी लष्कराच्या सुरक्षा चिंता वाढवतील. नेतान्याहू यांनी अलिकडेच भारत आणि इतर देशांसह षटकोनी आघाडीची स्थापना करण्याची घोषणा केली. त्यानंतर मोदी यांच्या उपस्थितीत नेतान्याहू यांनी इस्लामिक अतिरेकी तत्त्वांशी लढण्यासाठी पोलादी आघाडी तयार करण्याची भाषा केली. तुर्कस्तान आणि पाकिस्तानसारखे देश अशा आघाडीकडे संशयाने पाहतात. विश्लेषकांचे म्हणणे आहे की, भारताचे इस्रायलशी असलेले सहकार्य आधीच अस्थिर असलेल्या प्रदेशात पाकिस्तानचे धोरणात्मक गणित बदलू शकते. मोदी सत्तेत आल्यापासून भारत-इस्रायल संबंधांना वेग आला आहे. भारत आज इस्रायलचा सर्वात मोठा शस्त्रास्त्र ग्राहक आहे. दोन्ही देश कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम संगणन आणि सायबर सुरक्षा क्षेत्रात संरक्षणाच्या पलीकडेही काम करीत आहेत. सप्टेंबर २०२५ मध्ये भारत आणि इस्रायलमधील व्यापाराचा भारताला फायदा झाला. सप्टेंबर २०२४ च्या तुलनेत सप्टेंबर २०२५ मध्ये भारताची इस्रायलला होणारी निर्यात अंदाजे ५.१९ टक्क्यांनी कमी झाली. ती १८८ दशलक्ष डॉलर्सवरून १७८ दशलक्ष डॉलर्सवर आली. म्हणजे अंदाजे ९.७४ दशलक्ष डॉलर्सची घट झाली. इस्रायलमधून भारताची आयात जवळपास २० टक्क्यांनी घसरली. १५२ दशलक्ष डॉलर्सवरून १२१ दशलक्ष डॉलर्स झाली. हे अंदाजे ३१.१ दशलक्ष डॉलर्सची घट दर्शविते. २०२४ मध्ये इस्रायल आणि भारत यांच्यातील व्यापारात थोडीशी घट झाली; परंतु प्रस्तावित मुक्त व्यापार करारामुळे दोन्ही देशांमधील व्यापार वाढण्याची अपेक्षा आहे. सध्या भारत प्रामुख्याने इस्रायलला अर्ध-मौल्यवान दगड (४८.७ दशलक्ष डॉलर), ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स (१०.४ दशलक्ष डॉलर) आणि अभियांत्रिकी वस्तू (८.०६ दशलक्ष डॉलर) निर्यात करतो. मोती, मौल्यवान दगड, ऑटोमोटिव्ह डिझेल, यंत्रसामग्री, कापड, तयार कपडे आणि कृषी उत्पादने मोठ्या प्रमाणात निर्यात केली जातात. भारत प्रामुख्याने इस्रायलमधून उत्पादित खते (१६.७ दशलक्ष डॉलर) आणि इलेक्ट्रॉनिक घटक (९.६५ दशलक्ष डॉलर) आयात करतो. मुक्त व्यापार करार लागू झाल्यास भारतीय उत्पादनांना इस्रायली बाजारपेठेत सहज प्रवेश मिळेल. त्याचा थेट फायदा भारतीय उद्योग आणि शेतकऱ्यांना होऊ शकतो. मोदी यांच्या इस्रायल भेटीदरम्यान दोन्ही देशांमधील संरक्षण क्षेत्रातील महत्त्वाच्या करारांवर चर्चा झाली. या करारांमुळे दोन्ही देशांमधील धोरणात्मक भागीदारी आणखी मजबूत होईल. मुख्य लक्ष संरक्षण सहकार्यावर होते. त्यात तंत्रज्ञान हस्तांतरण, संयुक्त उत्पादन आणि प्रगत शस्त्र प्रणालींचा समावेश होता.

२०२६ मध्ये दोन्ही देशांमध्ये ८ ते १० अब्ज डॉलर्सपर्यंतचे संरक्षण करार झाले. इस्रायलने आयर्न डोम हवाई संरक्षण प्रणालीसाठी भारताला तंत्रज्ञान हस्तांतरित करण्याची ऑफर दिली आहे. 'मेक इन इंडिया' उपक्रमांतर्गत ते भारतातील स्थानिक उत्पादनासाठी आहे. ते कमी अंतराच्या रॉकेट, मोर्टार आणि ड्रोनपासून संरक्षण प्रदान करते. 'आयर्न बीम' (लेसर-आधारित), 'डेव्हिड स्लिंग' आणि 'ॲरो'सारख्या प्रगत क्षेपणास्त्र संरक्षण प्रणालींवर सामंजस्य करार शक्य आहेत. 'हर्मीस ड्रोन', 'हेरॉन एमके-२ मेल ड्रोन' (संयुक्त उत्पादन), 'स्पाईस १००० प्रिसिजन गाईडेड बॉम्ब', 'रॅम्पेज एअर-टू-ग्राउंड' क्षेपणास्त्रे, 'आइसब्रेकर नेव्हल क्रूझ' क्षेपणास्त्रे आणि सुपरसॉनिक 'एअर-टू-एअर लोरा' क्षेपणास्त्रे यासारख्या प्रणालींवर करार झाले आहेत. सूत्रांनुसार ८-१० अब्ज डॉलर्सपर्यंतचे हे संरक्षण करार आहेत. हे थेट खरेदीपेक्षा तंत्रज्ञान हस्तांतरण आणि संयुक्त उत्पादनावर अधिक केंद्रित आहेत. 'काऊंटर-ड्रोन' तंत्रज्ञान, लेसर सिस्टिम, 'एआय', 'क्वांटम कॉम्प्युटिंग', सायबर सुरक्षा आणि संरक्षण खरेदीवर १७ सामंजस्य करार झाले आहेत. भारत आणि इस्रायलमधील धोरणात्मक करार विशेष आहे. गेल्या वर्षी पाकिस्तान आणि सौदी अरेबियामध्ये झालेल्या कराराच्या बरोबरीचा हा करार म्हणून पाहिले जाऊ शकते. इस्रायलचे अमेरिका आणि जर्मनीसारख्या देशांसोबत आधीच असेच करार आहेत. पाकिस्तान हा एकमेव मुस्लिम देश आहे, ज्याच्याकडे अण्वस्त्रे आहेत, ही वस्तुस्थिती इस्रायलला दीर्घकाळ त्रास देत आहे. शिवाय पाकिस्तान तुर्की आणि सौदी अरेबियासह कट्टरपंथी सुन्नी अक्षाचा भाग आहे. पाकिस्तानचा प्रतिकार करण्यासाठी इस्रायल भारताशी संरक्षण सहकार्य आणि गुप्तचर माहिती सामायिकरण वाढवत आहे. ताज्या करारामुळे इस्रायलचे भारताशी सहकार्य वाढेलच; पण पाकिस्तानच्या सुरक्षा अडचणीही वाढतील. ▮

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# होळीची अनोखी परंपरा

परंपरा, पर्यावरण आणि सामाजिक एकात्मतेचा, रंगोत्सवाचा होळी हा सण. प्रत्येक सणामागे धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक पर्यावरणीय असा बहुआयामी अर्थ दडलेला असतो. फाल्गुन पौर्णिमेला साजरी होणारी होळी हा केवळ रंगांचा उत्सव नसून तो अन्यायावर सत्याचा विजय, वाईटावर चांगल्याचे अधिराज्य, समाजातील विविध घटकांमधील ऐक्यांचे प्रतीक आहे. आजच्या आधुनिक काळात होळीचे रूप काही प्रमाणात बदलले असले, तरी ग्रामीण भागात, तांड्यांत, यात्रांमध्ये आणि परंपरागत समाजरचनेत तिचे मूळ स्वरूप जपलेले दिसते. पर्यावरणपूरक होळी, बंजारा समाजाची पारंपरिक होळी, महिलांची लाठीमार परंपरा, वर्धा जिल्ह्यातील रंगाविना धार्मिक स्पर्धा, स्वच्छतेचा संदेश देणारे सूरगाव आणि बुलढाणा जिल्ह्यातील प्रसिद्ध सैलानी बाबा यात्रेतील सामूहिक होळी या सर्व उदाहरणांतून होळीचे विविध रंग आपल्याला पाहायला मिळतात. बुलढाणा जिल्ह्यातील प्रसिद्ध असलेल्या सैलानी बाबाच्या यात्रेत दरवर्षी होळीला लाखो भक्त येतात. या दिवशी नारळाची होळी पेटवली जाते. हे नारळ ओवाळून होळीत टाकल्याने अंगातील व्याधी दूर होते, अशी भावना आहे. त्यामुळे प्रत्येक वर्षी तब्बल १५ ते २० ट्रक भरतील एवढ्या नारळांची होळी येथे केली जाते. काही वर्षांत रासायनिक रंग, पाण्याची उधळपट्टी आणि प्लॅस्टिक कचऱ्यामुळे होळीचा सण पर्यावरणासाठी चिंतेचा विषय बनला होता. मात्र, आता जनजागृतीमुळे परिस्थिती बदलत आहे. नैसर्गिक रंगांचा वापर, सुया फुलांपासून तयार केलेले गुलाल, पाण्याचा संयमित वापर तसेच होळीच्या दहनासाठी कचरा किंवा प्लॅस्टिकऐवजी सेंद्रिय साहित्य वापरण्याकडे कल वाढतो आहे. पर्यावरणपूरक होळी म्हणजे केवळ पर्यावरणाचे रक्षण नव्हे तर पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित भविष्य घडविण्याची



जबाबदारी स्वीकारणे होय. अनेक स्वयंसेवी संस्था आणि शाळा मुलांना 'एक झाड लावा, होळी साजरी करा' असा संदेश देत आहेत. काही ठिकाणी होळीच्या निमित्ताने वृक्षारोपणाचे कार्यक्रम घेतले जातात. परंपरेतील होळी ही समाजशुद्धीचे प्रतीक होती. गावातील कचरा गोळा करून तो होळीत टाकण्याची पद्धत स्वच्छतेचा संदेश देणारी होती. आज त्याच परंपरेला आधुनिक पर्यावरण-जागरूकतेची जोड देण्याची आवश्यकता आहे. भारतातील प्रसिद्ध 'लाठीमार होळी' ही परंपरा विशेष प्रसिद्ध आहे. विशेषतः बरसाना आणि नंदगाव येथे महिलांची लाठीमार होळी मोठ्या उत्साहात साजरी होते. या परंपरेनुसार महिलांकडून पुरुषांना प्रतीकात्मक लाठीने मारले जाते आणि पुरुष ढालीने त्याचा बचाव करतात. ही परंपरा स्त्रीशक्तीचे प्रतीक मानली जाते. समाजातील स्त्री-पुरुष समानतेचा संदेश या खेळकर विधीतून दिला जातो. महिलांना अभिव्यक्तीची आणि नेतृत्वाची संधी देणारा हा सांस्कृतिक उपक्रम आहे. वर्धा जिल्ह्यातील सूरगाव येथे २८ वर्षांपासून रंगांविना होळी साजरी केली जाते. तीन दिवस धार्मिक कीर्तन, भजन, प्रवचन आणि सांस्कृतिक स्पर्धा आयोजित केल्या जातात. रंगांची उधळण न करता आध्यात्मिक वातावरणात सण साजरा करण्याचा हा प्रयत्न आहे. युवक-युवतींसाठी वक्तृत्व स्पर्धा, भजन स्पर्धा आणि सामाजिक विषयांवर चर्चा आयोजित केल्या जातात. या उपक्रमांमुळे सणाला बौद्धिक आणि सांस्कृतिक दिशा मिळते. धार्मिक भावनेसोबत समाजप्रबोधनाची जोड दिली जाते. स्वच्छतेचा संदेश देणारे सूरगाव येथे होळीच्या निमित्ताने स्वच्छता अभियान राबविण्याची परंपरा आहे. गावकरी होळीपूर्वी संपूर्ण गावाची साफसफाई करतात. रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, मंदिरे आणि शाळा स्वच्छ केली जातात. 'स्वच्छ गाव, सुंदर गाव' हा संदेश देत होळी साजरी केली जाते. मध्यप्रदेशातील पांढुर्णा येथे जाम नदीच्या काठावर पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी भाद्रपद अमावास्येला पारंपरिक गोटमार होळी साजरी केली जाते. यात पांढुर्णा आणि सावरगावचे लोक एकमेकांवर दगडांचा गोट वर्षाव करतात. हा एक अतिशय धाडसी आणि ऐतिहासिक वारसा आहे. या परंपरेत दगडांचा वापर केला जात असल्याने प्रशासनाकडून सुरक्षेची खबरदारी घेण्याचे प्रयत्न केले जातात. बंजारा समाजाची पारंपरिक होळी ही जितकी अग्निपूजेसाठी ओळखली जाते, तितकीच ती होळी गीतांच्या समृद्ध परंपरेसाठीही प्रसिद्ध आहे. जिल्ह्यातील विविध तांड्यांमध्ये होळीच्या रात्री गायली जाणारी ही पारंपरिक गीतं आजही बंजारा समाजाच्या सांस्कृतिक अस्मितेचे जिवंत प्रतीक मानली जातात. होळी पेटवण्याच्या वेळी आणि त्यानंतर तांड्यातील स्त्री-पुरुष एकत्र येऊन फेरा धरतात. ढोल, तिमकी आणि टाळांच्या ठेक्यावर गायली जाणारी ही गीते पिढ्यान्पिढ्या तोंडी परंपरेने पुढे आली आहेत. होळीची अनोखी परंपरा आजही कायम आहे. ▮

९८८१७१७८२८

## इतस्ततः

# कामाच्या तासांचे संमिश्र-संकरित स्वरूप

**दत्तात्रेय आंबुलकर**

'कोरोना'दरम्यानचा कठीण कालावधी संपून आता पाच वर्षांवर अवधी लोटला. विभिन्न कंपन्यांच्या कार्यालयांमधील कामाचे तास आणि बदलत्या आणि लवचीक कामाचे स्वरूप ही नवी कार्यपद्धती सर्वांच्या अंगवळणी पडली असून अद्याप या नव्या कामकाज पद्धतीचा अनेक ठिकाणी स्वीकार-अंगीकार होत असलेला दिसून येतो. एवढेच नव्हे, तर काही ठिकाणी दरम्यानच्या काळात आधीच्या वा जुन्या हजेरी पद्धतीची केलेली सुरुवात पण नव्याने मोडीत काढून नव्या व लवचीक म्हणजेच कर्मचारी-कंपन्यांच्या कामाशी निगडित व आवश्यक सुधारित कामाच्या तासांचा व त्यानुसार काम करण्याच्या पद्धतीचा स्वीकार केल्याचे दिसून येते. यातूनच नव्याने कामाच्या संमिश्र वा संकरित स्वरूप व कार्यपद्धती विकसित झाली आहे.

'कोरोना'नंतरच्या सुमारे पाच वर्षांत कंपन्यांतर्गत कंपनी आणि कर्मचाऱ्यांचे कामकाज आणि कामांच्या तासांसह कार्यपद्धती इत्यादींवर बरेच चर्वितचर्वण झाले. त्यातून एक बाब प्रामुख्याने स्पष्ट झाली की, कोरोनादरम्यान व त्यानंतरच्या बदलत्या व बदललेल्या व्यावसायिक कार्यालयीन कार्यपद्धती व कामकाजामध्ये बदलती परिस्थिती व गरजांनुसार बदल करणे व करीत राहणे, त्याचा अवलंब करणे ही काळाची गरज ठरणार असून त्याचा उपयोग महत्त्वाचा ठरणार आहे. हेच विचार-विचारसरणी व नव्या अनुभवांमधून पुढे आली, ती नव्या स्वरूपातील व लवचीक अशी संयुक्त स्वरूपातील संकरित कार्यपद्धती. या नव्या कार्यपद्धतीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे, त्याच्या लवचीकतेला बदलत्या व्यावसायिक कार्यपद्धतीची व परंपरागत आणि संकरित स्वरूपाची नवी व विकसित कार्यपद्धती. या नव्या संकरित पद्धतीमध्ये परंपरागत व कोरोनापूर्व काळातील कंपनी-कार्यालयीन कार्यपद्धती व त्यानंतर कोरोना काळात उपयुक्त ठरून विकसित झालेली संयुक्त स्वरूपातील विकसित अशी संकरित स्वरूपातील कार्यपद्धती. या नव्या कामकाज पद्धतीचे सर्वात प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे, त्याचे नवे व विकसित स्वरूप हे प्रामुख्याने आव्हानात्मक स्वरूपातील निर्माण व विकसित झालेली अशी ही कामकाज पद्धती ठरली. त्याच्याच जोडीला या नव्या व कधी अकल्पित वाटणारी व्यावसायिक कार्यपद्धती विकसित झाली.

प्रचलित परिस्थितीत व विशेषतः कोरोनानंतरच्या बदलत्या व्यावसायिक परिस्थितीच्या अभ्यासावरील आपला अनुभव नमूद करताना 'अर्नस्ट ॲण्ड यंग' या विख्यात व्यवसाय व्यवस्थापन-मार्गदर्शन कंपनीच्या तंत्रज्ञान विकास क्षेत्राचे प्रमुख नितीन भट यांनी नमूद केल्यानुसार, त्यादरम्यान कंपनी अंतर्गत कर्मचाऱ्यांची कामाच्या ठिकाणची प्रत्यक्ष वा शारीरिक उपस्थिती, ते करीत असणारे कामकाज, या कामाचे स्वरूप, त्यांची उत्पादकता, कामाचा प्रत्यक्ष दर्जा व त्याचे व्यावसायिक परिणाम इ.वर व्यवस्थापन क्षेत्रातील उच्चपदस्थांनी अधिक गांभीर्याचे विचार करण्यास सुरुवात केली. त्यांच्या मते, याच विचार-प्रक्रियेमध्ये नवी कामकाज व व्यवस्थापन पद्धतीतील बदलांचे मूळ दिसून येते. याच विषयाचा अधिक पाठपुरावा करण्यासाठी २०२५ मध्ये 'अर्नस्ट ॲण्ड यंग' कंपनीतर्फे व्यापक स्वरूपाचे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणामध्ये सुमारे १ हजार ५०० कंपन्या व १५ हजारांपेक्षा अधिक कर्मचारी सहभागी झाले होते. यावरून सर्वेक्षणाच्या प्रतिसादाची कल्पना येऊ शकते. सर्वेक्षणात विविध स्वरूपात काम करणाऱ्या २९ उद्योग-व्यवसायांचा समावेश होता.

वरील सर्वेक्षणात प्रामुख्याचे दिसून आलेली बाब म्हणजे, ज्या उद्योग-कंपन्यांमध्ये लवचीक कार्यपद्धती आणि कामाचे तास म्हणजेच संमिश्र वा संकरित कार्यपद्धती आहे, अशा ठिकाणच्या कर्मचाऱ्यांचे कामकाज तुलनेने अधिक उत्पादक आहे. याउलट परिस्थिती परंपरागत पद्धती वा पठडीसह काम करणाऱ्या कंपन्यांमध्ये दिसून आली. सर्वेक्षणातून दिसून आलेले कंपनी व कर्मचारी या उभय घटकांच्या संदर्भातील महत्त्वाचे मुद्दे म्हणजे, ज्या उद्योग-व्यवसायात व्यवस्थापन, व्यवस्थापक आणि तिथे काम करणारे कर्मचारी यांच्यादरम्यान संवाद आणि परस्पर विश्वास आहे, अशा ठिकाणी संकरित म्हणजेच कर्मचाऱ्यांनी कंपनीची व्यावसायिक गरज व कर्मचाऱ्यांची सोय-सुलभता यावर आधारित कामकाज ही नवी कार्यपद्धती अधिक परिणामकारकपणे काम करणारी ठरते व त्याचा लाभ उद्योगाच्या या उभय घटकांना होतो. यानिमित्ताने कर्मचाऱ्यांचा कंपनीचे कामकाज, कामाची पद्धत व कामाचे तास या दृष्टीने पाहता २२ टक्के कर्मचाऱ्यांनी कुठूनही काम करण्यास तर त्याहून अधिक म्हणजेच ३० टक्के कर्मचारी कंपनी व्यवस्थापनाच्या नियोजन वा प्राधान्यक्रमानुसार निर्धारित पद्धतीने व कामाच्या तासांसह काम करण्यास पसंती दिली. यावरून कामकाज, कामाची पद्धत व मुख्य म्हणजे कामाचे तास यासंदर्भातील कर्मचाऱ्यांची मानसिकता स्पष्ट होते. यासंदर्भात 'चीफ पीपल ॲण्ड कल्चर सर्व्हिसेस ऑफिसर' म्हणून मानव-संसाधन क्षेत्रात काम करणाऱ्या प्रशांत मेहरा यांच्या मते, या सर्वेक्षणातून स्पष्ट झालेली महत्त्वाची बाब म्हणजे, कर्मचारी कंपनीचा व्यवसाय-कामकाज आणि कामाची पद्धत याबरोबर कर्मचाऱ्यांचे काम व कामाचे तास या उभयपक्षी महत्त्वाच्या व जिव्हाळ्याच्या मुद्द्यांवर आपले मत आणि अपेक्षा इ. मुद्दे अधिक मोकळेपणाने मांडू लागले आहेत. त्यांच्यानुसार, सर्वेक्षणात सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांमध्ये नव्यानेच रुजू झालेले व युवा-वयोगटातील कर्मचार्यांच्या दृष्टीने कंपनीचे कामकाज लवचीक वा संमिश्र तासांसह करण्याच्या सोयीला या तरुण वयातील कर्मचाऱ्यांची पहिली पसंती व प्राधान्य आहे. त्यांच्या मते, या आणि अशा कार्यपद्धतीमुळे कंपनीचे कामकाज आणि कर्मचाऱ्यांचे काम या उभयतांना त्याचा फायदा होऊ शकतो. व्यवस्थापनाचा कर्मचाऱ्यांचे काम आणि त्यांचे कामाचे तास यावर आग्रही भर देण्यावरचा कलही आता कमी होत असल्याचे या सर्वेक्षणातून स्पष्ट झाले आहे. सर्वेक्षणातील सहभागी प्रमुख व्यवस्थापन प्रतिनिधी वा व्यवस्थापकांनी यासंदर्भात व्यक्त केलेल्या मतांनुसार, बदललेली वा बदलती व्यावसायिक स्थिती, कार्यालयीन व्याप व त्यावर होणारा खर्च, मर्यादित साधनांसह व्यावसायिक स्पर्धेवर मात करून व्यवसाय वाढीच्या दृष्टीने कंपनी-कर्मचाऱ्यांमध्ये परस्पर विश्वास आणि जबाबदारीची जाणीव असेल, तर कंपनीच्या व्यावसायिक प्राधान्यावर आधारित लवचीक कामांच्या तासासह संमिश्र वा संकरित कार्यपद्धती हा सद्यस्थितीत उत्तम पर्याय ठरू शकतो. ▮

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### धूलिवंदन उत्साहात साजरे व्हावे

भारतातील वेगवेगळ्या भागात फाल्गुन पौर्णिमेला हा सण होळी, होलिकादहन, शिमगा, हुताशनी महोत्सव, दोलायात्रा, कामदहन अशा विविध नावांनी साजरा केला जातो. होळीच्या दिवशी आपण आपल्या मनातील वाईट विचारांना होळीप्रमाणे आगीत जाळून राख करावे, अशी कल्पना आहे. महाराष्ट्रासह कोकणात हा सण मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. दुसऱ्या दिवशी धूलिवंदनाचा सण साजरा केला जातो. याला धुळवड असेही म्हणतात. अग्नीत गव्हाच्या ओंब्या भाजण्याची प्रथा आहे. या दिवसात गव्हाचे पीक तयार होते, हे त्यामागील एक कारण असू शकते. नवीन पीक अग्निदेवतेला समर्पित करण्याची प्रथा आहे. या दिवशी एकमेकांना गुलाल लावून रंगाची उधळण करणे. सर्वांनी एकत्र येणे, बंधुभाव आणि एकता जपणे हा याचा उद्देश. लोक आपसातील भेदभाव भांडण विसरून एकत्र येतात; मात्र गेल्या काही वर्षांत या सणामध्ये शिरलेल्या अपप्रवृत्तीमुळे सणाचे पावित्र्य लोप पावले आहे. यावेळी धांगडधिंगा घातला जातो. धूलिवंदनाच्या दिवशी गुलालाऐवजी रसायनमिश्रित रंग लावले जातात. पाण्याचा अपव्यय केला जातो. पाण्याने, रंगाने भरलेले फुगे, पिशव्या रेल्वे गाड्या, बसगाड्यावर तसेच रस्त्यावर फेकून मारतात. त्यात अनेक जखमीही होतात. या दिवशी लाऊडस्पिकरवर मोठ्या आवाजात गाणी लावून हिडीस नृत्य करतात. या दिवशी मद्यपान करण्याची नवीनच फॅशन निर्माण झाली आहे. यातून बऱ्याचदा वाद होतो. हा वाद विकोपाला गेला तर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. वास्तविक होळी आणि धूलिवंदन हे अतिशय पवित्र सण आहेत. त्यामुळे धूलिवंदन उत्साहातच साजरे व्हावे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### वन्यजीव व्यवस्थापन गरजेचे

वन्यजीवांच्या नैसर्गिक व अनैसर्गिक मृत्यूंचे प्रमाण वाढते आहे. मानव-वन्यजीव संघर्ष टोकाला पोहोचला आहे. वन्यजीव व वनस्पती त्यांच्या प्रजातीचे तस्करी व व्यापार यामुळे अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे वन्यजीव व वनस्पती यांचे संवर्धन करण्यासाठी त्यांचे व्यवस्थापन करणे अवश्य आहे. ३ मार्चला जागतिक वन्यजीव दिन साजरा केला जातो. 'औषधी आणि सुगंधी वनस्पती : आरोग्यवारसा आणि उपजीविका जतन करणे' हे घोषवाक्य घेऊन हा दिन संकल्प पद्धतीने साजरा होत आहे. यातून मानवी आरोग्य, सांस्कृतिक परंपरा, अर्थव्यवस्थांना आधार देणाऱ्या वनस्पतींचे संवर्धन करण्याच्या महत्त्वावर भर दिला आहे. ज्याचा उद्देश वन्यजीव आणि वनस्पतींच्या विविध प्रजातींबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि त्यांच्या संरक्षणासाठी प्रोत्साहन देणे हा आहे. खऱ्या अर्थाने वन्यजीव पृथ्वीच्या जैवविविधतेचा आधार आहेत. भारतात प्राण्यांविषयी जितका आदर आहे, तितकीच अंधश्रद्धा व तस्करी पसरली आहे. वन्यजीव, वन्य वनस्पती, टिकविण्यासाठी कायमस्वरूपी पाणवठे, अन्न साखळी करणे आवश्यक आहे. अनेक वन्यजीव व पक्ष्यांचा मृत्यू हा पाण्याची उपलब्धता नसल्याने होतो. वेळोवेळी शासन याबाबत पुढाकार घेत असते. हा निर्णय गावपातळीवर घेणे गरजेचे आहे. लोकसहभाग महत्त्वाचा आहे. वनविभागाकडून प्रत्येक प्राण्यावर नजर असणार आहे. त्यामुळे प्राण्याची शिकार, तस्करी व अपघाती मृत्यू टाळता येतील. विकासाच्या नावाखाली जंगल व वने नष्ट झाल्याने उपासमारी टाळण्यासाठी वन्यजीव बाहेर पडत आहेत. जैवविविधता व वन्यजीव यांचे संवर्धन करत असताना जनजागृती करावी लागणार आहे.

**विठ्ठल वळसेपाटील** /८४८४०६६०४२

## वाचक पत्रे

### स्वच्छता : संकल्पाचा मूलमंत्र

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा २०४७ पर्यंत विकसित भारताचा संकल्प आहे आणि हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवत सरकारची वाटचाल सुरू आहे. २०४७ मध्ये आपण १०० वा स्वातंत्र्य दिन साजरा करू. तो केवळ स्वातंत्र्य दिन नसावा तर तो विकसित भारताचा स्वातंत्र्य दिन असावा, प्रत्येक भारतीयांचा ऊर अभिमानाने भरून यावा असा तो क्षण असेल. जगभरातील विकसित देश पाहिले की, तेथील स्वच्छता प्रकर्षाने जाणवते. स्वच्छतेचे सौंदर्याशी जवळचे नाते आहे. परिसर स्वच्छ असला की त्याचं सौंदर्य पण वाढतं; अस्वच्छतेमुळे रोगराई वाढते. प्रत्येकाचे तन-मन निरोगी असेल राष्ट्र बलशाली असेल. खरं तर स्वच्छतेचे हे संस्कार आपल्याला कुणाकडून घेण्याची गरज नाही. ज्या देशात दिवसाची सुरुवातच केरकचरा स्वच्छ करून सडासंमार्जनाने होते त्या देशाने स्वच्छतेसाठी दुसऱ्या देशाचा आदर्श का घ्यावा? मुळात आपण आपलं स्वत्वच त्यांच्याकडे गहाण ठेवलंय; तेच परत आणण्याची गरज आहे. आज आपण विविध क्षेत्रात भरारी घेतोय. जगभरात चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आपली आहे आणि लवकरच तिसऱ्या स्थानी येऊन भारताला डेड इकॉनॉमी म्हणणाऱ्या ट्रम्पला सांगू, हा आहे नवा भारत. खरं तर स्वच्छता हा विकसित भारताच्या संकल्पाचा मूलमंत्र आहे.आपला देश स्वच्छ ठेवण्यासाठी आपणही हातभार लावू आणि विकसित भारताचे स्वप्न साकार करू. ▮

**अखिल देशपांडे**/अकोला

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com/



# महापालिका स्थायी समितीच्या चेअरमन पदासाठी आज होणार नामनिर्देशन पत्र दाखल

## भाजपच्या रंजीता चाकोते, पाटील, वानकर, माने यांची नावे चर्चेत

### चेअरमनपदाची निवड प्रक्रिया ६ मार्चला

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

महापालिकेला स्थायी समिती चेअरमन पदाची निवड येत्या सहा मार्च रोजी होणार असून तब्बल आठ वर्षाच्या प्रदिर्घ प्रतिक्षेनंतर महापालिकेला आता स्थायी समितीचा चेअरमन मिळणार आहे. यासाठी बुधवार ४ मार्च रोजी नामनिर्देशन पत्र दाखल करण्यात येणार आहेत. यामुळे चेअरमन पदाच्या उमेदवारीचे चित्र आज स्पष्ट होईल.

पुणे विभागीय आयुक्तांनी स्थायी समिती चेअरमन निवडीचे वेळापत्रक महापालिकेला कळवले आहे. त्यानुसार ४ मार्च रोजी सकाळी ११ ते १.३० या वेळेत नामनिर्देशन पत्र सादर केले जाणार आहेत. ६ मार्च रोजी सकाळी अकरा वाजता अतिरिक्त जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समि



तीची बैठक होईल. या बैठकीत चेअरमनची निवड करण्यात येईल.

२० फेब्रुवारी रोजी झालेल्या महापालिका सर्वसाधारण सभेत स्थायी समिती सदस्यांची निवड झाली होती. एकुण सोळा सदस्यांची निवड झाली. त्यामध्ये भारतीय जनता पक्षाचे १४ तर एमआयएम आणि शिवसेना यांचा प्रत्येकी एक सदस्य आहे. सत्ताधारी भाजपच्या चौदा जणांपैकी एकाला यावेळी चेअरमन पदाची संधी मिळणार आहे. भाजपचे अविनाश पाटील, सतीश सिरसीला, रंजीता चाकोते, गणेश वानकर, भारतसिंग बडूरवाले, सत्यनारायण गुर्रम, अश्विनी चव्हाण, संगीता जाधव, जयकुमार माने, शिवाजी वाघमोडे, कल्पना कदम, राजकुमार पाटील, अमर पुदाले तर एमआयएमचे अझहर हुंडेकरी आणि शिवसेनेचे अमोल शिंदे यांची स्थायी समिती सदस्य म्हणून निवड झाली आहे.

सत्ताधारी भाजपने महापौर तसेच सभागृह नेता निवडताना ओबीसी समाजाचा विचार केला होता तर उपमहापौरपद मराठा समाजाला दिले होते. आता स्थायी समितीच्या चेअरमन पदासाठी लिंगायत समाजाचा विचार करण्याची दाट शक्यता आहे. तसे झाले तर रंजीता चाकोते किंवा अविनाश पाटील यांची वर्णी लागु शकते. शहर उत्तरमधील नगरसेवकाला संधी देण्याचा विचार झाला तर राजकुमार पाटील, अमर पुदाले, बिजू प्रधाने,गणेश वानकर यांची नावे पुढे येऊ शकतात. वानकर यांचे चेअरमन पद गेल्यावेळी हुकले होते. माजी आ. दिलीप माने यांच्या गटाला हे पद देण्याचा विचार झाला तर जयकुमार माने यांचाही विचार होऊ शकतो.

## शहर व जिल्हा कुस्ती स्पर्धा शुक्रवारपासून

**सोलापूर, दि. ३ मार्च-**

वाघोली पुणे येथे १८ ते २२ मार्च दरम्यान होणाऱ्या वरिष्ठ राज्य अजिंक्यपद व ६८वी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी शहर तालीम संघाची सोलापूरची निवड चाचणी कुस्ती स्पर्धा ६ व ७ मार्च रोजी अथर्व गार्डन घोंगडे वस्ती भवानी पेठ येथे होईल.



वजने दि. ६ मार्च रोजी सकाळी ९ ते १२ होतील. संपर्क: अतिश मोरे (मो.८९२८८९२१११) अथवा अर्जुन साठे (९१४६८९४८२५) अशी माहिती कार्याध्यक्ष पै.अमर दुधाळ यांनी दिली. शहर व जिल्ह्यातील मल्लांनी यात सहभागी व्हावे असे आवाहन सोलापूर शहर तालीम संघांचे अध्यक्ष आमदार विजयकुमार देशमुख यांनी केले आहे.

## राहत्या घरासमोरून दुचाकी चोरीला

**सोलापूर, दि. ३ मार्च-**

राहत्या घरासमोरून कुमठे येथून एचएफ डीलक्स मोटरसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. दि. २४ फेब्रुवारी रोजी विक्रम तानाजी पवार राहणार कुमठे सोलापूर यांची २५ हजार रुपयांची लाल काळ्या रंगाची हिरो एच एफ डिलक्स मोटरसायकल क्रमांक एम एच १३ सी एल ५२२८ ही राहत्या घरासमोरून अज्ञात चोरट्याने चोरून नेली असल्याचा गुन्हा दि. २ मार्च रोजी विजापूर नाका पोलीस ठाण्यात दाखल झाला आहे पुढील तपास हार करत आहेत.

## सादूल प्रशालेत मराठी भाषा दिन साजरा

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

धर्मण्णा सादूल प्रशालेत वि.वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून वालचंद कॉलेजचे प्रा. तुपकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आसिफ पठाण होते. प्रमुख उपस्थिती म्हणून मुख्याध्यापिका अफ्रिन सय्यद उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात वि.वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सूत्रसंचालन रविकांत व्हसाळे आभार राजअहमद शेख यांनी मानले.

## निधन वृत्त...

### अन्नपूर्णा धनशेट्टी

**सोलापूर, दि. ३ मार्च**

माजी आमदार कै. शिवशंकर मल्लप्पा धनशेट्टी यांच्या पत्नी अन्नपूर्णा शिवशंकर धनशेट्टी (वय वर्षे १००) यांचे मंगळवारी (दि.३) रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांची अंत्यविधी रुद्रभूमी तुळजापूरवेस येथे करणेत आला. त्यांच्या पश्चात मुलगी, जावई, मुलगा, सून, नातू, नातसून, पणतू, खापर पणतू असा परिवार आहे. हुतात्मा स्मृती मंदिरचे व्यवस्थापक शिवकुमार धनशेट्टी यांच्या मातोश्री होत्या.



### लक्ष्मण बुगडी

**सोलापूर, दि. ३ मार्च-**

सोनिया नगर जुना घरकुल येथील लक्ष्मण बुगप्पा बुगडी (वय ८१) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. शासकीय सेवेतील सेवा निवृत मंडळ अधिकारी होते. त्याच्या पश्यात एक मुलगी, दोन मुले, दोन सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे




## महाराष्ट्र शासन
### कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर
**सात रस्ता, कारीगर पेट्रोल पंपासमोर, सोलापूर ४१३००३**

**निवीदा सुचना क्र. 06 सन 2025-26**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे निविदा पत्रात नमुद केलेले पात्रतेचे निकष पूर्ण करीत असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील तारखेपासून बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| | |
|---|---|
| निविदा उपलब्ध तारीख | दि. ०२/०३/२०२६ (वेळ सकाळी १०.०० वाजेपासून) ते दि. ०९/०३/२०२६ (सायं. १८.१५ पर्यंत) |
| निविदा पुर्व बैठक | ---- निरंक ---- |
| भरलेल्या निविदा सादर करण्याची तरीख | दि. ०९/०३/२०२६ (वेळ सायं. १८.१५ पर्यंत) |
| निविदा उघडण्याचे दिनांक, ठिकाण व वेळ | दि. १०/०३/२०२६ मा. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांचे कार्यालयात (वेळ सकाळी ११.०० वाजता किंवा शक्य झाल्यास नंतर) |

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर कार्यालयातील सूचना फलक

सही/-
(मनोज रा. ठाकरे)
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर



## श्री. सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूर
**श्री. सिध्देश्वर बाजारपेठ, हैदराबाद रोड, सोलापूर-४१३००५ फोन नं. २३७४६७८**

**जाहीर ई-टेंडर नोटीस**

जा.नं.ई-टेंडर/३१७० दिनांकः- २८/०२/२०२६

कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूर येथील कामांकरीता योग्य वर्गात नोंदणीकृत कंत्राटदारांकडून बी-१ नमुन्यातील टेंडर https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर श्री. सिध्देश्वर बाजार पेठेतील मुख्य कार्यालयातील पहिल्या मजल्यावरील मिटींग हॉलमधील फर्निचरची दुरुस्ती करणे व नुतनीकरण करणेचे रु.१६७७८९९/- या कामाकरीता दि. ०४/०३/२०२६ ते दि. १८/०३/२०२६ पर्यंत ई-टेंडरने मागवीत आहे. सदर ई-टेंडरची सविस्तर माहिती वरील वेबसाईटबर उपलब्ध आहे.

आर्किटेक्ट,
शरदचंद्र एच. भोसले ॲन्ड असोसिएट्स
कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर

सही/- सचिव | सही/- सभापती
श्री सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूर



## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
**इंद्रभुवन, पुण्यश्लोक अप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर**
**वाहन विभाग machinarysmc@gmail.com**
**ऑफिस फोन - ०२१७-२७३५२१०**

जा.क्र./न.अ/वावि/६२५ दि. ०२/०३/२०२६

**ई-निविदा सुचना**

**Tender ID : 2026_SMC_1283012_1**

सोलापूर महानगरपालिका नगर अभियंता विविध विभागाचे कामकाज व प्रशासकीय कामकाजाच्या सोयीसाठी मा. अधिकारी व मनपाच्या विविध मोहिमांकरीता आवश्यकतेनुसार विविध प्रकारची वाहने भाडेतत्वावर पुरवठा करणेकामी ई निविदा केलेली आहे.

सदर कामाबाबत सर्व अटी व शर्ती http://www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि. ०२/०३/२०२६ पासून सकाळी १०.०० वाजलेपासून पाहण्यास उपलब्ध आहे. उपरोक्त कामाबाबत माहिती घ्यावयाची असल्यास नगर अभियंता वाहन विभागाकडे संपर्क साधावा. कळावे, दि. ०२/०३/२०२६

सही/-
नगर अभियंता
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर



## मध्य रेल्वे
### सोलापूर विभाग
**अभियांत्रिकी कामे**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम) सोलापूर, भारत खालील कामांसाठी आणि राष्ट्रपतींच्या वतीने ई-निविदा मागवत आहेत. निविदा क्रमांक: 05-20226-SrDENS, कामाचे नावः 1) ADEN/KLBG उपविभागांतर्गत SSE(P.Way)SDB विभागांतर्गत विविध P.Wau कामे. 2) DEN/SUR(S) उपविभागांतर्गत SSE(P.Way) DUD विभागांतर्गत विविध P.Way कामे., अंदाजे किंमत रक्कम रु. 75257993.82, बयाणा रक्कम: रु. 526300.00, पूर्ण होण्याचा कालावधी:- 24 महिने, देखभालीचा कालावधी:- NA, निविदा क्रमांक: 06-20226-SrDENS, कामाचे नाव:- 1. ADEN/KLBG उपविभागाअंतर्गत KLBG-KUI विभागात रेल्वे वसाहतींमध्ये संपर्क रस्त्याची तरतूद. 2. DEN/KLBG उपविभागाअंतर्गत वाडी MR विभागात रेल्वे वसाहतींमध्ये संपर्क रस्त्याची तरतूद., अंदाजे किंमत रक्कम रु. 83387381.41, बयाणा रक्कम: रु. 566900.00, पूर्ण होण्याचा कालावधी:- 12 महिने, देखभालीचा कालावधी: 24 महिने, निविदा क्रमांक:- 07-20226-SrDENS, कामाचे नाव: 1 वाडी येथे 350 KLD क्षमतेच्या वॉटर रिसायकलिंग प्लांटचे 36 महिन्यांसाठी संचालन आणि देखभाल. 2 सोलापूर येथील आरबी II मोदी कॉलनी येथे 15 केएलडी क्षमतेच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाचे 36 महिन्यांसाठी ऑपरेशन, देखभाल आणि संचालन. 3 सोलापूर येथील पोर्टर चाळ येथे डब्ल्यूआरपीसाठी पाईपलाईनची दुरुस्ती, अंदाजे किंमत रक्कम रु. 6267278.27, बयाणा रक्कम रु. 125400.00, बंद कालावधी: ३६ महिने, देखभाल कालावधी: NA, www.ireps.gov.in या वेबसाइटवर निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ:- 23/03/2026 दुपारी 3.00 वाजेपर्यंत, www.ireps.gov.in निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:- 23.03.2026 दुपारी 3.30 वाजता निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपर्यंत वेळोवेळी कोणतेही बदल आणि दुरुस्त्या (जर असतील तर) www.ireps.gov.in या वेबसाइटला भेट देण्याची विनंती आहे.

विभागीय रेल्वे व्यवस्थापक, (कार्य)
13 सोलापूर

आपल्या जनावरांना रेल्वे लाईनपासून दूर ठेवा



## जाहीर नोटीस

Email ID: ddircitysurvey@gmail.com
क्र. ना.भू. १/अपील एस.आर. ६५८२/२०२४
पुणे. दि. २५/०२/२०२६

### अपर जिल्हाधिकारी तथा उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (नागरी भूमापन) पुणे यांचे न्यायालयात

प्रति,
अपीलदार श्री. अनिल बाळकृष्ण टाकळीकर, रा. ५४३, उत्तर सदर बझार, सोलापूर विरुद्ध जाबदार क्र.१. सुचाबेन विनुभाई पटेल, रा. १३४ रेल्वे लाईन तुकाराम अपार्टमेंट, सोलापूर व इतर

**विषय : महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ कलम २४७ अन्वये अपील अर्ज, मौजे मजरेवाडी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर येथील सर्व्हे नं. १२७/२ब/२अ,२ब या मिळकतीबाबत.**

मौजे मजरेवाडी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर येथील सर्व्हे नं. १२७/२ब/२अ,२ब या मिळकतीबाबत. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सोलापूर यांनी त्यांचेकडील क्र. भूमापन/अपील/एस.आर.२६८३/२०२१, दिनांक १२/०४/२०२४ रोजी निर्णय दिला आहे. सदर निर्णयावर नाराज होऊन प्रस्तुत अर्जदार यांनी उपसंचालक भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे या कार्यालयाकडे दिनांक ११/०७/२०२४ रोजी अपील अर्ज दाखल केला असून त्यातील जाबदार क्र. १४अ) मिनाबेन नरोत्तमभाई पटेल (बच्चानी) १४ब) विवेक नरोत्तमभाई पटेल (बच्चानी) दोघे रा. ७०९, ३४/अ/४/५ न्यू पाच्छा पेठ, सोलापूर ४१३००५, यांना अपीलात नमुद पत्यावर नोटीस पाठवूनही जाबदार सुनावणीस हजर होत नाहीत. त्यामुळे सदरच्या मिळकतीबाबत वरील जाबदार यांनी अथवा त्यांचे कायदेशीर वारसांनी किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी ही नोटीस प्रसिध्दीपासून ३० दिवसात अगर दिनांक १०/०३/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता या न्यायालयात हजर राहून आपले म्हणणे द्यावे अन्यथा आपले काही म्हणणे नाही असे समजून अपीलाची सुनावणी घेणेत येईल व निर्णय घेतला जाईल याची नोंद घ्यावी.

जाबदार यांना अथवा त्यांचे कायदेशीर वारस यांना प्रस्तुत अपीलातील सुनावणीकामी हजर राहणेसाठी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे.

**सुनावणीचा पत्ता-**
अपर जिल्हाधिकारी तथा उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न.
जमाबंदी आयुक्त (नागरी भूमापन) पुणे कार्यालय
नवीन प्रशासकिय इमारत, ३ रा मजला,
दालन नं. ३०५, विधानभवन समोर, पुणे-०१/

मा.उ.सं.भू.अ.संलग्न ज.आ (ना.भू.) पुणे यांचे मान्यतेने

शिक्का

सही/-
(अजय भुंगे)
कार्यालय अधीक्षक ना.भू.१
जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे



## जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. ७२/२०२५

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

**१. तानाजी सुर्यभान दसवंत** - **अर्जदार**
रा. गौडगाव ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील श्रीहरी उ. भोसले)
विरुध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रा. प. गौडगाव** - **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदाराचे वडील सुर्यभान जनार्धन दसवंत, रा. गौडगाव ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे गौडगाव ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी दिनांक ०१ जानेवारी १९४२ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचे वडील सुर्यभान जनार्धन दसवंत यांचा दिनांक ०१ जानेवारी १९४२ रोजी मौजे गौडगाव, ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिंसेबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का

सही/-
(एफ.आर. शेख)
तहसिलदार, बार्शी



## करमाळा नगरपरिषद
### जाहिर फेर लिलाव प्रसिध्दीकरण

**दूरध्वनी क्रमांक (०२१८२) २२०३१५** **E-Mail : comckarmala@gmail.com**

**जा.क्र.२११/२०२६** **दिनांक ०२/०३/२०२६**

याद्वारे सर्व नागरिकांना कळविणेत येते की, करमाळा नगरपरिषद मालकीचे दुकान गाळ्यांचा जाहिर लिलाव वार- मंगळवार, दि. १०/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. नगरपरिषदेच मिळकत विभागात आयोजित करणेत आला आहे. तरी इच्छुकांनी खाली दर्शविल्याप्रमाणे बोली बयाणा रककम भरुन लिलावात भाग घ्यावा, बोली रक्कमे शिवाय लिलावामध्ये भाग घेता येणार नाही. बोली बयाणा रक्कम भरणेची मुदत दि.०९/०३/२०२६ रोजी दुपारी ५.०० वा. पर्यंत राहील लिलावाच्या शर्ती व अटी मिळकत विभागात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. लिलाव मंजूर व अथवा ना मंजूर करणेचा अधिकार कोणतेही कारण न देता न.प.ने राखून ठेवला आहे.

| अ. न. | शॉपिंग सेंटरचे नाव | गाळा नंबर | अनामत .रक्कम | लिलाव बोलीची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | कै. देशभक्त ना.म. जगताप (थिएटर समोरील) | पार्किंग जागा | १,००,०००/- | ५,०००/- |
| २ | डॉ. बाबासाहेब आंबेबडकर शॉपिंग सेंटर | ५०, ५१, ५२, ५८, १७ | ३५,०००/- ७५,०००/- | ५,०००/- ५,०००/- |
| ३ | न.प. दवाखाना शॉपिंग सेंटर | ३, ४, १३, १४, १५, १६, १७ | १०,०००/- | २,०००/- |
| ४ | दत्त पेठ शॉपिंग सेंटर | १ | ७५,०००/- | ५,०००/- |
| ५ | भाजी मंडई व व्यापारी संकुल | १५ | १,७५,५००/- | ५,०००/- |
| ६ | अण्णाभाऊ साठे शॉपिंग सेंटर | २ | ३५,०००/- | ५,०००/- |

सही/-
(सचिन तपसे)
मुख्याधिकारी
करमाळा नगरपरिषद



## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर
मुख्य कार्यालय : ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२ फोन नं-०२१७-२६२२९३४४/२६२२९३३

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेचे**

### फेरजाहीर लिलाव व विक्री नोटीस

ज्या अर्थी सही करणार, विशेष वसुली व विक्री अधिकारी, श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली, सोलापूर हि संस्था महाराष्ट्र कायदा १९६१ अन्वये नोंदणीकृत संस्था असून, त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार दि. २३/०५/२०२३ रोजी मागणी नोटीस कर्जदार नवकार ट्रेडर्स प्रोप्रा सोनाली संजय बलदोटा रा.१०८, बालाजी कॉलनी, सोलापूर रोड, बार्शी व जामीनदार यांना पाठवून रक्कम रु. ३७,८९,५२३.१९ यावर दिनांक ०१/१२/२०२२ पासून पुढे ही सर्व रक्कम परतफेड होईपर्यंत द.सा.द.शे. १४% दराने होणाऱ्या व्याजाची रक्कमची मागणी केलेली होती व आहे. सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून थकबाकीदार यांनी सदर थकीत रक्कम जमा करण्यास कसूर केलेला आहे. तरी बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार पुढील कारवाई करत, सदर स्थावर मिळकतीचे कायदेशीररित्या ताबा घेतलेले आहे. तरी सदर वर नमूद थकीत कर्ज रक्कमेपोटी बँकेने या खाली नमूद केलेले स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव जेथे आहेत व जैसे आहेत अशा त्या त्या मिळकती त्या त्या परीस्थिती मध्ये विक्री करणार आहोत

**जाहिर लिलाव व विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेचे वर्णन पुढीलप्रमाणे असे.**

**कर्जदार -**
नवकार ट्रेडर्स प्रोप्रा. सोनाली संजय बलदोटा
**जामीनदार -**
१. ऋषभ संजय बलदोटा रा. १०८, बालाजी कॉलनी, सोलापूर रोड, बार्शी

| मिळकतदाराचे नाव | मिळकतीचे वर्णन | राखीव किंमत |
|---|---|---|
| **सोनाली संजय बलदोटा** | डी व सब डी सोलापूर पैकी ता. बार्शी नगरपालिका हद्दीतील गट नं. १४१०/६/अ/१४१०/७/१३६४/३/२/९३ क्षेत्र २.०७.०५ आर. चौ.मी. आकार १३७.०० **चतुसिमा : -** पूर्वेस - प्लॉट नं.९२, दक्षिणेस - प्लॉट नं.९४, पश्चिमेस -९ मी. रुंदीचा रस्ता, उत्तरेस-९ मी. रुंदीचा रस्ता | रु. १८,९३,६८१/- |
| लिलावाचे ठिकाण तारीख व वेळ | श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर-४१३००२ **बंद लिफाफ्यात निविदा सादर करणेचे दिनांक** - २०/०३/२०२६ **वेळ** - सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत **निविदा उघडण्याची तारीख व वेळ** - दि. २०/०३/२०२६ सायंकाळी ५.०० वाजता | |
| ३१/१०/२०२५ अखेर येणेबाकी | रु. ६८,२९,५४८/-दि. ०१/११/२०२५ पासून पुढील व्याज, दंडव्याज व इतर खर्च | |

टिप- १. लिलावात भाग घेणार यांनी राखीव किमतीच्या १०% बयाणा रक्कम दि. १८/०३/२०२६ पूर्वी दुपारी ३:०० वाजेपर्यंत डिमांड ड्राफ्ट/आरटीजीएस अथवा पे ऑर्डर ने भरणा करावी. बयाणा रक्कम भरणा केल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.
२, लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाच्या दिवशी लिलावापूर्वी वाचून दाखविण्यात येईल आणि त्या बँकेच्या सूचना पत्रकामध्ये दिले जातील.
३. लिलावापूर्वी थकबाकीदाराने रक्कम भरल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.
४. लिलाव मिळकतीसंबंधी अधिक माहिती पाहिजे असल्यास बँकेच्या प्रधान कार्यालयात संपर्क साधावा.

**दिनांक - ०१/०३/२०२६**
**स्थळ- सोलापूर**

सही/-
सही/-विशेष वसुली व विक्री अधिकारी,
श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली, सोलापूर



**asREC (India) Limited**
Bldg. No. 2, Unit No. 201-202A & 200-202B, Gr. Floor, Solitaire Corporate Park, Andheri Ghatkopar Link Road, Chakala, Andheri (East), Mumbai-400 093.

**परिशिष्ट-IV-A**
**लिलावासाठी सार्वजनिक सूचना - स्थावर मालमत्तेची विक्री**

**लिलावासाठी साव (सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ९ सह वाचलेले नियम ८(६) अंतर्गत)**

कारण, ASREC (इंडिया) लिमिटेड ही एक सिक्युरिटायझेशन आणि ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी आहे (यापुढे ASREC म्हणून संदर्भित) आणि 22/10/2022 रोजी फोक्सवॅगन फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड सोबत केलेल्या असाइनमेंट करारानुसार कर्जदार खात्याची सुरक्षित कर्जदार आहे. ASREC-PS 03/2022-23 ट्रस्टचे विश्वस्त म्हणून काम करत आहे आणि त्यांनी मेसर्स ABS व्हील्स प्रायव्हेट लिमिटेड, 1. दिवंगत श्री. अय्युब बाबुमियाँ शेख (संचालक आणि हमीदार) यांचे संचालक आणि हमीदार यांचे सुरक्षित कर्ज त्यांच्या कायदेशीर वारस श्री. अर्शद अय्युब शेख, श्री. तोहिद अय्युब शेख, 2. श्री. अर्शद अय्युब शेख, 3. श्री. तोहिद अय्युब शेख, मूळ कर्जदात्या, फोक्सवॅगन फायनान्स प्रायव्हेट लिमिटेडकडून अंतर्निहित सिक्युरिटीजसह मिळवले आहे.

ASREC (इंडिया) लिमिटेडच्या अधिकृत अधिकाऱ्याने, 'सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002' (SARFAESI) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, 2002' अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून, कर्जदार/संचालक/गहाणखत/जामीनदारांना रु. ची परतफेड करण्याचे आवाहन करणारी मागणी सूचना 31/08/2023 रोजी जारी केली होती. 14/09/2022 रोजी 1,85,52,994.09 (रुपये एक कोटी पंच्याऐंशी लाख बावन्न हजार नऊशे चौऱ्याण्णव आणि नऊ पैसे) देय आणि देय आहेत. यावरील व्याज पुढील आहे. या कर्जदारांना आणि संयुक्त/सह-कर्जदारांना देण्यात आलेल्या कायद्याच्या कलम 13(2) अंतर्गत मागणी सूचनांमध्ये नमूद केल्यानुसार 60 दिवसांच्या निर्धारित कालावधीत. एकूण थकबाकीची माहिती खाली दिली आहे:

| खात्यांचे नाव | रक्कम |
|---|---|
| 1. मेसर्स एबीएस व्हील्स प्रायव्हेट लिमिटेड,चे संचालक आणि जामीनदार 2. दिवंगत श्री. अय्युब बाबुमियाँ शेख त्यांच्या कायदेशीर वारसांद्वारे श्री. अर्शद अय्युब शेख श्री. तोहिद अय्युब शेख 3. श्री. अर्शद अय्युब शेख 4. श्री. तोहिद अय्युब शेख | सुविधेचा प्रकार नवीन कार युनिट फंडिंग डीलर कोड: VW_SOL_ABS ग्राहक आयडी : 9001001570 14/09/2022 रोजी रु. 1,85,52,994.09 आणि 15/09/2022 पासून वार्षिक 13.00% दराने अतिरिक्त व्याज + त्यावर 2% दराने दंडात्मक व्याज. |
| एकूण थकबाकी रक्कम | वरीलप्रमाणे पुढील व्याजासह रु. 1,85,52,994.09 |

कर्जदार/संचालक/गहाणखतदार/जामीनदारांनी सदर कायद्याच्या कलम 13 (2) अंतर्गत दिनांक 31/08/2023 रोजीच्या मागणी सूचनेनुसार संपूर्ण थकबाकी परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, साठ दिवसांच्या विहित कालावधीत आणि 22/10/2022 रोजीच्या ASREC (इंडिया) लिमिटेडच्या नावे दिलेल्या असाइनमेंट करारानुसार, ASREC (इंडिया) लिमिटेडच्या अधिकृत अधिकाऱ्याने, सिक्युरिटीज अंमलबजावणी (व्याज) नियम, 2002 च्या कलम 13(4) अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून, 04/07/2025 रोजी येथे नमूद केलेल्या अनुसूचित मालमत्तेच्या संदर्भात येथे दिलेल्या अनुसूचित मालमत्तेचा, विशेषतः येथे दिलेल्या अनुसूचित मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतला.

संपूर्ण देणी अद्याप फेडली गेली नसल्यामुळे, सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदारांना, संचालकांना आणि जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की अधिकृत अधिकारी येथे कलम 13 (2) नोटीस अंतर्गत, वरील मागणीनुसार, खात्यातील थकबाकी वसूल करण्यासाठी खाली नमूद केलेली सुरक्षित मालमत्ता विकण्याचा विचार करीत आहेत. सूचनेनंतर मिळालेल्या देयकाचे योग्य क्रेडिट देऊन, जर काही असेल तर, आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट ॲक्ट, 2002 अंतर्गत, आणि म्हणूनच सुरक्षित मालमत्तेच्या खरेदीसाठी सीलबंद लिफाफ्यात निविदा/बोली मागविण्यात येत आहेत.

ही मालमत्ता जशी आहे तिथे, जशी आहे जे आहे, जशी आहे जी परिस्थिती आहे. आणि कोणतीही वसुली नाही या तत्त्वांवर विकली जाईल. एकूण 1,85,52,994.09 रुपये (रुपये एक कोटी पंच्याऐंशी लाख बावन्न हजार नऊशे चौऱ्याण्णव आणि नऊ पैसे फक्त) वसूल करण्यासाठी मेसर्स एबीएस व्हील्स प्रायव्हेट लिमिटेडच्या सुरक्षित कर्जदाराला देय असलेल्या वर नमूद केलेल्या अतिरिक्त व्याजासह. 1. दिवंगत श्री. अय्युब बाबुमियाँ शेख यांचे संचालक आणि जामीनदार. (संचालक आणि जामीनदार) त्यांचे कायदेशीर वारस श्री. अर्शद अय्युब शेख, श्री. तोहिद अय्युब शेख, 2. श्री. अर्शद अय्युब शेख, 3. श्री.तोहिद अय्युब शेख यांच्यामार्फत. राखीव किंमत आणि ईएमडी इत्यादी खाली दिल्या आहेत:

| मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत (रु. लाखात) | ई.एम.डी. (रु. लाख) | बोली वाढ (रु. लाखात) |
|---|---|---|---|
| 00 हेक्टर 87 आरे मोजमाप असलेली जमीन, बेअरिंग सर्वे क्रमांक 103, हिस्सा क्रमांक 1, कसबे सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर येथे आहे, जी सोलापूर महानगरपालिकेच्या स्थानिक हद्दीत आणि नोंदणी जिल्हा उपनिबंधकांच्या अधिकारक्षेत्रात आहे. सोलापूर, जिल्हा सोलापूर ही जमीन श्री. तोहिद अय्युब शेख आणि श्री. अर्शद अय्युब शेख यांच्या मालकीची आहे. | 180.00 | 18.00 | 1.00 |
| एकूण | 180.00 | 18.00 | |

लिलावाची माहिती:
* लिलावाची तारीख आणि वेळ: 24/03/2026 सकाळी 11.00 वाजता
* मालमत्तेची तपासणी (पूर्व भेट घेऊन): 17/03/2026 रोजी दुपारी 02.00 ते दुपारी 04.00 पर्यंत.
* बिड फॉर्म जमा करणे: 04/03/2026 ते 23/03/2026 - सकाळी 10.00 ते दुपारी 4.00 पर्यंत.
* बिड फॉर्म जमा करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: 23/03/2026 ते संध्याकाळी 5.00 पर्यंत.

बोली अर्ज संकलन/सबमिशनचे ठिकाण आणि लिलावाचे ठिकाण: ASREC (INDI) Ltd. च्या कार्यालयातून. 200-201 आणि 200B-202, इमारत क्रमांक 2, तळमजला, सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, अंधेरी-घाटकोपर लिंक रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई - 400 093. निविदा अर्ज ASREC (INDI) Ltd. च्या वेबसाइटवरून देखील डाउनलोड करता येतील. (www.asrecindia.co.in). ASREC कडून प्राप्त झालेले प्रस्ताव/निविदा अधिकृत अधिकाऱ्यांद्वारे 24.03.2026 रोजी सकाळी 11.00 वाजता आमच्या वर नमूद केलेल्या कार्यालयीन पत्त्यावर उघडल्या जातील जिथे आंतर-निविदा होऊ शकतात.

**अटी आणि शर्ती:**
1. अधिकृत अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, मालमत्तेवर इतर कोणतेही भार नाहीत. इच्छुक बोलीदारांनी त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेवर परिणाम करणारे भार, लिलावात ठेवलेल्या मालमत्तेचे मालकी हक्क आणि दावे/हक्क/देयके याबद्दल स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी. सार्वजनिक लिलावाची जाहिरात ASREC ची कोणतीही वचनबद्धता किंवा कोणतेही प्रतिनिधित्व करत नाही आणि ती मानली जाणार नाही. मालमत्ता ASREC ला ज्ञात असो वा अज्ञात असो, सर्व विद्यमान भारांसह विकली जात आहे. अधिकृत अधिकारी / सुरक्षित क्रेडिटर कोणत्याही तृतीय पक्षाच्या दाव्यांसाठी/हक्कांसाठी/मतदानासाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.
2. वर नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण मालमत्तेचा लिलाव जसे आहे तिथे आहे, जसे आहे जे आहे आणि जसे आहे जे आहे तेथे आहे आणि कोणताही आधार नाही या तत्त्वावर केला जाईल.
3. निविदा दस्तऐवजात दिलेल्या विहित नमुन्यातील बोली आणि 10% ईएमडी रक्कम डिमांड ड्राफ्ट किंवा खाली दिलेल्या तपशीलांनुसार आरटीजीएसद्वारे निधी हस्तांतरण, एएसआरईसी (इंडिया) लिमिटेड, बिल्डिंग क्रमांक 2, युनिट क्रमांक 201-202A आणि 200-202B, ग्रा. फ्लोअर, सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, अंधेरी घाटकोपर लिंक रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई - 400093 चे अधिकृत अधिकारी यांच्याकडे सादर करावी. 23/03/2026 रोजी सायंकाळी 5:00 नंतर कोणत्याही कारणास्तव प्राप्त झालेला बोली फॉर्म किंवा ईएमडी कोणत्याही कारणास्तव स्वीकारला जाणार नाही. ईएमडीशिवाय बोली थोडक्यात नाकारली जाईल.
4. यशस्वी बोलीदाराची बयाणा रक्कम (EMD) विक्रीच्या काही भागासाठी राखून ठेवली जाईल. अयशस्वी बोलीदारांची एचऊ त्याच प्रकारे परत केली जाईल. EMD वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही. जलद आणि योग्य परतफेड सुलभ करण्यासाठी बोलीदारांना त्यांच्या बँक खात्याची माहिती देण्याची विनंती केली जाते.
5. यशस्वी बोलीदाराने ताबडतोब म्हणजेच त्याच दिवशी किंवा पुढील कामकाजाच्या दिवसापूर्वी, जसे की, अधिकृत अधिकाऱ्याकडे विक्री किमतीच्या 25% (जमा केलेल्या एचऊ रकमेसह) जमा करावे आणि अशी ठेव न भरल्यास, एचऊ जप्त केली जाईल आणि मालमत्ता पुन्हा विकली जाईल.
6. विक्री किमतीची उर्वरित रक्कम मालमत्तेच्या विक्रीची पुष्टी झाल्यापासून 15 दिवस आधी किंवा सुरक्षित धनको आणि यशस्वी बोलीदार यांच्यात लेखी सहमती झाल्याप्रमाणे वाढवलेल्या कालावधीत भरली जाईल. वरील निर्धारित कालावधीत पैसे न भरल्यास, ठेव जप्त केली जाईल आणि मालमत्ता पुन्हा विकली जाईल आणि कसुरी खरेदीदार मालमत्तेवरील सर्व दावे जप्त करेल. किंवा नंतर विकल्या जाणाऱ्या रकमेच्या कोणत्याही भागापर्यंत.
7. विक्री ही सिक्युरिटायझेशन आणि वित्तीय मालमत्तेचे पुनर्निर्माण आणि सुरक्षा हितसंबंध अंमलबजावणी कायदा, 2002 अंतर्गत विहित केलेल्या नियम/शर्तींच्या अधीन असेल.
8. ईएमडी रकमेशिवाय आणि राखीव किंमतीपेक्षा कमी असलेली बोली स्वीकारली जाणार नाही/पुष्टी केली जाणार नाही.
9. इच्छुक खरेदीदार/बोलीदारांनी ईएमडी रक्कम एनईएफटी/ आरटीजीएस द्वारे बँक ऑफ इंडिया, एसएसआय, अंधेरी शाखा, आयएफएससी कोड: BKID0000090 मध्ये खाते क्रमांक: 009020110001570 मध्ये जमा करणे आवश्यक आहे. लाभार्थीचे नाव: ASREC-PS-03/2022-23 ट्रस्ट, किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे कोणत्याही राष्ट्रीयीकृत किंवा अनुसूचित बँकेत काढलेल्या आणि मुंबईत देय असलेल्या ASREC-PS-03/2022-23 ट्रस्टच्या नावे काढलेल्या आणि.
10. इच्छुक बोलीदार मालमत्तेची तपासणी करू शकतात. 17/03/2026 रोजी दुपारी 2.00 ते 4.00 वाजेपर्यंत खालील अधिकाऱ्यांना पूर्वसूचना देऊन. संपर्क तपशील: श्री. हर्षद व्ही. - सेल क्रमांक 9594692251, 022-61387057, श्री. जगदीश शाह - सेल क्रमांक 7021428336, 022-61387042, यांच्याशी कोणत्याही प्रश्नासाठी संपर्क साधता येईल.
11. अधिकृत अधिकाऱ्यांना कोणतेही कारण न देता कोणत्याही किंवा सर्व ऑफर स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा आणि/किंवा कोणत्याही अटी/शर्तींमध्ये बदल करण्याचा पूर्ण अधिकार आहे.
12. यशस्वी बोलीदार कायद्यानुसार लागू असलेले नोंदणी, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, आनुषंगिक खर्च इत्यादींसाठी देय असलेले शुल्क/शुल्क सहन करेल.
13. विक्रीच्या अटी आणि शर्तींचे पालन केल्यावर आणि विक्रीची पुष्टी केल्यानंतर अधिकृत अधिकारी यशस्वी कंपन्यांच्या नावे विक्री प्रमाणपत्र जारी करेल. बोली लावणारा.
14. वर नियोजित लिलाव कोणत्याही कारणास्तव अयशस्वी झाल्यास, ASREC ला या सूचनेद्वारे खाजगी कराराद्वारे किंवा सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम आणि ASRFESI कायदा, 2002 च्या नियम 8(5) च्या तरतुदींनुसार लिलावाअंतर्गत सुरक्षित मालमत्ता विकण्याचा अधिकार आहे.
15. सर्वोच्च बोली सुरक्षित धनको/अधिकृत अधिकाऱ्याच्या मान्यतेच्या अधीन असेल.

ही सूचना कर्जदार आणि संयुक्त/सह-कर्जदारांना 15 (पंधरा) दिवसांची सूचना म्हणून दिली जाते/वरील उल्लेख केलेल्या सरफेसी कायदा आणि सुरक्षा हितसंबंध (अंमलबजावणी) नियमांच्या नियम 8(6) आणि 9(1) अंतर्गत सुरक्षित मालमत्तेच्या विक्रीसाठी जामीन.

**दिनांक : 04/03/2026**
**ठिकाण : मुंबई**

सही/-
अधिकृत अधिकारी,
ASREC (इंडिया) लि.

# टी-२० विश्वचषकाचा थरार





## महत्त्वाचे

### दुबईत अडकलेली सिंधू ऑल इंग्लंड स्पर्धेला मुकणार

**बर्मिंगम** : अमेरिकेने इराणवर केलेल्या बॉम्बहल्ला व त्यामुळे आखाती प्रदेशात हवाई क्षेत्र बंद झाल्यामुळे दुबईत अडकून पडल्यानंतर दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती पी. व्ही. सिंधू मंगळवारपासून येथे सुरू होणाऱ्या ऑल इंग्लंड बॅडमिंटन स्पर्धेला मुकणार आहे. तिच्या प्रवासात अडथळे आले आहेत, इराणवर अमेरिका आणि इस्रायली हल्ल्यांमुळे व त्यानंतर तेहरानने केलेल्या प्रत्युत्तरामुळे उड्डाणे स्थगित झाल्यानंतर सिंधू शनिवारपासून दुबईत अडकली आहे. यात सिंधू आणि तिचा इंडोनेशियन प्रशिक्षक इरवंस्याह आदी प्रतामा यांचा समावेश आहे, त्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणाजवळ झालेल्या स्फोटातून ते थोडक्यात बचावले. त्यानंतर आखाती देशांमध्ये तणाव वाढल्याने त्यांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले. सिंधू पहिल्या फेरीत थायलंडच्या सुपानिदा काटेथोंगशी सामना करणार होती, परंतु दुबईचे हवाई क्षेत्र आणि विमानतळ बंद असल्याने तिला स्पर्धेतून माघार घ्यावी लागेल. सिंधूचा सहभाग अनिश्चित असला तरी, तिचे काही संघमित्र सिंगापूर आणि आफ्रिकेच्या पर्यायी मार्गांनी बर्मिंगमला पोहोचण्यात यशस्वी झाले आहेत. लक्ष्य सेन व आयुष शेट्टी हे कोणत्याही प्रवासाच्या अडचणीशिवाय पोहोचले आहेत.



# न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका आज उपांत्य सामना

◆ **कोलकाता, २ मार्च**

आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धा आता अंतिम टप्प्यात पोहोचली असून बुधवारी कोलकाता येथे न्यूझीलंड वि. दक्षिण आफ्रिका यांच्यात पहिला, तर गुरुवारी गतविजेता भारत आणि इंग्लंड यांच्यात दुसरा उपांत्य सामना खेळला जाणार आहे.

या टी-२० विश्वचषक उपांत्य फेरीपर्यंत पोहोचताना दक्षिण आफ्रिकेने फारशी चूक केलेली नाही, परंतु बुधवारी ईडन गार्डन्सवर दक्षिण आफ्रिकेची गाठ न्यूझीलंडशी पडेल, तेव्हा त्यांच्या आत्मसंतुष्टतेला स्थान नाही. दक्षिण आफ्रिका हा स्पर्धेतील एकमेव अपराजित संघ आहे.

आम्ही विजेतेपदाचे प्रबळ दावेदार आहोत याचा मला आनंद आहे. प्रबळ दावेदार म्हणून खेळता यावे असे मला नेहमीच वाटते, असे दक्षिण आफ्रिकेचे मुख्य प्रशिक्षक शुक्री कॉनराड म्हणाले.

अफगाणिस्तानविरुद्धच्या दुहेरी सुपर ओव्हरमध्ये टिकून राहिल्यापासून, एडेन मार्करामच्या संघाने अद्यापही आपले पाऊल मागे घेतलेले नाही. क्विंटन डी कॉक, मार्कराम व रायन रिकेल्टन यांच्या रूपात, ते पॉवरप्लेच्या सुरुवातीलाच मदत करू शकणारी अव्वल फळी म्हणून खेळतात, तर सलामीवीरांनी फटकेबाजी न केल्यास मधल्या फळीला फारसा आराम मिळत नाही.

दक्षिण आफ्रिकेला विविध गोलंदाजी आक्रमणाची जोड मिळते. कॅगिसो रबाडा व मार्को जॅनसेनने प्रतिस्पर्धी संघांच्या फलंदाजांना नेहमीच अडचणी टाकले आहेत, तर लुंगी नगिदीचे बदल टप्प्याटप्प्याने एक नवीन अनुभव आहेत. डावखुरा फिरकी गोलंदाज केशव महाराज नियंत्रण देतो, तर मार्कराम सामन्यांसाठी स्वतःला रोखून ठेवतो.

दक्षिण आफ्रिका आतापर्यंत अशुभ दिसत आहे पण बाद फेरीत स्वतःचे आव्हान आहे. शिवाय, न्यूझीलंड एक अवघड प्रतिस्पर्धी असू शकतो.

न्यूझीलंडचा सलामीवीर फिन ऍलनचा अति आक्रमकपणा हा अनेकदा पॉवरप्लेमध्ये व्यत्यय आणणारा असतो, यात जोडीदार - डेव्हॉन कॉनवे किंवा टिम सेफर्ट यांचा समावेश आहे.

अष्टपैलू रचिन रवींद्रमध्ये सामन्याचे चित्र बदलण्याची क्षमता आहे. ग्लेन फिलिप्स आणि डॅरिल मिशेल यांना बॅकएंडवर आक्रमण करण्यासाठी एक व्यासपीठ तयार करते. त्यांच्या वेगवान आक्रमणात स्थिरता नाही. न्यूझीलंडला वेगवान गोलंदाज मॅट हेनरीची कमतरता भासण्याची शक्यता आहे. तो पितृत्व रजेवर मायदेशी परतला आहे. जेकब डफी किंवा काइल जेमीसन त्याची जागा घेऊ शकतात.

कर्णधार मिशेल सँटनरचा मार्करामविरुद्ध महत्त्वाचा सामना आहे. ईश सोधीचा लेग-स्पिन दक्षिण आफ्रिकेला त्रास देऊ शकतो.

आम्ही अहमदाबादमध्ये त्यांचा सामना केला, मला वाटते की ते असे ठिकाण आहे, तिथे त्यांनी बराच वेळ घालवला आहे, असे न्यूझीलंडचे मुख्य प्रशिक्षक रॉब वॉल्टर म्हणाले.

उपांत्य सामने वेग-वेगळ्या ठिकाणी होतील, ते एक वेगळे आव्हान असेल, असेही ते म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)



सराव करताना दक्षिण आफ्रिकेचे खेळाडू

**बुधवारी पहिला उपांत्य सामना**

**न्यूझीलंड वि.त दक्षिण आफ्रिका**
**स्थळ** : ईडन गार्डन्स स्टेडियम, कोलकाता
**वेळ** : सायं. ७.०० वाजतापासून

**गुरुवारी दुसरा उपांत्य सामना**

**भारत वि. इंग्लंड**
**स्थळ** : वानखेडे स्टेडियम, मुंबई
**वेळ** : सायं. ७.०० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

**रविवार ८ मार्च- अंतिम सामना**



# वानखेडेवर रंगणार महामुकाबला!

## सेमीफायनलमध्ये भारत-इंग्लंड आमनेसामने

**मुंबई, दि. ३ मार्च -**

आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६चा थरार आता अंतिम टप्प्यात पोहोचला असून या स्पर्धेचा दुसरा उपांत्य फेरीचा सामना उद्या गुरुवारी, ५ मार्च रोजी मुंबईच्या ऐतिहासिक वानखेडे स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. विशेष म्हणजे, या हाय-व्होल्टेज सामन्यात यजमान भारत आणि इंग्लंड हे दोन बलाढ्य संघ एकमेकांशी भिडणार आहेत.

मुंबईचे वानखेडे स्टेडियम हे भारतीय क्रिकेटसाठी नेहमीच लकी राहिले आहे. घरच्या मैदानावर आणि प्रेक्षकांच्या तुफान प्रतिसादात भारतीय संघ इंग्लंडला धूळ चारून फायनलचे तिकीट नक्की करणार का, याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. २०११च्या विश्वचषकाची आठवण करून देणाऱ्या या मैदानावर पुन्हा एकदा इतिहास घडवण्यासाठी 'मेन इन ब्लू' सज्ज झाले आहेत. संजू सॅमसन सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये आहे (वेस्ट इंडिजविरुद्धच्या शेवटच्या सामन्यात त्याने नाबाद ९७ धावांची खेळी केली). त्यासोबतच सूर्यकुमार यादव आणि हार्दिक पांड्या यांच्या कामगिरीवर भारताची मदार असेल. इंग्लंडकडून कर्णधार जोस बटलर आणि हॅरी ब्रूक हे भारतासाठी मोठे आव्हान ठरू शकतात. जर ५ मार्च रोजी पावसामुळे सामना झाला नाही, तर आयसीसीने यासाठी ६ मार्च (शुक्रवार) हा 'राखीव दिवस' म्हणून ठेवला आहे.



### सालसेची कुस्तीपटू सानिका काळे शिरूर केसरीची मानकरी

**जेऊर दि.३ मार्च-**

सालसे (ता. करमाळा) येथील सानिका संतोष काळे हिने शिरूर (जि. पुणे) येथे ४० किलो वजन गटातील महिला कुस्ती स्पर्धेमध्ये प्रथम मानाचा शिरूर केसरी किताब मिळवला आहे. सानिका ही सध्या राष्ट्रकुल क्रीडा संकुल कोल्हापूर येथे आंतरराष्ट्रीय सुवर्णपदक विजेते राम सारंग व अजिंक्यतारा कुस्ती संकुल शिक्रापूर पुणे येथे कुस्तीचे प्रशिक्षण घेत आहे. या यशाबद्दल करमाळा पंचायत समिती सदस्य दशरथ शेठ घाडगे, साई उद्योग समूहाचे उद्योगपती सुनील शेठ कदम, विघ्नहर्ता केमिकल नवी मुंबईचे उद्योजक बाळासाहेब हांडे, सर्पनाथ सेवा मंडळ पुणे ग्रुपचे अध्यक्ष दत्तात्रय खराडे, पत्रकार संतोष राऊत आदींनी अभिनंदन केले.



### आंतरराष्ट्रीय लॉन टेनिसपटू अंकिता रैना यांच्या निवासस्थानी भेट

#### राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा गृह-संवाद अभियान

**पुणे, दि. ३ मार्च -**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला शंभर वर्ष झाल्या निमित्त देशभर व देशाबाहेर विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्याअंतर्गत कर्वेनगर मधील गृह-संवाद कार्यक्रमानिमित्त कर्वेनगर निवासस्थान असलेल्या आंतर राष्ट्रीय लॉन टेनिसपटू व २०१८च्या अर्जुन पुरस्कार विजेत्या अंकिता रैना यांची पश्चिम क्षेत्र संपर्क प्रमुख कैलास सोनटक्के, कर्वेनगर संघचालक उदयन पाठक, गिरीजा शंकर, नटराज वस्ती सह सयोंजिका संजीवनी महाजन, कर्वेनगर संपर्क प्रमुख अनिल वाघ यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली. ह्या प्रसंगी अंकिता रैना सोबत त्यांचे बंधू अंकुर रैना व मातोश्री उपस्थित होत्या. कैलासजी सोनटक्के यांनी त्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त संघाच्या कार्याची,सेवा उपक्रमाची व पंचपरिवर्तना विषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी अंकिताला पंचपरिवर्तन पुस्तक व त्यांच्या बंधूंना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्वर्णिम भारत के दिशा सूत्र पुस्तके व भारतमातेच्या प्रतिमेचे कार्ड भेट स्वरूपात दिले. रैना कुटुंब पुण्यातील अन्य काश्मिरी कुटुंबे आणि नगर रस्त्यावरील कश्मीर भवनाच्या संपर्कात आहेत. रैना कुटुंबियांशी पाऊण तासापेक्षा जास्त वेळ संवाद झाला. कर्वेनगर येथील गिरिजा शंकर, नटराज वस्तीच्या हिंदू संमेलनाला पुण्यात असल्यास आवर्जून उपस्थित राहीन असे अंकिता रैना हिने सांगितले.

# लिटिल फ्लॉवर स्कूलची आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत १५ पदकांची कमाई



**सोलापूर, दि. ३ मार्च-**

गोवा येथे झालेल्या १०व्या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत लिटिल फ्लॉवर कॉन्व्हेंट स्कूलच्या आठ विद्यार्थ्यांनी आपापल्या वयोगट व वजनी गटात ७ सुवर्ण, ३ रौप्य व ५ कांस्य अशी १५ पदके पटकाविली. ॉ

त्यांना मुख्य कराटे प्रशिक्षिका शिहान अनुराधा महादेव थोरात यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मुख्यध्यापिका सिस्टर सेलिन यांनी अभिनंदन केले.

**कामगिरी केलेले स्पर्धक : काता व कुमिते : मुले:** माहीर सुनिल सिक्केरा), सच्चीदानंदा सिद्राम येलदी (२ सुवर्ण), विश्वराज कृष्णदेवराय गरड (सुवर्ण, कांस्य), राजवीर सुशांत बामणे (सुवर्ण), रुत्विक पोनामंडा (रौप्य) ऋतुराज सुशांत बामणे (रौप्य) दिलनवाज इलाही पठाण (कांस्य, कांस्य). **मुली :** शिवप्रिया सिद्राम येलदी (कांस्य, सुवर्ण),अरफा अल्ताफ जमादार (कांस्य, रौप्य).



# वीर विजय अकलूज क्रिकेट संघास विजेतेपद

**तभा वृत्तसेवा**
**वेळापूर, दि. ३ मार्च-**

पिसेवाडी (ता. माळशिरस) येथे रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त झालेल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत अकलूज क्रिकेट संघाने विजेतेपद पटकाविले. अंतिम सामन्यात त्यांनी दत्तनगर खंडाळी संघाचा पराभव केला. युवानेते साहिल आतार व मित्र परिवाराच्या वतीने याचे आयोजन करण्यात आले होते. पारितोषिके आमदार उत्तमराव जानकर यांच्या हस्ते देण्यात आली. यावेळी पांडुरंग तात्या वाघमोडे, रिपाई आठवले माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, डॉ. स्नेहलताई जानकर, वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, सोमनाथ पिसे, रायचंद खाडे, इलाई आतार, डॉ.धनंजय म्हेत्रे आदी उपस्थित होते.

### बार्शीच्या पृथा ठोंबरे हिला आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त

**सोलापूर, दि. ३ मार्च-**



पी.आर. चेस वर्ल्ड अकॅडमीमध्ये ऑनलाइन पद्धतीने बुद्धिबळ शिकत असलेल्या बार्शीच्या पृथा नीलकंठ ठोंबरे हिने १४९७ असे आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त केले आहे. जागतिक बुद्धिबळ संघटना, अखिल भारतीय बुद्धिबळ संघटना आणि महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेच्या मान्यतेने आयोजित केलल्या खुल्या फिडे आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत सहभागी होऊन पृथाने शिवम तम्हाने (१५५७) व मंदार कोरने (१५६१) यांना नमविले. देवांश तोतला (१५५४), मंगेश बोदडे (१५४०), अनाया गुप्ता (१६०१) रोही श्री मघम (१४८६), वर्णिका तविषा गंधम (१५१६) ह्यांच्या सोबत बरोबरी केली. पृथाने सोलापूर जिल्ह्यात ११ वर्षाखालील मुलींच्या वयोगटात ही नेत्रदीपक कामगिरी केली आहे. पृथाला आंतरराष्ट्रीय पंच व इंडिया बुक रेकॉर्ड होल्डर पवन क. राठी, नितीन अग्रवाल, वरिष्ठ राष्ट्रीय पंच व बुद्धिबळ प्रशिक्षिका रोहिणी तुम्मा, राज्य पंच व बुद्धिबळ प्रशिक्षिका जयश्री कोंडा यांचे मार्गदर्शन लाभले.

# चिखली व वसईला राज्य खो-खो पंच परीक्षा संपन्न

**धाराशिव, दि. ३ मार्च-**



खो खो इंडियाशी संलग्न ॲम्युचर खो खो असोसिएशन महाराष्ट्र यांची राज्य पंच परीक्षा रविवारी (दि. १ मार्च) रोजी वसई (जि. पालघर) व चिखली (जि. धाराशिव) या दोन केंद्रांवर संपन्न झाली. ही पंच परीक्षा खो-खो इंडियाच्या नियमावलीनुसार झाली.

महाराष्ट्राचे समन्वयक सुरेश गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली वसईत केंद्रप्रमुख जयवंत बोभाटे व चिखलीत विभीषण पाटील यांच्या माध्यमातून घेण्यात आली. वसईत २० तर चिखलीत ३२ पंचांनी परीक्षा दिली. वसईत किरण पष्टे व चिखली येथे अजय पवार यांनी निरीक्षक म्हणून काम पाहिले. लवकरच राष्ट्रीय पंच परीक्षेच्या तारखेचे वेळापत्रक जाहीर होईल असे, श्री. गांधी यांनी जाहीर केले आहे.

# खेळाडू विद्यार्थ्यांचे ग्रेस गुणाचे प्रस्ताव विनाशुल्क घ्या

## क्रीडा व शारिरीक शिक्षण शिक्षक महासंघाची मागणी

**सोलापूर, दि. ३ मार्च-**

पुणे बोर्डाने दहावी व बारावीच्या खेळाडू विद्यार्थ्यांने ग्रेस गुणाचे प्रस्ताव विनाशुल्क घ्यावेत, अशी मागणी सोलापूर शहर व जिल्हा क्रीडा व शारिरीक शिक्षण शिक्षक महासंघाने केली आहे. याचे निवेदन त्यांनी पुणे विभागाचे क्रीडा उपसंचालक युवराज नाईक यांना दिले आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष दशरथ गुरव व शहराध्यक्ष विठ्ठल कुंभार उपस्थित होते.



पुणे बोर्डाने ग्रेस गुणासंदर्भातील शासन परिपत्रकात, बोर्डाने परीक्षा अर्ज भरताना परीक्षा शुल्क घेतले असताना परत हे गुण मिळण्यास प्रत्येक खेळाडु मागे ८४/- रुपये शुल्क भरावे लागणार आहे. या ग्रेस गुणासाठी सन २०२२-२३ पर्यंत कोणतेही शुल्क आकारले जात नव्हते. हे प्रस्ताव क्रीडा कार्यालयाकडुन बोर्डाकडे जात होते. परंतु सन २०२३-२४ पासुन अशा ग्रेस गुणांच्या प्रस्तावासाठी शुल्क आकारण्यास सुरवात केली. सन २०२३-२४ मध्ये २५, २०२४-२५ मध्ये ४९ रु. आणि या वर्षापासुन ८४ रु. शुल्क जात आहे. गेल्या दोन वर्षात क्रीडा विभाग, आपले सरकार आणि एस एस सी बोर्ड या तिन्ही विभागाकडुन वसुल केला जाणारा हा आवाजावी जिजीया कर माफ करावा. एका खेळाडुला स्पर्धेत सहभागी होणेपासून ते प्राविण्य मिळविणेपर्यंत भरपूर खर्च होतो. त्यात शुल्क आणि वाढत चाललेला शुल्काचा फुगवटा ही बाब शालेय क्रीडा क्षेत्राला हानीकारक आहे.

# पंचाक्षरी लोणार उपविजेता, युनूस शेखला कांस्यपदक

## राज्य शरीरसौष्ठव स्पर्धा : पूजा गट्टू पाचवी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

राज्य अजिंक्यपद महाराष्ट्र श्री शरीरसौष्ठव स्पर्धेत येथील पंचाक्षरी लोणारने विजेतेपद पटकाविले. युनूस शेख कांस्यपदकाचा मानकरी ठरला. महिला गटात पूजा गट्टू ही पाचवी आली. सांगली येथे तरुण भारत व्यायाम मंडळाने ही स्पर्धा आयोजित केली होती. सोलापूर जिल्ह्यातून पाहिली महिला बॉडी बिल्डर पूजा गटटूने महिला बॉडी बिल्डिंग प्रकारात महाराष्ट्रात पाचवे स्थान मिळविले. इलिजिंम क्लबचा पंचाक्षरीने ७५ कि गटात सुवर्णपदक प्राप्त केले. अंतिम फेरीत कोल्हापूरचा अजिंक्य रेडेकर हा स्पर्धेचा विजेता ठरला. पंचाक्षरीला उपविजेता पदावर समाधान मानावे लागले.

७० कि गटात मॅकझिमम जिमचा युनूस शेखने कांस्य पदक संपादिले. या स्पर्धेसाठी जिल्ह्यातील विशाल गायकवाड व संजय हिरेमठ यांनी पंच म्हणून जबाबदारी पार पाडली. त्यांचे जिल्हा बॉडी बिल्डिंग अँड फिटनेस फेडरेशनचे अध्यक्ष संतोष पवार यांनी अभिनंदन केले.



पंचाक्षरी लोणार



पूजा गट्टू



युनूस शेख

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सरकारी योजनांचा जागर; जिल्ह्यात एलईडी व्हॅनद्वारे प्रचार

### जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते मोहिमेची सुरुवात; १५० ते १८० गावात योजनांचा प्रसार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

जिल्हा माहिती कार्यालयाच्या मार्फत जिल्ह्यातील दीडशे पेक्षा अधिक गावांमध्ये विविध विभागाच्या पंधरा तर अनुसूचित जातीच्या दहा योजनांचे व्हिडिओ तीन एलईडी व्हॅनच्या माध्यमातून दाखवले जाणार आहेत. या व्हॅनद्वारे केल्या जाणाऱ्या प्रचार मोहिमेचा शुभारंभ जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी फित कापून केला.

यावेळी उपजिल्हाधिकारी संतोष कुमार देशमुख, प्रांताधिकारी सदाशिव पडदुणे, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी माहिती कार्यालयाच्या या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, एलईडी व्हॅनद्वारे करण्यात येणाऱ्या प्रचारामुळे नियोजित प्रत्येक गावातील शेवटच्या घटकातील नागरिकापर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचविणे शक्य होईल. या उपक्रमामुळे जनजागृती वाढून योजनांचा प्रभावी वापर होण्यास हातभार लागणार आहे, असेही त्यांनी म्हटले.




**२० दिवस चालणार उपक्रम**

दिनांक २ मार्च २०२६ पासून पुढील वीस दिवस हा उपक्रम राबविला जाणार असून, या काळात एलईडी व्हॅन जिल्ह्यातील किमान १५० ते १८० गावांपर्यंत पोहोचून नागरिकांना योजनांची माहिती देणार आहे. यामुळे सर्वसाधारण विभागाच्या १५ योजना तसेच अनुसूचित जातींसाठी असलेल्या १० योजनांचा प्रभावी प्रचार-प्रसार होणार आहे.

**प्रत्येक तालुक्यातील ५ ते ७ गावांत होणार प्रचार**

जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण योजनेअंतर्गत तसेच अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत शासकीय योजनांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी एलईडी व्हॅनद्वारे विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत दोन एलईडी व्हॅनच्या माध्यमातून विविध विभागांच्या १५ योजनांचे व्हिडिओ जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील किमान दहा गावांमध्ये दाखविण्यात येणार आहेत, तर अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत एका एलईडी व्हॅनच्या माध्यमातून अनुसूचित जातींसाठी असलेल्या १० योजनांचा प्रचार ११ तालुक्यातील प्रत्येकी किमान ५ ते ७ गावांमध्ये करण्यात येणार आहे.

**- सुनील सोनटक्के,** जिल्हा माहिती अधिकारी.

## महत्वाचे...




### इरा स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**जेऊर दि.३ मार्च-**

इरा पब्लिक स्कूल जेऊर (ता.करमाळा)चे स्नेहसंमेलन साजरा झाला. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी सरपंच पृथ्वीराज पाटील, ॲड. बाबुराव हिरडे, यश कल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील, अतुल पाटील, महेंद्र पाटील, लक्ष्मण गोडसे, धनंजय शिरस्कर, अमर ठोंबरे, रामेश्वर तळेकर, महेंद्र वाकसे व जयश्री वाकसे, संदिपान गुटाळ, दैनिक तरुण भारतचे प्रतिनिधी नंदकिशोर वलटे, गजेंद्र पोळ, पांडुरंग वाघमारे, हनुमंत बादल, संजय गलांडे, अध्यक्ष डॉ. ब्रिजेश बारकुंड, सुनिल अवसरे, बाबुराव अवसरे, विनोद अवसरे, मुख्याध्यापिका अपेक्षा अवसरे उपस्थित होते. त्याचबरोबर श्रीलंका येथे होणाऱ्या अबॅकस स्पर्धा परीक्षेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान यावेळी करण्यात आला. सूत्रसंचालन बाळासाहेब तोरमल, प्रास्ताविक मुख्याध्यापिका अपेक्षा अवसरे यांनी केले. सुरज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.



### करकंब येथे विक्रमसिंह शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप

**करकंब, दि. ३ मार्च-**

माढा पंचायत समितीचे माजी सभापती विक्रमसिंह शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त करकंब येथील भंडारे वस्ती, लोकरे वस्ती, आंबेमळा, धाकटी वेस, सिध्दनाथ वस्ती,अलंकापुरी वाफळकर वस्ती या करकंब येथील विविध जि.प.प्राथमिक शाळांमधील पहिली ते चौथी तसेच अंगणवाडीतील ५०० विद्यार्थ्यांना अजितसिंह व अशोकसिंह देशमुख मित्र परिवाराकडून आपण या समाजाचे काहीतरी देणे लागतो, विद्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनाचा कार्यात त्यांना थोडीफार मदत व्हावी या भावनेतून शालेय साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम अजितसिंह देशमुख, मुख्याध्यापक जाधव, शिक्षक गोडसे, रेपाळ, गावडे, देवकते, बनसोडे, कडलासकर उपस्थित होते.



### शिवराज कदमचे विज्ञान परीक्षेत यश

**पंढरपूर, दि. ३ मार्च-**

पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या कवठेकर प्रशालेचा विद्यार्थी शिवराज राहुल कदम याने विज्ञान प्राविण्य परीक्षेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला असून करमाळा येथे गौरव सोहळ्यात त्याचा सत्कार करण्यात आला. कवठेकर प्रशालेचा इयत्ता ६ वी 'ड' मधील विद्यार्थी शिवराज राहुल कदम याने विज्ञान प्राविण्य परीक्षेत सोलापूर जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावून यश संपादन केले आहे. याबद्दल पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन वीणा जोशी, अध्यक्ष नानामालक कवठेकर, सचिव सु.र.पटवर्धन व सु.त्रि.अभ्यंकर यांनी शिवराजचे अभिनंदन केले आहे. मुख्याध्यापक व्ही.वाय.पाटील यांच्या हस्ते शिवराज याचा प्रशालेतर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी उपमुख्याध्यापिका विश्वासे, ज्येष्ठ पर्यवेक्षक गडदे व शेलार ज्येष्ठ विज्ञान शिक्षक चंद्रशेखर राजूरकर उपस्थित होते.

### उमरडमध्ये जिओ नेटवर्कचा खोळंबा

**जेऊर, दि. ३ मार्च-**

उमरड (ता. करमाळा) येथे जिओचे नेटवर्कधारक सततच्या नो नेटवर्कने त्रस्त झाले आहेत. आठ दिवसांपासून उमरड आणि परिसरामध्ये जिओ च्या नेटवर्क धारकांना नो नेटवर्कला सामोरे जावे लागत आहे यामुळे नागरिक प्रचंड संतापले आहेत. मागील काही दिवसांत अनेक लोकांनी स्वस्त व उत्तम सेवा देणाऱ्या जिओ नेटवर्क मध्ये आपले कार्ड पोर्ट केले परंतू आता मात्र जिओ सेवा विस्कळीत होत असल्याने ते ग्राहक जिओ कंपनीवर नाराज असल्याचे पहावयास असल्याचे दिसून येत आहेत. आता जिओ मोबाईल नेटवर्कची सेवा खंडित होत असल्याने अनेक जिओचे ग्राहक आपले मोबाईल नेटवर्क बदलत आहेत लवकरच जिओ नेटवर्क टीमने अखंडित सेवा देऊन जिओ धारकांचा मानसिक त्रास थांबवणे गरजेचे बनले आहे.

## निधन वृत्त...

### अशोक जाधव



**सोलापूर, दि. ३ मार्च-**

अशोक किसनराव जाधव (वय ७५) यांचे दिनाक १ मार्च २०२६ अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली , मुलगा, आणि नात असा परिवार आहे.

### पांडुसिंग जनवर



**पिलीव, दि. ३ मार्च-**

पिलीव (ता. माळशिरस) येथील माजी ग्राम पंचायत सदस्य व सुळेवाडी सोसायटीचे माजी चेअरमन पांडुसिंग लालसिंग जनवर (वय ६८) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. महावितरणचे सहाय्यक अभियंता संतोष जनवर व प्रशांत जनवर यांचे ते वडील होत.



### संत ज्ञानेश्वर महाराज पालखी तळालगतच्या रस्त्याचे डांबरीकरण कामाचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ३ मार्च-**

वेळापूर येथील संत ज्ञानेश्वर महाराज पालखी तळ लगतच्या रस्त्याचे डांबरीकरण काम आमदार उत्तमराव जानकर यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायत वेळापूर व जिल्हा परिषद सोलापूर यांच्या माध्यमातून पार पडले.

या अंतर्गत पालखी तळाशेजारी रेसवडकर गणपती मंदिर ते महाळुंग रोड तसेच अकलूज रोड ते माळशिरस रोड बायपास या मार्गावर सुमारे २५ लाख रुपये खर्चाचे डांबरी रस्त्याचे कामाचा शुभारंभ करण्यात आला.

या विकासकामाचे भूमिपूजन आमदार उत्तमराव जानकर, जिल्हा परिषद सदस्या मीनाक्षी सरतापे, वेळापूरचे सरपंच रजनीश बनसोडे, रिपाईचे तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे तसेच माजी उपसरपंच जावेद मुलाणी यांच्या हस्ते श्रीफळ फोडून करण्यात आले. आ. जानकर बोलताना म्हणाले, वेळापूर हे पंढरी वारीच्या मार्गावरील एक महत्त्वाचे ठिकाण आहे. पालखी तळावरून वारकरी माऊलींना ये जा करावी लागते हे ध्यानात घेऊन या मार्गावरील रस्त्यांची अवस्था सुधारली पाहिजे, आज या डांबरीकरणाच्या कामामुळे नागरिकांची दैनंदिन वाहतूक सुलभ मदत होईल, शिवाय वारी काळात वारकऱ्यांनाही मोठी सोय होणार आहे. यावेळी ग्रामपंचायत सदस्य काशिनाथबापू आडत, शिवाजी सावंत, युवराज मंडले, अमोल पनासे, शंकर आडत, राजू शेंडगे उपस्थित होते.

### बाल लैंगिक अत्याचार प्रकरणी आरोपीचा जामीन अर्ज मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ मार्च-**

बाल लैंगिक अत्याचार प्रकरणी आरोपीचा जामीन अर्ज मंजूर करण्यात आला. आरोपीस फिर्यादी ही अल्पवयीन आहे हे माहिती असताना त्याने फिर्यादी सोबत लग्न करुन तिचे सहमतीशिवाय वारंवार शारीरीक संबंध ठेवुन लहान वयात गरोदर केले व त्यातून फिर्यादीने बाळाला जन्म दिला. म्हणुन फिर्यादीने आरोपी विरुद्ध कायदेशीर तकार केली. सदर फिर्यादीच्या जबाबावरुन वैराग पोलीस ठाणे येथे भा. न्या.सं कलम ६४(२) (एम) तसेच बालकांचे लैंगिक अपराधापासुन संरक्षण अधिनियम (झजउडज) चे कलम-४, ८, १२, १७, ४२ सह बालविवाह प्रतिबंधक अधिनियम कलम ९, ११ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर प्रकरणात आरोपीच्यावतीने ॲड. रोहित राजेंद्र घोडके व ॲड.अनिकेत सहदेव गुंड यांनी न्यायालयीन रणनीती आणि कुशल युक्तिवाद मांडून आरोपींना न्याय मिळवून दिला. या युक्तिवादामुळे विसंबून राहून न्यायालयाने आरोपीचा जामीन अर्ज मंजूर केला. सदर प्रकरणी यात आरोपीच्या वतीने ॲड. रोहित राजेंद्र घोडके व ॲड. अनिकेत गुंड यांनी काम पाहिले.



### कल्याणशेट्टी महाविद्यालयात विज्ञान दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.३ मार्च-**

कल्याणशेट्टी महाविद्यालयातील विज्ञान विद्या शाखेच्या वतीने विज्ञान दिनानिमित्त थोर वैज्ञानिकांची यशोगाथा, प्रश्न उत्तरे, कॉम्पिटिशन सिरॅमिक रांगोळी आदी उपक्रम येऊन साजरा करण्यात आला. डॉ. सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाचा विज्ञान विद्याशाखेतील विद्यार्थ्यांनी भारतीय संशोधकांनी लावलेल्या विविध शोधांची माहिती सांगितली. त्यानंतर प्राध्यापिका मनीषा शिंदे म्हणाल्या की, विज्ञान दिनाचा मुख्य उद्देश अंधश्रद्धा आणि अपप्रचार दूर करून तर्कशुद्ध विचार करण्याची सवय लागावी, विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड आणि जिज्ञासा निर्माण व्हावी, मोबाईल, संगणक, इंटरनेट, वैद्यकीय साधने, शेतीची उपकरणे या सर्व गोष्टी विज्ञानाची देणगी आहे. प्रास्ताविक प्राध्यापिका विद्याश्री वाले यांनी केले. आभार प्राची गणेचारी यांनी मानले. या कार्यक्रमास डॉ. बाळासाहेब पाटील, प्रा. सौरभ भस्मे, ओंकार घिवारे, विद्या बिराजदार, मधुबाला लोणारी उपस्थित होते.



### नीती आयोगाच्या अधिकाऱ्यांची सांगोला तालुक्यात क्षेत्रभेट

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १ मार्च-**

आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत संपूर्णतः अभियान २.० ची प्रभावी अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी नीती आयोगाच्या अधिकारी सल्लागार मुग्धा नारकर यांनी सांगोला तालुका येथे क्षेत्रभेट दिली. या भेटीदरम्यान पं.स.अंतर्गत सर्व विभाग प्रमुख यांची बैठक पं.स.सभागृहात संपन्न झाली. यावेळी अभियान अंतर्गत केलेल्या कामाचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर नाझरा येथील पशु वैद्यकीय दवाखाना, प्राथमिक आरोग्य केंद्र, जि.प.प्राथमिक शाळा, अंगणवाडी येथे भेट दिली. यावेळी सरपंच, ग्रा.पं.अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. त्यानंतर कडलास येथे आकांक्षित तालुका कार्यक्रम अंतर्गत सुरु असलेल्या डीजीटल साक्षरता प्रशिक्षणास भेट दिली. यावेळी सरपंच, उपसरपंच व ग्रा.पं.अधिकारी उपस्थित होते. ही भेट सांगोला तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी मार्गदर्शक ठरेल असा विश्वास उपस्थित अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. यावेळी गट विकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी, सहा.गट विकास अधिकारी वसंत फुले, तालुका आरोग्य अधिकारी संदीप देवकते, पशुधन विकास अधिकारी अस्लम सय्यद, महिला व बाल कल्याण विकास प्रकल्प अधिकारी अभिजित मोलाने, शिक्षण विस्तार अधिकारी अमोल भंडारी, विस्तार अधिकारी जगन्नाथ टकले, ग्रामीण पाणी पुरवठा उप अभियंता सदाशिव पुजारी, बांधकाम उप अभियंता अतुल लेंडवे, प्रशासन अधिकारी महेश जाधव, अजित देशमुख, परमेश्वर नागणे, तालुका अभियान व्यवस्थापक अण्णा अवताडे, आकांक्षित तालुका फेलो चाँदबाशा मुजावर उपस्थित असल्याची माहिती आरोग्य विस्तार अधिकारी मिलिंद सावंत यांनी दिली.

### वैकल्पिक वाद निवारण या विषयावर राजर्षी शाहू लॉ कॉलेजमध्ये कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ मार्च-**

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जयंतीनिमित्त 'वैकल्पिक वाद निवारण' या विषयावर राजर्षी शाहू लॉ कॉलेजमध्ये राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेचे अध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे खजिनदार जयकुमार शितोळे होते.

सदर कार्यशाळेमध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हणून अडव्होकेट संभाजीराव मोहिते (मेडिएटर , मुंबई हायकोर्ट) हे उपस्थित होते. प्रथम सत्रामध्ये संभाजीराव मोहिते यांना वैकल्पिक वाद निवारणाचा इतिहास, मेडिएटरचे कार्य, वैकल्पिक न्याय देण्यासाठीचे उपाय सांगण्यात आले. द्वितीय सत्रामधील व्याख्यानांमधून जिंकण्यापेक्षा न्याय कसा महत्त्वाचा आहे हे विविध उदाहरणांमधून विशद केले व मेडिएशनच्या माध्यमातून तंटा मिटवण्याच्या बद्दल चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष बापूसाहेब शितोळे यांनी अध्यक्षीय समारोप केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रत्नदीप सोनकांबळे प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख प्रा. अनिकेत तायडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. शिकारे यांनी केले. कार्यशाळेच्या तिसऱ्या सत्रामध्ये सहभागीची प्रश्नांची उत्तरे व समारोप करण्यात आला. आभार प्रा. मिठ्ठा यांनी मानले.



### बार्शीत स्वच्छता अभियानात ५२ टन कचरा संकलित

#### नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ मार्च-**

महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्राप्त डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा यांच्यावतीने शहरात व्यापक स्वच्छता अभियानामध्ये तब्बल ९९० श्री सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत शहरातून ५१.८५ टन (सुमारे ५२ टन) कचरा संकलित केला.

बार्शी येथील स्वच्छता मोहिमेत सहभागी झालेले नगरपालिकेचे पदाधिकारी व श्री सदस्य अभियानाचा शुभारंभ सकाळी ७ वाजता बार्शी नगरपालिकेजवळ मुख्याधिकारी तैमूर गफूर मुलाणी, नगराध्यक्षा तेजस्विनी प्रशांत कथले, आरोग्य अधिकारी शब्बीर मकबूल वस्ताद, शहर समन्वयक गणेश पाटील, नगरसेवक विजय चव्हाण व नगरसेविका चंद्रकला कांबळे यांच्या हस्ते करण्यात आला. जिल्हा सत्र न्यायालय परिसर, पंचायत समिती, तहसील कार्यालय, बार्शी बसस्थानक, आयटीआय कॉलेज, ग्रामीण रुग्णालय, पोलीस स्थानक, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, शासकीय गोदाम यांसह १२ शासकीय कार्यालय परिसरांमध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. याशिवाय शहरातील प्रमुख रस्त्यांवर भर देत १४ किलोमीटर लांबीचे रस्ते स्वच्छ करण्यात आले. शिवाजी कॉलेज रस्ता, परंडा रस्ता, उपळाई रस्ता, कुडूवाडी रस्ता, पांडे चौक, सोलापूर रोड, तुळजापूर रोड, लातूर रोड, आगळगाव रोड, अलीपूर रोड आदी प्रमुख मार्गावर कचरा संकलन व स्वच्छता करण्यात आली. शहरातील जवळपास २० एकर क्षेत्रफळाचा परिसर स्वच्छ करण्यात सदस्यांनी श्रमदान केले.

### अणदूरच्या मातीतला संघर्षशील नेता : प्रवीण घुगे



१९८० च्या दशकामध्ये अणदूर मध्ये अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची शाखा स्थापन करून आपल्या निवडक वर्ग मित्रांसोबत प्रवीण दादा घुगे यांनी विद्यार्थी चळवळीच्या कार्याला सुरुवात केली. विद्यार्थी दशेपासूनच प्रवीण दादाला राजकारणाची आवड होती. शाळेत असताना वर्ग मंत्री ते थेट मुख्यमंत्री पदाची निवडणूक लढवून शाळेत ते मुख्यमंत्रीही झाले होते. हीच आवड नंतरच्या महाविद्यालयीन जीवनात ही जोपासत अखिल भारतीय विद्यार्थी परिषद या जगद्विख्यात संघटनेमध्ये त्यांनी कार्य करत कॉलेजमधील विविध प्रश्नांना वाचा फोडत एक आक्रमक विद्यार्थी नेत्याचे चुणूक दाखवायला त्यांनी सुरुवात केली. त्यानंतर अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे पूर्णवेळ कार्यकर्ते म्हणून ते निघाले ठाण्याच्या वनवासी भागामध्ये सुरुवातीला पूर्णवेळ कार्य करीत असताना त्या भागातील समस्या विद्यार्थ्यांचे प्रश्न यावरती आक्रमकपणे कार्य करीत तेथील विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला. त्यानंतर मराठवाडा, खानदेश या भागातही पूर्णवेळ संघटन मंत्री, विभाग संघटन मंत्री, प्रदेश सहमंत्री म्हणून कार्य करताना विद्यार्थ्यांच्या सर्व प्रश्नांवरती अनोखे आंदोलने करून त्यांनी विद्यार्थ्यांचे संस्थाचालकांचे सर्वसामान्य जनतेचे पालकांचे लक्ष वेधून घेतले. महाराष्ट्र राज्याला एक नवीन विद्यार्थी नेता त्यावेळेस मिळाला होता. नाव होते प्रवीण शिवाजीराव घुगे.

त्यानंतर प्रवीण दादाला प्रदेश मंत्री म्हणून कार्य करण्याची संधी मिळाली. सलग तीन वेळा अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे प्रदेश मंत्री होण्याचा मान प्रवीण दादांना मिळाला. त्यानंतर राष्ट्रीय मंत्री म्हणून कार्य करीत असताना देशभर प्रवास करून विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवरती आंदोलने उभे करून सर्वसामान्य विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठामध्ये प्राध्यापक भरती मध्ये झालेला घोटाळा लक्षात घेता प्रवीण दादांनी उभारलेले विद्यार्थी आंदोलन हे आजही संबंध महाराष्ट्राच्या स्मरणात आहे. सलग बारा वर्षे म्हणजे एक तप अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे पूर्ण कार्यकर्ते म्हणून प्रवीण दादांनी मेहनतीने कार्य केले. त्यानंतर भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश करीत मराठवाडा संघटन मंत्री म्हणून त्यांनी २००६ मध्ये कार्याला सुरुवात केली. सलग दहा वर्षे त्यांनी या पदाला न्याय देत मराठवाड्याच्या गावागावात भारतीय जनतापार्टी रुजवण्यात, कार्यकर्ते निर्माण करण्यात त्यांनी घेतलेली मेहनत ही सबंध मराठवाड्याने पाहिली आहे. त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या बालहक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष म्हणून कार्य करताना, या आयोगाला न्याय देताना सबंध महाराष्ट्राने पहिल्यांदा हा बाल हक्क आयोग आहे हे नाव ऐकले व त्यांचे कार्य अनुभवले. लहान मुलांच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी त्यांनी काढलेले चिल्ड्रन प आजही सर्वश्रुत आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी लहान मुलांवरती महाराष्ट्रातील एक व्हिडिओ शेअर केला होता. त्यांच्या विरोधामध्ये न्यायालयात धाव घेणारा महाराष्ट्रातला आजवरचा एकमेव बालहक्क संरक्षण आयोगाचा अध्यक्ष म्हणून प्रवीण दादा पुढे सरसावल्याचे सर्वांनी पाहिले आणि त्यांचा आक्रमकपणा महाराष्ट्राने अनुभवला. सध्या भारत सरकारच्या भटके विमुक्त बोर्डाचे सदस्य म्हणून कार्य करत असताना सबंध भारतभर फिरून भटक्या विमुक्त जमातीतील सर्वांना विद्यार्थ्यांना युवकांना न्याय देताना आपण सर्वजण प्रवीण दादांना पाहत आहोत. त्यातच आज भारतीय जनता पार्टीचे प्रदेश चिटणीस म्हणून त्यांची निवड ही सर्वार्थाने योग्यच म्हणावे लागेल. त्यांच्या या निवडीने कार्यकर्त्यांमध्ये एक वेगळा उत्साह निर्माण झाला असून ते नक्कीच आपल्या या पदाला न्याय देतील समाजातील विविध प्रश्न ते शासनासमोर परखडपणे मांडतील हे मात्र निश्चित. प्रवीण दादांना त्यांच्या पुढील कारकीर्दीसाठी शुभेच्छा.

**- डॉ. गुरबसप्पा नीलकंठ करपे,**
पूर्व कार्यकर्ता अभाविप



# केंद्रप्रमुख पदासाठी परीक्षेच्या काठिण्य पातळीबद्दल प्रश्नचिन्ह?

**▸▸ निर्धारित केलेला अभ्यासक्रम बाजूला**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

राज्यात एकीकडे पाचवी व आठवीच्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेची प्रश्नपत्रिकेच्या काठिण्यपातळी उच्च असल्याची चर्चा होत असतानाच केंद्र प्रमुख समूहसाधन समन्वयक पदासाठीच्या मर्यादित विभागीय परीक्षेची काठिण्य पातळी मात्र अतिशय सुमार व कनिष्ठ दर्जाची असलेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केला जात आहे.

गेल्या दोन वर्षापासून रखडलेली ही विभागीय परीक्षा ऐन जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या धामधुमीत घेण्यात आली. अनेक शिक्षकांना निवडणूक कर्तव्यामुळे या परीक्षेस उपस्थित देखील राहता आले नाही. त्याची काठिण्यपातळी पाहिल्यास ही परीक्षा घेणारी एजन्सी आयबीपीएसने राज्य परिक्षा परिषदेने या परीक्षेसाठी निर्धारित केलेला अभ्यासक्रम बाजूला ठेवल्याचे लक्षात येते.

निदान चौथी व पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेएवढी तरी त्याची काठिण्यपातळी असावी, अशी अपेक्षा असताना त्यातून परीक्षा परिषद व आयबीपीएस हे केंद्र प्रमुख पदासाठी शिक्षकांकडून कोणती गुणवत्ता पडताळून बघत आहे? हा प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे या परीक्षेचा निकाल जाहीर न करता या पदासाठी योग्य काठिण्यपातळीसह पुनर्परीक्षा घेण्याची मागणी शिक्षण क्षेत्रातून होत आहे.

# सोलापुरात उन्हाचा तडाखा; पारा गेला ३८ अंशांवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

सोलापुरात उन्हाची तीव्रता झपाट्याने वाढू लागली आहे. मार्चच्या सुरुवातीलाच तापमानाने उसळी घेत हंगामातील उच्चांक गाठला आहे. मंगळवारी शहरात कमाल तापमान ३८.० अंश सेल्सिअस इतके नोंदवले गेले. मार्चच्या पहिल्याच आठवड्यात उच्च तापमान नोंदवले गेल्याने आगामी काळात तापमान वाढीविषयी भीती व्यक्त करण्यात येत आहे.

हवामान विभागाच्या माहितीनुसार, किमान तापमान २२.९ अंश सेल्सिअस इतके होते, तर हवेतील आर्द्रता ३४ टक्क्यांवर घसरली. आर्द्रतेचे प्रमाण कमी झाल्याने कोरड्या उष्णतेचा त्रास अधिक जाणवत आहे. सकाळपासूनच उन्हाचा चटका जाणवत असून दुपारच्या वेळी रस्त्यांवर वर्दळ कमी झाल्याचे चित्र दिसून आले.

दुपारी १२ नंतर उन्हाची तीव्रता वाढल्याने नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळले. किमान तापमानातही वाढ झाल्याने रात्रीचा गारवा कमी झाला आहे.







सोलापूर : पहिल्या छायाचित्रात मुलाला शोधून काढल्यानंतर पंच व नायक आनंद व्यक्त करताना. दुसऱ्या छायाचित्रात लपवलेले हंडा धुंड (हुडकून) काढताना तर तिसऱ्या छायाचित्रात धुंड निघाल्यानंतर पंच व नायक समाजबांधव जल्लोष करताना टीपलेले छायाचित्र. (छाया : केवल तिवारी)

# बंजारा समाजात आनंदोत्सव : धुंड, लठ्ठमारो, लोकसंगीताने होळी साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ मार्च-**

पारंपारिक वेशभूषा, ढोल-ताशांचा गजर आणि 'धुंड' सारख्या आगळ्यावेगळ्या परंपरांनी सोलापूर शहरातील नेहरू नगरसह विविध बंजारा वस्त्यांमध्ये मंगळवारी होलिकोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. बंजारा संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या या उत्सवात आबालवृद्धांनी सहभाग घेत आनंदाची उधळण केली.

बंजारा समाजात होळीचा सण केवळ रंगांचा उत्सव नसून तो संस्कृती जोपासण्याचा सण मानला जातो. या उत्सवात काही खास परंपरांचे पालन करण्यात आले.

**धुंड आणि लठ्ठमार**

या उत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे 'धुंड' आणि 'लठ्ठमार'. परंपरेनुसार महिलांनी हातात लाठ्या घेऊन आणि पुरुषांनी ढोलाच्या तालावर फेर धरून या खेळाचा आनंद लुटला.

**आनंदाची बातमी 'हुडकून' काढणे**

ज्या घरात वर्षभरात मुलाचा जन्म झाला आहे, अशा घरांची माहिती काढून तिथे जाऊन जल्लोष करण्याची बंजारा समाजाची अनोखी परंपरा आजही टिकून आहे. अशा कुटुंबांकडून आनंद व्यक्त करत हा सण साजरा केला जातो.

**लोकसंगीताचा गजर**

पारंपारिक बंजारा लोकगीतांच्या तालावर महिलांनी फेर धरला, ज्यामुळे वस्तीतील वातावरण भक्तीमय आणि उत्साही बनले होते. बंजारा संस्कृतीमध्ये होळीला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

# सोलापूर शहर व जिल्ह्यात होळीचा सण जल्लोषात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

शहर व जिल्ह्यात होळीचा सण मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. पारंपरिक पद्धतीने होळी दहन करून वाईट प्रवृत्तींचा नाश आणि चांगुलपणाचा विजय याचा संदेश देण्यात आला.

गुरुवारी सायंकाळी विविध भागांत होळी दहन करण्यात आले. नागरिकांनी एकत्र येत पूजा-अर्चा करून समृद्धी व सुख-शांतीसाठी प्रार्थना केली. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी होळीच्या उत्सवात उत्साहाने सहभाग घेतला.

दुसऱ्या दिवशी रंगपंचमी निमित्त शहरातील प्रमुख चौक, गल्ली-बोळ आणि कॉलनी परिसरात रंगांची उधळण झाली. युवकांनी ढोल-ताशांच्या गजरात नाचत-गात रंगोत्सव साजरा केला. अनेक सामाजिक संस्थांनी नैसर्गिक रंगांचा वापर करून पर्यावरणपूरक होळी साजरी करण्याचा संदेश दिला. पोलिस प्रशासनाने ठिकठिकाणी बंदोबस्त ठेवून शांततेत व सुरक्षित वातावरणात सण साजरा व्हावा यासाठी दक्षता घेतली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या होत्या. ग्रामीण भागातही शेतकरी व ग्रामस्थांनी पारंपरिक रीतीरिवाजांनुसार होळी साजरी केली. हा सण सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण करून गेला.



# 'नकारात्मकतेचे दहन' संकल्पनेतून होळी साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च-**

शहरातील वसंत विहार परिसरातील बालाजी पॅराडाईज बिल्डींग येथील रहिवाशांनी यावर्षी होळी उत्सव केवळ पारंपरिक पद्धतीने न साजरा करता सामाजिक संदेश देणाऱ्या उपक्रम द्वारे साजरा केला. ''दहन करू या निराशेचे'' आणि ''दहन करू या नकारात्मकतेचे'' अशा आशयाचे फलक लावून समाजातील व मनातील वाईट प्रवृत्तींचे प्रतीकात्मक दहन करण्याचा सुंदर व प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमामागील प्रमुख उद्देश म्हणजे होळीच्या निमित्ताने केवळ लाकूड जाळण्याऐवजी मनातील कटुता, मत्सर, द्वेष, नैराश्य, अहंकार, वाईट सवयी आणि नकारात्मक विचार यांचे दहन करून सकारात्मकता, एकोप्याची भावना आणि सामाजिक सलोखा वृद्धिंगत करणे हा होता. बालाजी पॅराडाईजमधील नागरिकांनी सांगितले की, सण-उत्सव हे केवळ आनंद साजरा करण्यासाठी नसून समाजाला योग्य दिशा देण्याचे माध्यम देखील आहेत. या उपक्रमामुळे लहान मुलांमध्येही चांगल्या मूल्यांची जाणीव निर्माण झाली. हा उपक्रम परिसरातील नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरला असून, इतरांनीही अशा प्रकारे सामाजिक संदेश देणारे सण साजरे करावेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.






**फागची गाणी :** धुळवडनिमित्त सोलापूर शहरातील चौपाड येथील बालाजी मंदिरच्यात वतीने फागची गाणी अर्थात लोकसंगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



# ताज ग्रुपच्यावतीने इफ्तार पार्टी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ मार्च-**

ताज सोशल ग्रुप व फॉरेस्ट जमात यांच्या संयुक्त विद्यमाने ताज कंपाऊंड येथे इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. ताज सोशल ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष तौफिक शेख, माजी महापौर आरिफ शेख, युवा नेते अदनान शेख यांच्या हस्ते रोजेदारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्तार हुमनाबादकर, अब्दुल्ला जालवाद, अभयसिंह पवार, सुधीर खरटमल, नगरसेवक मनिष केत, वैभव हत्तुरे, गौतम कसबे, नगरसेविका श्रीदेवी फुलारे, पोलिस उपनिरीक्षक शब्बीर तांबोळी, शिवा बाटलीवाला, लतिफ शाब्दी, नसीम खलिफा, शफी इनामदार, शकील मौलवी, डॉ.सुर्यप्रकाश कोठे, नुरुद्दीन मुल्ला, जाकीर नाईकवाडी उपस्थित होते.

# केरळच्या पोंगल सणाचा सोलापुरात उत्साह



**अट्टुकालअम्मा देवीची मनोभावे पूजा**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ मार्च-**

केरळ राज्यातील तिरुअनंतपुरम जिल्ह्यातील अट्टुकालअम्मा देवी मंदिरात साजरा होणाऱ्या पोंगल उत्सवाची भक्तिमय परंपरा यंदा सोलापुरातही उत्साहात अनुभवायला मिळाली. स्वामी परिवाराच्या वतीने श्रध्दा, उत्साह आणि सांस्कृतिक वातावरणात साजरा करण्यात आला.

देवीसमोर विशेष पूजा-अर्चा करण्यात आली. देवीला नैवेद्य म्हणून तांदळाची खीर अर्पण करण्यात आली. सुगंधित खिरीचा नैवेद्य आणि मंत्रोच्चारांनी परिसरात भक्तिरसाची अनुभूती निर्माण झाली.

पांढऱ्या-सोनेरी किनारीच्या साड्यांमध्ये सजलेल्या महिलांनी सणाला खास केरळी रंग दिला. मातीच्या भांड्यात तांदळाची खीर करण्यात आली. महिलांनी चूल मांडून त्याची पूजा केली. त्यावर खीर तयार करुन देवीला नैवेद्य अर्पण करण्यात आला.

यावेळी बिजुला सजीव, श्रीशा मोहनदास, श्रीदेवी रोशन, प्रजिथा स्वामी, शीझा स्वामी, गिरीष स्वामी यांच्यासह स्वामी परिवारातील महिला सदस्य उपस्थित होते.

# आदिला नदीचे अस्तित्व टिकलेच पाहिजे : महापौर कोंड्याल

**श्रमिक पत्रकार संघातर्फे वार्तालापात मांडली भूमिका**

**सोलापुरात नव्या ई-बसेस लवकरच उपलब्ध होणार**




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ मार्च-**

सोलापूर शहरातील आदिला नदीला नाला म्हणालोच नाही. याठिकाणी किमान नाल्यासारखी खोदाई केली असती तर पाण्याचा निचरा झाला असता असे मी म्हटले होते. माझ्या वक्तव्याचा विपर्यास करण्यात आला. शहरातून नदी जात असेल तर आम्हाला अभिमानच आहे. आदिला नदीचे अस्तित्व टिकलेच पाहिजे, असे स्पष्ट प्रतिपादन महापौर विनायक कोंड्याल यांनी केले.

सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने आयोजित केलेल्या वार्तालापप्रसंगी आपली भूमिका मांडताना ते पुढे म्हणाले की, आदीला नदीसंदर्भात घेतलेल्या बैठकीवेळी पाटबंधारे विभागाकडे माहिती उपलब्ध नव्हती. या नदीच्या सीमांकनाचे काम करावे, अशी मागणी आपण केली आहे. ते दोन महिन्यात करण्यात येईल असे पाटबंधारे विभागाने सांगितले आहे. या नदीच्या परिसरात प्लॉटिंग, बांधकामे आदीसंदर्भात बेकायदेशीर कामे झाली असतील, तर त्यावर कारवाई झाली पाहिजे. या परिसरात विकासकामांमध्ये ज्यांच्या जमिनी जात असतील, तर अशांना शासनाकडून मोबदला मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. याप्रकरणी कोणालाही पाठीशी घालण्याचा आपला प्रयत्न नाही, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

सोलापुरातील ५० पैकी १४ स्मशानभूमीचे सुशोभीकरण स्मार्ट सिटी निधीतून करण्यात आले आहे. सोलापूर शहरातील धूळ मुक्तीसाठी आपले प्रयत्न आहेत. श्री सिध्देश्वर तलावातील मासे ऑक्सिजन अभावी मृत पावले ही बाब लक्षात घेऊन डीपीडीसी फंडातून दीड कोटी रुपये मिळवून यातून फाउंटन मशीन खरेदी करण्यात येणार आहे. उजनी धरणात अपायकारक गोष्टी मिसळले जात असल्याचा मुद्दा निदर्शनास आला आहे. या अपायकारक गोष्टींना प्रतिबंध करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून शासनाला कळविण्यात येणार आहे. फिल्टरायजेशनची सोयदेखील करण्याचा प्रयत्न आहे. सोलापूर शहरातील परिवहन सेवा सुधारण्यासाठी १०० ई बसेस लवकरच उपलब्ध होणार आहेत.

शहराला किमान दोन दिवसाआड पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने आपले प्रयत्न आहेत. याकामी अनुभवी निवृत्त अधिकाऱ्यांना सेवेत संधी देण्यात येणार आहे. सोलापूर शहरातील बी २ चा प्रश्न मार्गी लागण्यासाठी महापालिकेने ठराव करुन शासनाकडे पाठवला आहे. याच पध्दतीने गुंठेवारी नियमित करून नागरिकांच्या अडचणी सोडवण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

सोलापूर महापालिकेचा सुधारित आकृतीबंध आणि लाड कमिटी अंतर्गत प्रतिक्षा यादीतील नियुक्ती आदेश यासंदर्भात कार्यवाही करण्यासाठी प्रशासनाला सूचना दिल्या आहेत, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. यावेळी संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, सरचिटणीस सागर सुरवसे, खजिनदार किरण बनसोडे आदींची उपस्थिती होती. उपाध्यक्ष आफताब शेख यांनी आभार मानले.

# आदिला नदी : दोन्ही साईडची सुमारे चार हजार घरे बाधित होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ मार्च-**

आदिला नदी केवळ पावसाळ्याच्या दिवसात वाहते. इतरवेळी मात्र ती कोरडीच असते. विकासाच्या नावाखाली ब्ल्युलाईन व रेड लाईन अशा पध्दतीचा रेषेचा उल्लेख करुन शहराच्या विकासास खीळ घालण्याचा प्रयत्न केला जात आहे. या लाईन दरम्यान कोणतेही विकास कामे होणार नाहीत. उलट दोन्ही साईडची सुमारे चार हजार घरे बाधित होणार आहेत. त्यामुळे ब्ल्यू लाईन आणि रेड लाईनला आमचा विरोध आहे, असे प्रशांत गोडसे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

वसंत विहार, यश नगर भागात जे पाणी साचले त्याला कारण हिप्परगा तलावावातून आलेले ओव्हरफ्लोचे पाणी असून, हा पूर एक दृष्टीने मानवी चुकीचा परिणाम आहे. गेल्यावर्षी खूप पाऊस झाला. हिप्परगा तलाव भरून व ओव्हरफ्लो होणार याची माहिती पाटबंधारे खात्यास आधीच महापालिका प्रशासनास दिली होती. आता आपत्ती व्यवस्थापनच्या नावाखाली डीपी प्लॅन तयार करुन नाले प्रस्तावित करण्यात आले आहे. आदिला नाल्यास पाटबंधारे खात्याकडून नदीचे स्वरुप देण्याचे प्रयत्न चालू आहेत

काहींनी बँकेकडून कर्ज काढून घरे व प्लॉट घेतलेली आहेत. या प्लॉट्स व बांधकामाना महानगरपालिकेने रीतसर परवाने दिलेले आहेत. बांधकाम परवानगी देताना महापालिकेकडून डेव्हलपमेंट फंड व इतर कर घेण्यात आले आहेत, असेही त्यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस तानाजी माने, सुदेश देशमुख, संकेत थोबडे, मदनलाल दुरुगकर आदी उपस्थित होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# एकच जिद्द, कॉरिडॉर रद्द... जुलमी कॉरिडॉर रद्द करा

## ● पंढरपूर कॉरिडॉर विरोधात कडकडीत बंद

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३ मार्च -**

श्रीक्षेत्र पंढरपूर येथील विठ्ठल मंदिर परिसरातील कॉरिडोरच्या विरोधात पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीच्या वतीने सोमवार, दि.२ मार्च २०२६ रोजी कडकडीत बंद पाळण्यात आला. यानिमित्ताने काढण्यात आलेल्या मोर्चास देखील संभाव्य कॉरिडॉरबाधित नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. एकच जिद्द कॉरिडॉर रद्द, जुलमी कॉरिडॉर रद्द करा अशा गगनभेदी घोषणा देत परिसर दणाणून सोडण्यात आले होते. महाद्वारातील नामदेव पायरी येथे संत श्री नामदेव महाराजांच्या पायरीचे वारकरी संप्रदायातील माऊली महाराज शिरवळकर, वडगावकर महाराज, देहूकर महाराज आदींच्या हस्ते पूजन करुन मोर्चास प्रारंभ करण्यात आला.

पंढरपुरात एकरांच्या मापात व डझनांच्या संख्येने फार मोठ्या सरकारी जागा बिगर उपयोगाच्या पडाकडून आहेत त्यावर शासनाने कॉरिडॉर सारखे प्रकल्प उभे करावेत. बाधितांच्या ज्या घरांमध्ये वारकरी बांधवांच्या सगळ्या सोयी होतात ती घरे अजिबात पडू नयेत. कॉरिडॉर सरकारी जागांवर करावा आदी मागण्या मांडण्यात आल्या. संत प्रल्हाद महाराज बडवे, गोपाळकृष्ण मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज चौक,वीर माता जिजामाता पुतळा, राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर पुतळा, स्वातंत्र्यवीर सावरकर पुतळा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा याठिकाणी माल्यार्पण करण्यात आले.




आमदार अभिजीत पाटील याप्रसंगी बोलताना म्हणाले, मंदिर परिसरात पाडापाडी न करता इतर मोकळ्या जागांवर कॉरिडोर राबवावा. बचाव समितीचे अध्यक्ष अभयसिंह इचगावकर, नगरसेवक राहुल शिंदे नाईक, किरण घाडगे, वडगावकर महाराज, शिरवळकर महाराज, सौ.वट्टमवार, डॉ. प्राजक्ता बेणारे, सौ.बिडकर आदींची भाषणे झाली. मोर्चेकऱ्यांनी तहसीलदार सचिन लंगोटे यांना निवेदन दिले. नगरशेठ नानासाहेब कवठेकर, नगरसेवक ओंकार जोशीसह अनेक नगरसेवक, विविध संस्था संघटनांचे पदाधिकारी मोर्चात सामील झाले होते. मोर्चा यशस्वी करण्यासाठी गणेश लंके, वैभव बडवे, अनिल गवळी, प्रशांत खंडागळे, यशवंत बेणारे, उंडाळे वकील आदींनी परिश्रम घेतले. यावेळी मोठा पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता.

# इराणवरील हल्ला हा सार्वभौमत्वावर उघड आक्रमण : नरसय्या आडम

▶▶ ४ मार्च रोजी जनआंदोलन

▶▶ कोणत्याही प्रश्नाचा युध्द हा उपाय नाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ मार्च-**



अमेरिका व इस्त्रायलने इराणवर केलेले हल्ले हे त्या देशाच्या सार्वभौमत्वावर उघड आक्रमण असून आंतरराष्ट्रीय कायद्याचे घोर उल्लंघन आहे. या युध्दजन्य परिस्थितीमुळे मध्यपूर्वेत प्रचंड तणाव वाढला असून जागतिक शांततेसमोर गंभीर संकट उभे राहिले आहे, असे माजी आमदार नरसय्या आडम यांनी सांगितले.

इराणवर सुरु असलेल्या आक्रमक लष्करी कारवायांच्या निषेधार्थ मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीच्या वतीने बुधवार, दि.४ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे जनआंदोलन करण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले. भारत हा शांतता, सहअस्तित्व आणि निर्गुट परंपरेचा पुरस्कर्ता देश आहे. भारताने आपल्या स्वतंत्र व निर्भीड परराष्ट्र धोरणाची परंपरा जपत या हल्ल्याचा स्पष्ट शब्दांत निषेध करावा व तात्काळ युध्दविरामासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

# माळशिरस पंचायत समिती सभापती निवड

## मोहिते-पाटील यांच्या घरात की अन्य कोणाची वर्णी?

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३ मार्च-**

नुकत्याच झालेल्या सोलापूर जिल्हा परिषदेत प्रथमच मोहिते-पाटील यांना पूर्णपणे काहीच हाती लागलेले नाही. त्यामुळे माळशिरस पंचायत समितीचे सभापतीपद हे मोहिते-पाटील यांच्या घरात येईल की अन्य कोणाची वर्णी लागणार? याकडे माळशिरस तालुक्यातील जनतेचे लक्ष लागून राहिले आहे.

या निवडणुकीत मोहिते-पाटील व जानकर गटाचे तुतारी या चिन्हावर आठ सदस्य, शिंदे गटाच्या धनुष्यबाण या चिन्हावर दोन तर अजित पवार गटाचे दोन असे एकुण बारा सदस्य तर भाजपचे सहा सदस्य निवडून आले आहेत. राज्यात भाजपा, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट असे महायुतीची सत्ता आहे. खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार उत्तमराव जानकर हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटले होते. तसेच पंचायत समिती सदस्य व जिल्हा परिषद सदस्यांनीही उपमुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेतली. यामुळे तालुक्यात उलटसुलट चर्चा सुरु आहेत.

शिंदे गटाचा किंवा अजित पवार गटाचा सभापती करण्यासाठी मोहिते-पाटील गटाचे आठ सदस्य या दोन्ही गटापैकी एका गटाला पाठिंबा देणार का? भाजपाला शह देण्यासाठी व निधी मिळविण्यासाठी ही राजकीय खेळी मोहिते-पाटील गटाकडून खेळली जाणार का? मोहिते-पाटील गटाला सभापती तर आमदार उत्तमराव जानकर गटाला उपसभापती पद दिले जाणार, शिंदे किंवा अजित पवार गटाचा सभापती करुन वेगळी खेळी खेळली जाणार अशी चर्चाही सुरु आहे.

# सोलापूर जनता बँकेच्या संचालक मंडळाची निवडणूक जाहीर

SJSB
Multi-State Scheduled Coop.Bank



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ मार्च-**

सहकार क्षेत्रात चर्चेचा विषय असणारी सोलापूर जनता सहकारी मल्टिस्टेट बँकेच्या पंचवार्षिक संचालक मंडळाची निवडणूक जाहीर झाली आहे. नामनिर्देशन पत्र दाखल प्रक्रियाही सुरु झाली आहे. ही बँक मल्टिस्टेट असल्याने दस्तुरखुद्द जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे निवडणूक निर्णय अधिकारी आहेत. जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड हे सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहत आहेत.

दि.३ मार्च ते ७ मार्च अर्ज विक्री आणि स्वीकृती, दि. ९ मार्च रोजी छाननी, दि.१० मार्च माघार त्याच दिवशी अंतिम यादी, दि.१७ मार्च रोजी मतदान, दि.२० मार्च रोजी मतमोजणी असणार आहे.

नामनिर्देशन अर्ज विक्री आणि स्वीकृती, छाननी, हरकत, सुनावणी, अंतिम यादी, चिन्ह वाटप ही सर्व प्रक्रिया जिल्हा उपनिबंधक कार्यालयात चालणार आहे, असे सांगण्यात आले.

### देशपांडे व तडवळकर यांच्या पॅनेलमध्ये लढत?

**सोलापूर जनता सहकारी बँकेची मागील निवडणूक माजी महापौर किशोर देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली झाली होती. भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी त्यावेळी स्वतंत्र पॅनल उभे केले होते. परंतु देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली पॅनेलने निर्विवाद वर्चस्व राखले होते. यावेळी निवडणूक कशी होणार? हे अजून तरी स्पष्ट झाले नाही.**







## महत्वाचे...



### पंढरपूर शिक्षण सोसायटीचे संचालक नामदेव देशमुख यांचा सन्मान

**पंढरपूर, दि. ३ मार्च-**
पंढरपूर तालुका शिक्षण सोसायटीच्या संचालकपदी नामदेव ज्ञानोबा देशमुख यांची निवड झाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उद्योजक नवनाथ बचुटे, डॉ. रमेश फाटे, नवनाथ फाटे, शशिकांत शर्मा, निवृत्ती पाटील, कल्पक नामदेव देशमुख, उदय आदमिले उपस्थित होते.

### प्रताप दराडे यांना राज्यस्तरीय गावगाडा पुरस्कार जाहीर



**बार्शी, दि. ३ मार्च-**
बार्शी शहर व परिसरात गेली तब्बल तीस वर्षे सामाजिक, कला, क्रीडा, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य करणारे प्रताप दराडे, मॉडेल हायस्कूल बार्शी यांना विश्वकर्मा तरुण मंडळ वडशिवणे (ता. करमाळा) यांच्यावतीने दिला जाणारा राज्यस्तरीय गावगाडा सामाजिक पुरस्कार जाहीर झाला आहे. हे पुरस्काराचे १६ वे वर्ष आहे. प्रताप दराडे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल सुरज क्रीडा व सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष रवींद्र कापसे, वाय.पी. एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन चेतन देसाई, मॉडेल हायस्कूलचे मुख्याध्यापक नागनाथ देवकते यांनी अभिनंदन केले.



### सांगोला महाविद्यालयास अर्थशास्त्र परिषदेकडून प्रशस्तीपत्र

**सांगोला, दि. ३ मार्च-**
सांगोला महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाद्वारे विविध प्रकारचे नवनवीन उपक्रम राबविल्याबद्दल माऊली महाविद्यालय, वडाळा येथे झालेल्या अर्थशास्त्र परिषदेच्या १८ व्या अधिवेशना प्रसंगी सांगोला महाविद्यालयास प्रशस्तीपत्र देवून सन्मानित करण्यात आले. यावेळी परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. संतोष कदम, उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. धीरजकुमार बाड, सचिव प्रा. डॉ. अमोल खाडे आणि पदाधिकारी उपस्थित होते. प्रशस्तीपत्र मिळाल्याबद्दल प्र. प्राचार्य डॉ. सुरेश भोसले यांचा महाविद्यालयात डॉ. टी. आर. माने, डॉ. आर. जी. पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उपक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.वेदपाठक एम.डी, प्रा.एस.एस.भुंजे, प्रा.पी.डी.गोडसे यांनी प्रयत्न केले.



### शिंगोर्णी जि.प.चे स्नेहसंमेलन उत्साहात

**पिलीव, दि. ३ मार्च-**
माळशिरस तालुक्यातील शिंगोर्णी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले. स्नेहसंमेलनाचे उद्घाटन दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन पिलीव पंचायत समिती गणाच्या सदस्या नम्रता पुकळे, माजी पंचायत समिती सदस्य शहाजी महाडीक, शाळा व्यवस्थापन समीतीचे अध्यक्ष पायल मोरे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. कार्यक्रमास जिवन जानकर, शिवराज पुकळे, माळशिरस पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी सुषमा महामुनी, केंद्रप्रमुख नाईकनवरे, फासे उपस्थित होते.

### न्यू. इंग्लिश स्कूल करकंब येथे विज्ञान दिन साजरा

**करकंब, दि. ३ मार्च-**
करकंब (ता. पंढरपूर) येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे सचिव संजीव कुमार म्हेत्रे यांनी विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण प्राप्त करण्याचे ध्येय समोर ठेवून आपल्या शाळेचे, गावाचे व देशाचे नाव उज्वल करावे असे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव क्रिडा शिक्षक अविनाश देवकते, विज्ञान विभाग प्रमुख प्रशांत वेळापूरकर, मुख्याध्यापक श्रीकांत जवळकर उपस्थित होते.

### शिबिराचा लाभ घेऊन आपल्या समस्या सोडवा : प्रांताधिकारी विजया पांगारकर

**अकलूज, दि. ३ मार्च-**
वारसाच्या नोंदी, पाणंद रस्ते, शैक्षणिक दाखले, प्रलंबित फेरफार, दुरुस्त सातबारा व इतर महसुली कामांसाठी माळशिरस तालुक्यात मार्च, एप्रिल व मे महिन्यात शबीरे आयोजित करण्यात आलेली आहेत. तरी तालुक्यातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेऊन आपल्या समस्या सोडवाव्यात असे आवाहन प्रांतधिकारी विजया पांगारकर, तहसीलदार सुरेश शेजूळ यांनी केले आहे. श्रीमती पांगारकर म्हणाल्या, मयत झालेल्या लोकांच्या सातबाऱ्यावर त्यांच्या वारसाच्या नोंदी लावून सातबारे जिवंत करणे, ज्या नागरिकांना १९६० पूर्वीचे रहिवाशी पुरावे हवे आहेत अशांसाठी आम्ही तालुक्यातील शैक्षणिक संस्थांशी संपर्क साधला असून ते त्यांच्या रेकॉर्ड मधून दाखले उपलब्ध करून देणार आहेत. बऱ्याच दिवसांपासून व कारणांपासून प्रलंबित असणारे फेरफार निकाली काढणे, नॉन ॲग्री, तुकडेबंदी, दुरुस्त सातबारा, पाणंद रस्त्यांच्या अडचणी व इतर कामांसाठी ७ मार्च रोजी दहिगाव व खुडूस, १४ मार्च रोजी इस्लामपूर व फोन्डशिरस, १० एप्रिल रोजी वेळापूर व पिलीव, १७ एप्रिल रोजी लवंग व सदाशिवनगर, ८ मे रोजी अकलूज व नातेपुते आणी १५ मे रोजी माळशिरस व महाळुंग या ठिकाणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

# पं. शौनक अभिषेकी यांच्या दमदार गायनाने जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवाची सांगता

## पंढरीतील रसिक श्रोत्यांचा भरभरून प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३ मार्च -**
तरंगिणी सांस्कृतिक प्रतिष्ठान पुणे, आरती साऊंड सिस्टीम मनमाडकर परिवार आणि नादब्रह्म कला फाऊंडेशन करकंब यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दुसऱ्या दिवशीच संगीत पुष्पाची सुरुवात अभेद अभिषेकी, सोमनाथ रसाळ, डॉ.अनिल जोशी, भगवान मनमाडकर,कल्याण कलढोणे, सौ.शुभांगी जोशी, डॉ.प्रसाद कुलकर्णी, प्रज्ञा कुलकर्णी, वैभव केंगार यांचे हस्ते दीपप्रज्वलन करून झाली.करण देवगावकर यांचे गायन, सारंग कुलकर्णी यांचे सरोद तर पं.शौनक अभिषेकी यांचे दमदार गायनाने गुंफले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला करण देवगावकर यांनी शास्त्रीय संगीतामधील राग मुलतानी अतिशय आत्मविश्वासाने सादर करत पंढरपूर कलासाधक रसिकांची मने जिंकली त्यानंतर बंदिश आणि ध्यान करु जाता मन हरपले अभंग सादर केला त्यांना तबला कार्तिक स्वामी हार्मोनियम सारंग कुलकर्णी पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे टाळ माऊली खरात तर तानपुरा साथ वैभव केंगार आणि चिन्मय यांनी केली.

दुसर पुष्प ख्यातनाम सरोदवादक सारंग कुलकर्णी यांनी गुंफताना सरोदवादनामध्ये आलाप,जोड झाला सादर करत दुर्मिळ होत चाललेल्या सरोदवादनाने रसिकांना अगदी चिंब केले.राग किरवाणी सादर केला.त्यांना तितकीच उत्तम आणि समर्पक तबला साथ अजिंक्य जोशी यांनी देऊन कार्यक्रमाची उंची गाठली.

त्यानंतर अभिषेकी संगीत महोत्सवाची सांगता पं.शौनक अभिषेकी यांचे गायनाने झाली. गेली २४ वर्षे त्यांनी श्री पंढरी नगरीत गात असून आज अतिशय आनंद होत आहे असे सांगत राग प्रताप व्हराडी सादर करत त्याला जोडून बंदिश गाऊन अभिषेकी बुवांनी अजरामर केलेल्या रचना अमृताची फळे, आम्हां न कळे ज्ञान,तिर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल,संत भार पंढरीत, अवघे गर्जे पंढरपूर गात शेवटी विठ्ठलाच्या पायी थरारली वीट भैरवी ने सांगता केली. त्यांनाही तितकीच सुंदर साथसंगत तबला अजिंक्य जोशी हार्मोनियम सारंग कुलकर्णी पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे टाळ माऊली खरात तर स्वरसाथ अभेद अभिषेकी,करण देवगावकर,राज शाह.यांनी केली.

महोत्सव यशस्वी करण्यासाठी अभेद अभिषेकी, भगवान मनमाडकर, धनंजय मनमाडकर,अर्णव दैठणकर, संकेत कुलकर्णी,आरती मनमाडकर,वैभव केंगार माऊली खरात, तुकाराम दुधाटे, देवकी दुधाणे, यांनी अधिक परिश्रम घेतले.

# महिला सक्षमीकरण सप्ताहाचे नागणसूर येथे उद्घाटन

## सोनू सूद फाऊंडेशनकडून डाळिंब रिअल ज्यूस व ग्लुकोजचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३ मार्च-**
नागणसूर (ता.अक्कलकोट) येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुली व मुले शाळेत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत महिला सक्षमीकरण सप्ताहाचे उद्घाटन उत्साहात पार पडले. शासनाच्या परिपत्रकानुसार २ ते ८ मार्च दरम्यान विविध विभागांच्या समन्वयातून महिला सक्षमीकरणासाठी उपक्रम राबविण्यात येत असून त्याच अनुषंगाने शाळेत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे, केंद्रप्रमुख श्रीमंत पुजारी, वीरेंद्र गजा व संतोष चिंचोळीकर प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा गुरुबाई प्रचंडे तर उपाध्यक्षा नागम्मा मठपती होत्या. व्यासपीठावर प्रेमा बनसोडे अंगणवाडी सेविका भौरम्मा सक्करगी, सविता थंब, राजश्री मोगली, श्रीदेवी विभुते व त्रिवेणी कळसगोंडा उपस्थित होत्या. बहुसंख्येने महिला व शाळेतील किशोरवयीन मुलींची उपस्थिती लक्षणीय होती.

लक्ष्मीकांत तळवार यांनी महिला सक्षमीकरण सप्ताहात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. सूत्रसंचालन राजकुमार नरुने यांनी केले, तर आभार प्रदर्शन कल्याणी गंगोंडा यांनी मानले.

सोनू सूद फाऊंडेशन सोलापूर जिल्हा प्रमुख विपुल मिरजकर यांच्या नेतृत्वात अक्कलकोट तालुका प्रमुख शरणप्पा फुलारी यांच्या सहकार्यातून डाबर कंपनीच्या सहयोगातून याप्रसंगी उपस्थित महिला व शाळेतील १६० मुलींना सोनू सूद फाऊंडेशनकडून डाळिंब रिअल ज्यूस व ग्लुकोजचे वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका शांता तोळनूरे,विजयश्री एंटमन,राजशेखर कुर्ले,कल्याणी गंगोंडा,राजकुमार खानापुरे,शोभा कलशेट्टी, चन्नम्मा बिराजदार, मलकप्पा हिप्परगी,राजकुमार नरुने,लक्ष्मीकांत तळवार आदींनी परिश्रम घेतले.



### मध्यवर्ती मंडळातर्फे शिवजयंती मिरवणूक; सनई, टाळमृदुंगाचा वापर

**करकंब, दि. ३ मार्च-**
छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त करकंब (ता. पंढरपूर) येथील मध्यवर्ती मंडळाकडून काढण्यात आलेल्या मिरवणुकीमध्ये डीजेला बगल देत हलगी, टाळ मृदंग, बँड पथक, सनई ताशा अशा पारंपारिक वाद्यांचा वापर करण्यात आला.

थोरली वेस येथून छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास अभिवादन करून आतार चौक, मोठा म्हसोबा,एसटी बसस्थानक, शुक्रवार पेठ, धाकटी वेस या मार्गावरून शिस्तबद्ध मिरवणूक काढण्यात आली.विद्युत रोषनाई, सनई ताशा, बँड पथक, टाळ मृदंग व डौलाने फडकणारे भगवे ध्वज, जय भवानी जय शिवाजीच्या घोषणा यामुळे शिवशक्ती व वारकरी संप्रदायाचा संगम झाल्याचा अनुभव करकंबकरांनी घेतला. शिवकालच पुन्हा अवतरल्याचा भास होत होता. या सोहळ्यात मध्यवर्ती मंडळाचे कार्यकर्ते, शिवप्रेमी सहभागी झाले होते.

### बार्शीतील चाटे क्लासेसमध्ये मोफत सराव परीक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ मार्च-**
चाटे शिक्षण समूह बार्शी शाखेच्या वतीने इयत्ता चौथी ते नववीमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचे द्वितीय सत्र परीक्षेचे गणित, विज्ञान व इंग्रजी या विषयांचे पेपर मोफत सोडवून घेऊन तपासून दिले जाणार आहेत. पालक किंवा विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी प्रत्यक्ष क्लासेसमध्ये येऊन करणे आवश्यक आहे. नाव नोंदणी करण्याची वेळ सकाळी ७ ते १० किंवा सायंकाळी ४ ते ७ अशी असणार आहे. ज्या पालक किंवा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष क्लासमध्ये येणे शक्य नाही अशांनी ७०२००६०८०२ या नंबरवर मेसेज करुन आपल्या पाल्याची नाव नोंदणी करु शकता. या परीक्षेसाठी बार्शी शहर व तालुक्यातील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन शाखेचे संचालक पांडुरंग घाडगे यांनी केले आहे.

# श्री काशीलिंग सामुदायिक विवाह १९ एप्रिल रोजी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि. ३ मार्च-**
तालुक्यातील जेऊरचे श्री काशीलिंग बहुऊदेशिय संस्थेच्या वतीने रविवार १९ एप्रिल रोजी श्री स्वामी समर्थ सांस्कृतिक भवन जेऊर येथे सर्वधर्मीय सामुदायिक मोफत विवाह सोहळा आयोजित केला आहे. गरजू विवाह इच्छुकानी संपर्क साधावा असे आवाहन संस्थेचे सदस्य अंबराया कनोजी यांनी केले आहे.



काशीलिंग बहुउद्देशीय संस्थेच्या मल्लिकार्जुन पाटील व मित्रपरिवारांकडून गेल्या अकरा वर्षात २५५ जोडपे विवाहबद्ध झाली आहेत. या विवाहात प्रामुख्याने वधू वरांना पोशाख, मणी-मंगळसूत्र देण्यात येणार असून वऱ्हाडी मंडळींना भोजन,शिदोरी आदींची व्यवस्था करण्यात येणार आहे. गावातील मुख्य रस्त्यावरून वधू वरांची मिरवणूक काढण्यात येणार आहे.

विवाह सोहळ्यास काशी जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामी, माजी खासदार डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी, शिवानंद शिवयोगी महास्वामी,बसवलिंग महास्वामी, शिवयोगी शिवाचार्य महास्वामी,निळकंठ शिवाचार्य महास्वामी, श्रीकंठ शिवाचार्य महास्वामी, राजशेखर शिवाचार्य महास्वामी, मळेंद्र महास्वामी, शांतलींग शिवाचार्य महास्वामी,अभिनव शिवलिंग महास्वामी, शांतलींग शिवाचार्य महास्वामी, प्रभूशांत महास्वामी,महानंदा ताई मुगळी, सोमलिंग घुळी महाराज, पांडुरंग महाराज,वीर शिवालिंगेश्वर महास्वामी, रऊफ पिरजादे बाबा आदी मठाधिश उपस्थित राहणार आहेत.

विवाह इच्छुकांनी काशिनाथ कडगंची यांचा मो क्र. ८३०८३५४२०४, आणि इरण्णा कणमुसे ९४२३७८७२५५ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेस शिवाजीराव कलमदाणे, काशिराया काका पाटील,इरण्णा कणमुसे, दत्तात्रय कवठे, मल्लिनाथ चौलगी,सिद्धाराम कापसे, राजकुमार अमोगी, काशिनाथ पाटील, शंकर अजगोंडे, श्रीशैलय्या मसुती, इरण्णा चपळगांव, काशिनाथ कडगंची, शिवराज बोरिकरजगी, सुभाष पाटील नागनाथ कापसे आदींची उपस्थिती होत

> विवाह सोहळ्यातील वेगळा उपक्रम म्हणून अक्कलकोट तालुक्यातील निरंतर वैद्यकीय सेवा बजावणाऱ्या ५० वर्षांवरील डॉक्टरांचा सन्मान यावेळी केला जाणार आहे.

# घरकुल लाभार्थ्यांनी मोफत वाळू योजनेचा लाभ घ्यावा

## तहसीलदार विष्णु बुटे; १६ लाभार्थ्यांना पत्राचे वाटप



**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ३ मार्च-**
शासनाच्या नियमानुसार मंद्रूप अप्पर तहसील कार्यालयांतर्गत असणाऱ्या घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांनी मोफत वाळू योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन मंद्रूपचे तहसीलदार विष्णू बुटे यांनी केले.

मंद्रूप तहसील कार्यालयात १६ घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू पत्राचे वाटप करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी नायब तहसीलदार अश्विनी दराडे, निंबर्गीचे मंडल अधिकारी राणा वाघमारे, नवलकर, तलाठी निंगू कोळी, गणेश भुजबळ , पिंटू चव्हाण अप्पासाहेब कोळी, धानया स्वामी, रियाज पटेल आदी उपस्थित होते. यावेळी तहसीलदार बुटे म्हणाले की, मंद्रूप तहसील कार्यालयांतर्गत असणाऱ्या ३८ गावात ११७१ घरकुल लाभार्थी आहेत. या लाभार्थ्यांना भंडारकवठे व लवंगी येथील वाळू साठ्यातून दोन टप्प्यात मोफत वाळूचे वाटप करण्यात येणार आहे . घरकुल लाभार्थ्यांनी वाहतूक खर्च करून आवश्यकतेनुसार दोन आणि तीन ब्रास मोफत वाळू घेऊन जावे. ज्या घरकुल लाभार्थ्यांना बांधकामासाठी वाळू आवश्यक आहे, अशांनी मंद्रूप अप्पर तहसील कार्यालयाकडे संपर्क साधावे. ५ मार्चला लवंगी व भंडारकवठे येथील वाळू साठ्यातून वाळू वाटप करण्यात येणार आहे. असेही तहसीलदार बुटे यांनी सांगितले.

> **शिबिरातून पत्राचे वाटप**
> मंद्रूप तहसील कार्यालयाकडून सहा ठिकाणी महाराजस्व शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी विविध दाखले वाटप करण्याबरोबर घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू पत्राचे वाटप करण्यात येणार असल्याचे तहसीलदार बुटे यांनी सांगितले.



### सैनिकी स्कूल परीक्षेत सुयश विद्यालयाचे पाच विद्यार्थी पात्र

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ मार्च-**
बार्शी येथील सुयश विद्यालयाने शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम ठेवत पुन्हा एकदा उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

इयत्ता पाचवी सैनिकी स्कूल प्रवेश परीक्षेत विद्यालयातील पाच विद्यार्थी पात्र ठरुन शाळेच्या यशाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

या परीक्षेत पात्र ठरलेले विद्यार्थी- घोळवे शौर्य अंकुश- २६२/३००, घोळवे ऋतुराज अंकुश- २५४२, कापसे अनन्या विजय- २५२, अंधारे सात्विक संजय- २४४, सोनवणे वीरप्रताप सुर्यकांत- १७८. संस्थेचे संस्थापक शिवदास नलवडे, संस्थेच्या मार्गदर्शिका प्रतिभा नलवडे, विद्यालयाचे मुख्याध्यापिका अलका जगताप, उपमुख्याध्यापक येवले व सर्व मार्गदर्शक शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अवलंब करणे ही काळाची गरज

## डॉ. वसंत जुगळे; खेडगी महाविद्यालयात राष्ट्रीय कृषी अर्थशास्त्र परिषद




**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. ३ मार्च-**
वाढती लोकसंख्या, हवामान बदलाचे तीव्र परिणाम आणि घटत चाललेली शेतीयोग्य जमीन या पार्श्वभूमीवर कृषी उत्पादकता वाढवण्यासाठी आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अवलंब करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन डॉ. वसंत जुगळे यांनी केले.

सी. बी. खेडगी महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागातर्फे आयोजित पीएम उषा अंतर्गत दोन दिवसीय राष्ट्रीय कृषी अर्थशास्त्र परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे संचालक डॉ. जुगळे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी होते. व्यासपीठावर संस्थेचे सचिव सुभाष धरणे, प्राचार्य डॉ. जी. एस. धबाले उपस्थित होते. अध्यक्षीय भाषण चेअरमन बसलिंगप्पा खेडगी यांनी केले. प्राचार्य डॉ. धबाले यांनीही मार्गदर्शनपर भाषण केले. दुपारच्या सत्रात गव्हर्नमेंट महाविद्यालय कलबुर्गी येथील डॉ. टी. आर. गुरुबसप्पा यांनी 'बाजार संबंध, किमान आधारभूत किंमत आणि कृषी विपणन सुधारणा' या विषयावर, डॉ. राजेंद्र पाटील यांनी 'सेंद्रीय शेती व आधुनिक सिंचन व्यवस्था' या विषयावर, डॉ. विजय व्हनकडे ( पुणे) यांनी ' डिजिटल शेती व स्पर्धात्मक आधुनिक शेती ' या विषयावर मार्गदर्शन केले. या परिषदेस सोलापूरचे डॉ. राजाराम पाटील, डॉ. सुनील मगर, डॉ. अविनाश जम्मा, डॉ. महादेव कांबळे, डॉ. रेवप्पा कोळी, डॉ. शंकर राजे, प्रा. युवराज सोलापूरे, डॉ. राहुल भोसले डॉ. राहुल मोपारे (कोल्हापूर) उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. गणपतराव कलशेट्टी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. किशोर थोरे यांनी तर आभार प्रा. संध्या इंगळे यांनी मानले.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## पीएलआय व आरपीएलआय विभागात पूनम सोनार सर्वप्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. ३ मार्च-**

माळशिरस पोस्ट विभागातील पोस्टल असिस्टंट पुनम मंगेश सोनार यांनी आरपीएलआय व पीएलआय विभागात पंढरपूर डिव्हिजन मधून सर्वोत्कृष्ट काम गिरी केल्याबद्दल पंढरपूर डाक विभागाचे डाकघर अधीक्षक मुन्ना कुमार, सहा. डाकघर अधीक्षक राजेश शर्मा,एम. एम.पाटील पोस्टमास्टर सोमनाथ गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थित पुनम



सोनार यांचा चांगली कामगिरी केल्याबद्दल प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना डाकघर अधीक्षक मुन्ना कुमार म्हणाले, पोस्टच्या विविध योजना जनतेपर्यंत पोहचवा टपाल ग्रामीण जीवन बिमा योजनेचे महत्व लोकपर्यंत पोहचवून पोस्टाचा बिझनेस वाढवावा पोस्टाचे ग्राहक व पोस्टल कर्मचारी यांच्या अडचणी सोडवण्यास प्राध्यान्य देणार असून जास्तीत जास्त काम करावे असे त्यांनी शेवटी आव्हान केले. यावेळी पंढरपूर डिव्हिजन मधील उल्लेखनीय काम गिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाही गौरवण्यात आले. यावेळी पंढरपूर विभागातील कर्मचारी उपस्थित होते.



### महत्त्वाचे



## रामभाऊ जोशी हायस्कूल येथे पर्यावरण पूरक होळी

**करकंब, दि. ३ मार्च-**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक वनिकरण विभाग व रामभाऊ जोशी हायस्कूल येथील राष्ट्रीय हरित सेना अंतर्गत वसुंधरा पर्यावरण मंडळ यांचेवतीने पर्यावरण पूरक होळीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्याध्यापक हेमंत कदम, पर्यवेक्षक धनवंत करळे, वसुंधरा पर्यावरण मंडळाचे समन्वयक महादेव पुजारी उपस्थित होते. स्काऊट मास्टर महादेव पुजारी यांनी येणाऱ्या पिढीसाठी पर्यावरण रक्षण करणे अत्यंत आवश्यक असून त्यासाठी वृक्षारोपण केले पाहिजे असे सांगून पर्यावरण पूरक होळी करणे का आवश्यक आहे याचे महत्व विषद केले. विद्यार्थ्यांनी परिसरातील कचरा गोळा करून पर्यावरण पूरक होळी साजरी करत पर्यावरणाचे संरक्षण करण्याची शपथ घेतली.



## १७६ लाभार्थ्यांना श्रावणबाळ योजनेचा लाभ; वेळापुरात मंजुरी आदेश वितरण

**वेळापूर, दि. ३ मार्च-**

आमदार उत्तमराव जानकर यांच्या मार्गदर्शनाखाली वेळापूर ग्राम पंचायतीच्या पुढाकारातून सुमारे १७६ गरजू व वयोवृद्ध नागरिकांना श्रावणबाळ योजना अंतर्गत लाभ मंजूर करण्यात आला. ग्रामपंचायत सदस्य डॉ. स्नेहल जानकर तसेच आमदार उत्तमराव जानकर यांचे विश्वासू अमोल पनासे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे लाभार्थ्यांच्या अर्जांची पूर्तता करून मंजुरी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. यावेळी आमदार उत्तमराव जानकर व माळशिरस तहसीलदार शेजुळ यांच्या हस्ते मंजूर लाभार्थ्यांची यादी प्रदान करण्यात आली. तसेच सर्व पात्र लाभार्थ्यांपर्यंत शासन योजनांचा लाभ पोहोचावा यासाठी प्रशासनाने अधिक प्रभावी व गतिमान पद्धतीने कार्य करावे, असे आवाहन आमदार उत्तमराव जानकर यांनी यावेळी केले.

## कांदा उत्पादकांना प्रति क्विंटल ५०० रुपये अनुदान द्या : माजी आमदार राऊत

**बार्शी, दि. ३ मार्च-**

राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या बाजारातील घसरलेल्या दरांमुळे आर्थिक अडचणीत सापडले आहेत. उत्पादन खर्च वाढला असताना विक्री दरात सातत्याने होत असलेली घसरण पाहता शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रति क्विंटल ५०० रुपये अनुदान जाहीर करावे, अशी मागणी आमदार राजाभाऊ राऊत यांनी केली आहे. या संदर्भात आ. राऊत यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच पणनमंत्री जयकुमार रावल यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे. सध्याच्या परिस्थितीत कांद्याचे बाजारभाव उत्पादन खर्चापेक्षा कमी असून शेतकऱ्यांना मोठा तोटा सहन करावा लागत आहे. वाहतूक, मजुरी, खते, औषधे आणि साठवणूक खर्च वाढल्यामुळे शेतकरी अडचणीत आले असल्याचे त्यांनी नमूद केले.



कांदा हा राज्यातील प्रमुख नगदी पीक असून अनेक शेतकऱ्यांचे अर्थकारण त्यावर अवलंबून आहे. दर घसरल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही फटका बसत असल्याचे मा. आ. राऊत यांनी सांगितले. त्यामुळे शासनाने तातडीने निर्णय घेऊन प्रति क्विंटल ५०० रुपये अनुदान जाहीर करावे, तसेच खरेदी प्रक्रियाही सुलभ करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## सहा वर्षीय तैमुरचा एक दिवसाचा रोजा

**अक्कलकोट, दि. ३ मार्च-**



पवित्र रमजान ईदचे औचित्य साधत अक्कलकोट येथील ६ वर्षीय तैमुर इम्रान शेख या चिमुकल्याने एक दिवसाचा रोजा पूर्ण केल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. लहान वयातच धार्मिक संस्कारांची जाणीव ठेवत तैमुरने पहाटेपासून संध्याकाळपर्यंत उपवास पाळला. त्याने रोजा पूर्ण केल्याने वटवृक्ष देवस्थान संचलित विठ्ठल उपलब बाल संस्कार केंद्राचे संस्थापक अध्यक्ष महेश इंगळे, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, नगरसेवक महेश हिंडोळे, कृपा सिंधू फाउंडेशनचे सचिव रवीकिरण पाटील, फैजअहमद कोरबू , मुजमीन शेख, इस्माईल मुकादम, नगरसेवक सचिन शिंदे, समाजसेवक गोविंद शिंदे आदींनी त्याचे अभिनंदन केले.

## यश श्रीश्रीमाळ यांचे सीए परीक्षेत यश

**बार्शी, दि. ३ मार्च-**



बार्शी वकील संघाचे जेष्ठ विधीज्ञ ॲड. दिनेश श्रीश्रीमाळ यांचे चिरंजीव यश दिनेश श्रीश्रीमाळ यांनी अवघ्या २२ व्या वर्षी देशातील अत्यंत कठीण आणि प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या Chartered Accountant (सनदी लेखापाल) परीक्षेत यश संपादन केले. यश यांचे वडील ॲड. दिनेश श्रीश्रीमाळ हे बार्शी वकील संघातील ज्येष्ठ व मान्यवर विधीज्ञ असून त्यांनी अनेक वर्षे कायदे क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. यश यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल माजी नगराध्यक्ष असिफ तांबोळी, ॲड. संजय साखरे यांनी अभिनंदन केले आहे.

# राज्यस्तरीय लावणी स्पर्धेत नटरंग कला केंद्र प्रथम

### रोख तीन लाख अन् सन्मानचिन्ह देवून गौरव; सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३ मार्च-**

सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील जयंती समारंभ समिती शंकरनगर यांच्यावतीने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धेत नटरंग सांस्कृतिक कला केंद्र, ग्रुप पार्टी मोडनिंब (जि. सोलापूर) या संघाने प्रथम क्रमांक पटकावला. त्यांना रोख रुपये तीन लाख व सन्मानचिनह देऊन गौरविण्यात आले. स्मृती भवन शंकरनगर येथे सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या १०८ व्या जयंतीनिमित्त दि. २८ फेब्रुवारी व १ मार्च या कालावधीत राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धेचे आयोजन केले होते.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण प्रसंगी आमदार दिलीप सोपल, जयंती समितीचे संस्थापक जयसिंह मोहिते पाटील, स्पर्धा समितीच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते पाटील, परीक्षक डॉ. शशिकांत चौधरी, प्रा.चं. वी. जोशी, प्रा. मधुकर गायकवाड, सहकार महर्षी कलावंत पुरस्कर्ते पांडुरंग घोटकर, रेश्मा परितेकर, प्रमिला लोदगेकर उपस्थित होते.

स्पर्धेतील रुक्मिणी अर्चना जोत्स्ना वाईकर पिंजरा सांस्कृतिक कला केंद्र, वेळे (ता. वाई जि. सातारा) आणि प्रिया नगरकर न्यु अंबिका सांस्कृतिक कला केंद्र, ग्रुप पार्टी यवत-चौफुला (जि पुणे) या संघांनी विभागून द्वितीय क्रमांक पटकावला.त्यांना प्रत्येकी रोख रुपये दोन लाख व सन्मानचिन्ह देण्यात आले. तर वैशाली समसापूरकर जय अंबिका सांस्कृतिक कला केंद्र, सणसवाडी (जि पुणे) या संघाने तृतीय





क्रमांकासह रोख रुपये एक लाख व सन्मानचिन्ह पटकावले. अलंकार सांस्कृतिक कला केंद्र, ग्रुप पार्टी सुपा (जि. अहिल्यानगर) यांनी चतुर्थ क्रमांक, आणि वैष्णवी कोल्हापूरकर रेणुका सांस्कृतिक कला केंद्र, अंबप-वाठार (जि. कोल्हापूर) व अपर्णा किर्ती नगरकर लक्ष्मी सांस्कृतिक कला केंद्र, सणसवाडी (जि पुणे) यांनी विभागून पाचवा क्रमांक पटकावला. तर वैयक्तिक बक्षिसा मध्ये उत्कृष्ट मुजरा रु. ३ हजार नटरंग सांस्कृतिक कला केंद्र, ग्रुप पार्टी मोडनिंब (जि सोलापूर), उत्कृष्ट गायिका राखी चौरे , उत्कृष्ट ढोलकी वादक राहुल जावळेकर, उत्कृष्ट हार्मोनियम वादक-अनिकेत साळुंखे अंबप-वाठार यांना प्रत्येकी

> कलावंत हा टाळ्यांचा भुकेला असतो तो आत्म विश्वासाने व ताकतीने आपली कला रंगमंचावर सादर करत असतो. रसिकांनीही त्यांना भरभरून दाद दिली पाहिजे.
>
> **- जयसिंह मोहिते पाटील**
> संस्थापक अध्यक्ष, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समिती

रु. एक हजार व सन्मान चिन्ह देऊन उपस्थितांच्या हस्ते गौरविण्यात आले. दोन दिवसाच्या स्पर्धा कालावधीत अनेक ज्येष्ठ व नवकलाकारांनी जयसिंह मोहिते पाटील यांना लावणी क्षेत्रातील योगदानाबद्दल शासनाने त्यांना पद्मश्री पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करावा अशी इच्छा व्यक्त केली. सूत्रसंचालन किरण सूर्यवंशी राजकुमार पाटील यांनी केले.



## महर्षी प्रशालेत व्यसनांची होळी साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३ मार्च-**

शंकरनगर-अकलूज येथील महर्षी प्रशाला व्यवसाईक अभ्यासक्रम विभागामध्ये गुटखा, सिगारेट यांची पाकिटे जाळून विद्यार्थी व शिक्षकांनी अनोख्या पद्धतीने व्यसनांची होळी केली.

यावेळी बोलताना योग शिक्षक प्रा. धनंजय देशमुख म्हणाले, गुटख्याची एक पुडी एक रुपयाला जरी पकडली तरी महाराष्ट्रात दररोज सुमारे ७२० कोटी रुपये निव्वळ थुंकण्यावर वाया जात आहेत. दारू, ड्रग्ज ही मोठी खर्चीक व्यसने झाली. स्वस्तात नशा करण्यासाठी फक्त गुटखाच नव्हे तर अनेक लोक खोकल्याचे औषध, टायर पंक्चरचे सोल्युशन, बूट पॉलिशचे केमिकल, व्हाईटनर अशा वेगवेगळ्या व्हरायटीचे व्यसन करत आहेत.

महर्षी प्रशालेचे मुख्याध्यापक संजय गळीतकर म्हणाले, देश सदृढ हवा असेल तर देशातील लोक सदृढ असणे गरजेचे असते. व्यसनाने पोखरलेले लोक देशाची प्रगती करू शकत नाहीत. यावेळी जितेंद्र माने देशमुख, दीपक भोंग, बिभीषण जाधव, राजेंद्र कांबळे, अनिल होमकुंबरे, शिवराज काळे, हनुमंत काळे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना भविष्यात व्यसनाच्या आहारी न जाण्याची शपथ देण्यात आली.

## सार्थक नरुटेचे सैनिक स्कूल परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.३ मार्च-**



माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील जिल्ह्य परिषद प्राथमिक शाळेच्या इयत्ता पाचवी मधये शिकत असणाऱ्या सार्थक युवराज नरुटे याने ऑल इंडीया सैनिक स्कूल परीक्षेत ३०० पैकी २७७ गुण मिळवीत संपूर्ण भारतातील गुणवत्ता यादीत त्याने ६९५ वा क्रमांक संपादन केला. यामध्ये त्याची सातारा येथील सैनिक स्कूलमध्ये निवड झाली आहे.

## पंढरपुरात शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३ फेब्रवारी -**

तालुक्यातील सर्वसामान्य जनता, शेतकरी, महिला आणि विद्यार्थ्यांचे महसूल विभागाशी संबंधित कामे जलदगतीने सोडविण्यासाठी तालुक्यातील १२ मंडळा मध्ये दि. ७ मार्च ते १५ मे या कालावधीत 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान' राबविण्यात येणार असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

शिबिरा अंतर्गत प्रलंबित असलेले फेरफार निकाली काढणे, अभिलेख दुरुस्ती, लोकसेवा हक्क कायदा, अकृषिक तरतुदी संदर्भातील सुधारणाबाबत मार्गदर्शन, भूसंपादन केलेल्या व अकृषीक परवानगी दिलेल्या प्रकरणी कमी जास्त पत्रके तयार करून गाव दप्तर अद्यावत करणे, सुधारणा व नागरिकायदा त्याचबरोबर उत्पन्न, रहिवासी, अधिवास, जात व नॉन क्रिमीलेअर दाखले यांच्याबाबत तात्काळ सेवा दिली जाणार आहे.

**वेगवेगळ्या मंडळात आयोजन**

दरम्यान शनिवार दि.७ म र्चला कासेगांव आणि करकंब, १४ मार्चला भाळवणी आणि पुळुज शुक्रवार दि. १० एप्रिल रोजी खर्डी आणि पटवर्धन कुरोली, शुक्रवार दि.१७एप्रिल रोजी भंडीशेगाव आणि रोपळे, शुक्रवार दि.८ मे रोजी पंढरपूर तर शुक्रवार दि.१५ मे रोजी तुंगत आणि चळे या मंडळात शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे.

## शेतकऱ्यांना लाईट देणं महत्त्वाचे : आ. अभिजीत पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३ फेब्रुवारी -**

तालुक्यातील बाभुळगांव सबस्टेशन येथील वाढीव येथे ५ एम.व्ही.ए. नवीन ट्रान्सफॉर्मरचे उद्घाटन आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार पाटील म्हणाले, इथून पुढे शेतकऱ्यांना विजेचा प्रश्न भेडसावणार नाही ५ एम.व्ही.ए आधीचा ट्रान्सफॉर्मर असताना वाढीव क्षमतेसाठी ५ एम.व्ही.ए चा नवीन ट्रान्सफॉर्मर बसवण्यात आल्याने आता शेतकऱ्यांच्या विजेचा प्रश्न मार्गी लागलेला आहे. शेतकऱ्यांना लाईट देणं



ही लोकप्रतिनिधी म्हणून मी माझी भूमिका पार पाडत आहे. बाभुळगाव मधील रेल्वे लाईन येथील विजेचा प्रश्न देखील येत्या काळात मार्गी लावण्याचे आश्वासन यावेळी आमदार पाटील यांनी दिले.

यावेळी वसंत चव्हाण, दिलीप चव्हाण, दशरथ चव्हाण, महादेव चव्हाण, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष अतुल चव्हाण, सरपंच अमोल कोरके, जिल्हा परिषद सदस्य भारतबापू कोरके, जिल्हा परिषद सदस्य अमित साळुंखे, जिल्हा परिषद सदस्य संतोष बागल, पंचायत समिती सदस्य विलास भोसले, उपसरपंच श्रीपाद चव्हाण, पै.महादेव चव्हाण, जीवन काका पाटील, गणेश गांडुळे, उद्धव बापू चव्हाण, अमोल चव्हाण, मोहन पाटील, ओंकार चव्हाण, विठ्ठल कारखान्याचे संचालक जनक भोसले, दिनकर चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

**आमदार पाटील यांचे आवाहन**

सध्या राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असल्याने तमाम जनतेने आपल्या परिसरातील आपल्या गावातील, प्रश्न, समस्या अधिवेशनात मांडण्यासाठी द्यावेत असे देखील आवाहन यावेळी आमदार अभिजीत पाटील यांनी समस्त शेतकरी तसेच नागरिकांना यावेळी केले

# माता रमाईंच्या त्यागामुळेच बाबासाहेबांना इतिहास घडवता आला

- ✔ पालकमंत्री जयकुमार गोरे
- ✔ रमाई सेवाभावी संस्थेतर्फे रमाईची लेक पुरस्काराने महिलांचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ मार्च-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेल्या संविधानामुळेच भारताची लोकशाही सक्षम आणि मजबूत झाली असून, त्यांच्या विचारांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवूनच देशाचा कारभार पुढे नेला जात आहे. त्यागमूर्ती माता रमाई यांच्या त्यागामुळेच बाबासाहेबांना इतिहास घडवता आला आणि समाजातील दरी मिटवून सर्वांना एका धाग्यात बांधण्याचे महान कार्य घडले, असे प्रतिपादन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी रविवारी केले.

रमाबाई भीमराव आंबेडकर यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त रमाई सेवाभावी बहुउद्देशीय सामाजिक शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने रविवारी हॉटेल



सूर्या येथे 'रमाईची लेक' पुरस्कार सोहळा २०२६ पार पडला. यावेळी पालकमंत्री गोरे यांच्या हस्ते विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार देवेंद्र कोठे होते. यावेळी महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वर देवकर, भाजपच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत दत्ता गायकवाड, संस्थापक राजाभाऊ माने, जी. एम. संस्थेचे संस्थापक बाळासाहेब वाघमारे, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगावकर, कामगार नेते बाली मंडेपू, नगरसेवक मनिष केत, श्रीनिवास दायमा, अक्षय अंजिखाने आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना पालकमंत्री गोरे म्हणाले, भारतीय संविधानाला नतमस्तक होऊनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेमध्ये प्रवेश केला, ही बाब संविधानाबद्दलचा त्यांचा आदर दर्शवते. प्रत्येक यशस्वी व्यक्तीच्या पाठीमागे कुटुंबातील महिलांचा मोठा वाटा असतो. त्याचप्रमाणे माता रमाई या बाबासाहेबांच्या पाठीशी ठामपणे उभ्या राहिल्या. त्यांच्या त्याग आणि प्रेरणेचा आदर्श घेऊन महिलांनी समाजकार्यात पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाची रुपरेषा संजय बनसोडे यांनी मांडली. प्रास्ताविक राजाभाऊ माने यांनी तर, सूत्रसंचालन पल्लवी माने यांनी केले, तर आभार रितू माने यांनी मानले.

**या महिलांचा झाला गौरव**

मनपा सहायक उपायुक्त वीणा पवार, सहायक पोलीस आयुक्त विजयालक्ष्मी कुरी, आरटीओ निरीक्षक प्रतीक्षा नारायणकर, महावितरणच्या कनिष्ठ अधिकारी मेघा शिवगुंडे, प्रा. डॉ. तेजस्विनी कांबळे, उद्योजक अंजली वाघमारे, समाजसेविका सुनंदा साळुंखे, नगरसेविका अश्विनी चव्हाण, डॉ. योगिनी साबळे, रुग्णसेविका ज्योती शिंदे, पत्रकार सरस्वती कोकणे, आदर्श माता नंदाबाई वाघमारे, सुभद्रा गायकवाड आणि कला क्षेत्रातील सुजाता शिंदे यांना 'रमाईची लेक' पुरस्काराने गौरविण्यात आले.